
# गांधीजी

प्रा. आनंद मेणसे



# गांधीजी

प्रा. आनंद मेणसे

गांधीजी / आनंद मेणसे
Gandhiji / Anand Mense

© आनंद मेणसे
© दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट
भ्रमणध्वनी : ९४४८३४७४५२
ईमेल : anandmense@gmail.com

पहिली आवृत्ती : ऑगस्ट २०१९

किंमत : ₹ १००/-

प्रकाशक :
दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट,
सुवास्तू प्रेस्टिज, आरएमडी इन्स्टिट्यूट मागे,
आदित्य गार्डन सिटीजवळ, मुंबई बंगलोर हायवे जवळ,
सर्व्हिस रोड, वारजे, पुणे ४११ ०५८.

मुद्रणस्थळ :
अंजूम बाइंडिंग वर्क्स, हमीद शेठचा गाळा, मेसेंट रोड, फ्रि वे समोर,
खांब क्र.२००, शिवडी (पू.), मुंबई - ४०० ०१५.
दूरध्वनी : २४९८ ५२९०/९१

# अर्पण पत्रिका

गांधीवादी कार्यकर्ते
अशोकभाई देशपांडे आणि शिवाजीदादा कागणीकर यांना

**– आनंद मेणसे**

# प्रकाशकाचे मनोगत

अन्नपूर्णा महिला मंडळाची स्थापना १९७५ साली कॉ. नरेंद्र (दादा) पुरव आणि पद्मश्री प्रेमाताई पुरव यांनी केली.

कॉ. नरेन्द्र पुरव ह्याचा जन्म १९२९ मध्ये झाला. वयाच्या १४-१५व्या वर्षापासून ते दादर येथील ''लोकसेना'' या दुसऱ्या महायुद्धाच्या धामधूमीत हिटलरच्या फॅसिझम विरोधी आणि देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणाच्या संघटनेत सामील झाले. १९४९ साली ते बँक ऑफ इंडीयामध्ये नोकरीस लागले. १९५० ते १९८२ अशी ३२ वर्षे ते बँक ऑफ इंडियातील मुंबई युनियनचे पुढारीपण करत होते. १९७३ ते १९८२ कॉ. पुरव ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनचे (अे.आय.बी.ई.ए.) असिस्टंट सेक्रेटरी होते. बँक राष्ट्रीयीकरणासाठी अे.आय्.बी.ई.ए.ने केलेल्या चळवळीचे मुंबई महाराष्ट्रातील ते प्रमुख पुढारी होते.

१९७५ साली गरजू गरीब महिलांसाठी राष्ट्रीयीकृत बँकांची कर्जे उपलब्ध करण्यासाठी आणि त्या महिलाचे इतर प्रश्न सोडविण्यासाठी अन्नपूर्णा महिला मंडळाच्या स्थापनेमागील ते प्रेरणास्थान होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या मुंबई आणि महाराष्ट्र राज्य कौन्सीलचे ते प्रमुख नेते होते. चीनने आक्रमण केलेल्या १९५९ ते १९६४ या भारतीय कम्युनिस्ट चळवळीच्या अत्यंत कठीण कालखंडात कामगार वर्गीय आंतरराष्ट्रीयवाद आणि भारतीय राष्ट्रवाद हे एकमेकाला कसे पुरक आहेत हे समजावून सांगणारे कार्यकर्त्यांचे शेकडो अभ्यास वर्ग त्यानी घेतले.

१९९३ सालापासून मेधा पुरव-सामंत यांनी पुण्यात अन्नपूर्णा महिला मंडळाचे काम सुरू केले. मायक्रो फायनान्सच्या जोडीने, मायक्रो इन्शुरस, पेन्शन, पाळणा घर, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी विद्यापूर्णा असा विस्तृत अन्नपूर्णा परिवार उभा केला.

याच अन्नपूर्णा परिवारा अंतर्गत दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटची स्थापना केली. या संस्थेतर्फे दरवर्षी संस्थापक कॉ. दादा पुरव याच्या स्मृतीदिनी (१८ ऑगस्ट रोजी) दरवर्षी आम्ही प्रचलीत आर्थिक-बँकींग-सामाजिक विषयांवर पुस्तक प्रसिद्ध करतो.

आजपर्यंत मायक्रो इन्शुरन्स, मायक्रो फायनान्स, नोटाबंदी, सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचे भवितव्य या विषयांवर पुस्तके काढली आहेत. तसेच ''संवाद'' हे त्रैमासिक सुद्धा अन्नपूर्णा परिवारातील सभासदासाठी आम्ही चालवित आहोत.

यंदाचे वर्ष महात्मा गांधी यांची १५० वी जयंती वर्ष आणि महात्माजींच्या पत्नी कस्तूरबा गांधी यांचे सुद्धा १५० वे जयंती वर्ष आहे. या दोन्ही घटनाचे औचित्य साधत आम्ही ''गांधीजी'' वरील प्रा. कॉ. आनंद मेणसे यांनी लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध करीत आहोत.

महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत आपल्या राजकीय कार्याला कशी आणि कोणत्या परिस्थितीत सुरवात केली हे या पुस्तकातील पहिल्या दोन प्रकरणात मांडण्यात आले आहे.

तिसऱ्या प्रकरणापासून भारतात महात्माजीचे आगमन कोणत्या परिस्थीतीत झाले. त्यानी सुरवातीच्या काळांत कोणते लढे उभारले. याचा उहापोह करण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणापासून गांधीजी स्वातंत्र्य चळवळीला कसा आकार आणि आशय देत गेले. त्यानी व्यापक जनसंवाद कसा साधला. जनसंघटना कशा उभारल्या. दोन लढ्याच्या दरम्यान सातत्य टिकविण्यासाठी विधायक कार्यक्रमाची कशी आखणी केली; महिलाना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यास कसे प्रवृत्त केले. ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या विरोधात सर्वसामान्य

जनतेस सत्याग्रहाच्या माध्यमातून निर्भय कसे बनविले. स्वातंत्र्य, बंधुता, धर्मनिरपेक्षता ही मूल्ये भारतासारख्या खंडप्राय देशांतील स्वातंत्र्य चळवळीची मूल्ये कशी बनविली. धार्मिक उन्मादाच्या काळात निर्भयपणे पुढाकार घेऊन धार्मिक दंगेधोपे कसे थांबविले इत्यादी विषयी अत्यंत समृद्ध अशी माहिती अत्यंत संवादी शैलीत कॉ. आनंद मेणसे यांनी केली आहे.

अन्नपूर्णा परिवारातील स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जन्मलेल्या आणि सध्या शाळा कॉलेजमध्ये शिकत असलेल्या तरूण पिढीला ''गांधीजी'' या आपल्या पुस्तकाद्वारे प्रा. कॉ. आनंद मेणसे यांनी, गांधी नेहरू द्वेषाने पछाडलेल्या, सध्याच्या इतिहासाला विकृत वळण देण्याच्या, वातावरणात एक नवे वैचारिक हत्यार दिले आहे.

अन्नपूर्णा परिवाराशी संबंधित कॉ. आनंद मेणसे याचे आम्ही म्हणूनच आभारी आहोत.

या पुस्तकास श्री.कुमार सप्तर्षी यांनी अत्यंत सुंदर अशी प्रस्तावना लिहली आहे. अमेरिकेच्या वास्तव्यातील त्यांच्या धावपळीच्या वेळा पत्रकातून त्यांनी वेळ काढून प्रा. कॉ. आनंद मेणसे आणि अन्नपूर्णा परिवाराच्या प्रेमापोटी त्यांनी प्रस्तावना लिहल्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

न्यू. एज. प्रिंटींग प्रेस मुंबई यांनी हे पुस्तक अल्पावधीत छापून दिल्याबद्दल त्याचेसुद्धा आम्ही आभार व्यक्त करीत आहोत.

**– सुरेश धोपेश्वरकर**

विश्वस्त

दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट – अन्नपूर्णा परिवार

# मनोगत

महात्मा गांधीजींच्यावर आजवर अनेकांनी लिहिले आहे. यामध्ये जसे भारतीय आहेत तसेच भारताबाहेरीलही आहेत. पुढील काळातही गांधीजींच्यावर लिखाण होत राहील. वेगवेगळ्या अंगाने ते होत राहील. एवढ्या मोठ्या प्रमाणावर लिखाण उपलब्ध असताना पुन्हा माझ्यासारख्याने गांधीजी या विषयावर का म्हणून लिहावे? हा एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

अगदी लहानपणापासून मी गांधीजींच्या विषयी ऐकत आलो. माझे वडील कॉ. कृष्णा मेणसे हे १९४६ साली गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात होते. आपले आयुष्य स्वातंत्र्य चळवळीसाठी द्यावे या उद्देशाने ते गांधीजींच्या आश्रमात दाखल झाले होते. तेथे कांही दिवस राहिल्यानंतर गांधीजींच्या सुचनेनुसार ते पवनार येथील आचार्य विनोबा भावे यांच्या आश्रमात राहिले. पुढे गांधीजी आणि विनोबाजी यांच्या सुचनेनुसार ते घरी परतले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी विचारपूर्वक साम्यवादी चळवळीत प्रवेश केला व आयुष्यभर कम्युनिस्ट पक्षाचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून वावरले. आज ते ९२ व्या वर्षीसुद्धा क्रियाशील आहेत. त्यांच्याकडून गांधीजींच्या विषयी खूप ऐकायला मिळाले. त्यांनी जरी आपला वेगळा मार्ग निवडला असला तरी त्यांच्या मनातील गांधीजी आणि विनोबाजी यांच्या विषयीचा आदर आजही कमी झालेला नाही. स्वाभाविकपणे आम्हा भावंडावरही हाच प्रभाव राहिला. आमच्या घरात मार्क्स, लेनीन यांच्या फोटोबरोबरच गांधीजींचाही फोटो आम्ही पहात आलो.

भारतासारखा खंडप्राय देश गांधीजींनी कसा काय चळवळीसाठी उभा केला असेल हा प्रश्न माझ्या मनात खूप वर्षे होता. कम्युनिस्ट चळवळीतील आणि गांधीवादी चळवळीतील अनेकांशी या विषयांवर चर्चा करण्याची संधीही मला मिळाली. या विषयावरचे वाचनही मी करु लागलो आणि त्यातून थोडे थोडे आकलनही मला होऊ लागले. गांधीजींनी सन १९१६ साली जे भाषण केले ते वाचून मी फारच प्रभावित झालो. पण याचीही मला जाणीव झाली की गांधीजींच्यावर बोलणारे, लिहिणारे या त्यांच्या भाषणाचा जोरकसपणे उल्लेख करीत नाहीत. मी तो उल्लेख करु लागलो आणि त्यास प्रतिसादही मिळू लागला. वेळोवेळी मी जे बोललो ते मी लिहून काढावे असा आग्रह माझे चळवळीतील मित्र करु लागले. त्यांच्या आग्रहाखातर मी लिहिण्याचे मान्य केले.

मी लिखाणास प्रवृत्त झालो ते आणखी एका कारणाने. गेल्या दहा वर्षांत गांधीजींना बदनाम करणाऱ्या आणि नथुराम गोडसेचा गौरव करणाऱ्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. नथुराम गोडसेंने जे केले तेच देशहिताचे होते आणि गांधीजींनी जे केले ते देशहिताचे नव्हते असे सांगणारे लोक वेगवेगळ्या माध्यमांचा आधार घेत पुढे येताना दिसत आहेत. त्यांचा आवाज, त्यांची आक्रमकता मोठी आहे. हे ध्यानात घेऊन मला असे वाटले की आपल्यापरीने आपण सत्य काय आहे हे मांडण्याचा प्रयत्न करावा. हा प्रयत्न म्हणजे हे पुस्तक.

अन्नपूर्णा महिला मंडळ पुणे या संस्थेच्या प्रेरणेने पुणे येथे कॉ. दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या डॉ. मेधा पुरव–सामंत यांनी हे पुस्तक लिहिण्याचा मला आग्रह केला. हे पुस्तक कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरेल अशापद्धतीने लिहिले जावे अशी सूचनाही केली. त्यांच्या या सुचनेनुसार हे पुस्तक शक्य तेवढ्या सोप्या भाषेत आणि कार्यकर्त्यांसाठी उपयुक्त ठरावे या उद्देशाने लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. कॉ. दादा पुरव रिसर्च रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटने माझे हे पुस्तक प्रकाशित करण्याची जबाबदारी घेतली त्याबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे

मनपूर्वक आभार.

पुस्तक लिहिताना अनेक मित्रांशी चर्चा केली. त्यांनी केलेल्या सुचनांचा स्वीकारही केला. त्याबद्दल मी त्यांचे मनपूर्वक आभार मानतो.

या पुस्तकाचे टंकलेखन करणारे माझे मित्र बसवंत पाटील यांनी मला या कामात सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही मनपूर्वक आभार.

**प्रा. आनंद मेणसे**

७०/२ आनंदी, पाईपलाईन

पहिला क्रॉस, सरस्वतीनगर, बेळगाव. ता.

जि. बेळगाव. पोस्ट हिंडलगा : ५९११०८

# प्रस्तावना

रामायण, महाभारत हे प्राचीन ग्रंथ. असंख्य कथाकार, कीर्तनकार, पुराणिक यांनी हे प्राचीन साहित्य नेटाने सामान्य जनतेपर्यंत पोचविले. त्यातून भारतीयांचा पिंड बनला. त्यामुळे भारतीय माणसाचे मन भूतकाळात सहज रमते. त्याला वर्तमान काळात आणण्यासाठी एका नव्या समर्थ ग्रंथाची गरज आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास खूप रोचक आहे. दीडशे वर्षांच्या प्रदीर्घ काळात घडलेला हा इतिहास आगळा वेगळा आहे. शस्त्रनिरपेक्ष सामुदायिक पुरुषार्थ  हा सशस्त्र युद्धाला पर्याय असू शकतो, हे जगाला पटले. युद्ध म्हणजे सर्वनाश! आत्मनाश, परनाश आणि सर्वनाश टाळून अन्यायाचा मुकाबला करता येतो, हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाने मानवी इतिहासात प्रथम सिद्ध केले. या लढ्याचे कुशल सेनापती म. गांधी यांना साऱ्या जगाने थोर महापुरुष म्हणून मान्य केले. भारताची ओळख 'गांधीचा देश' अशी बनली.

गांधी भारताचे राष्ट्रपिता म्हणून मान्य असले. तरी भारतातील एक विशिष्ट विचारधारा मानणारी मंडळी त्यांना ''सावत्र'' राष्ट्र पिता मानतात. त्यांना भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास प्रेरणादायक वाटत नाही. तो संघर्ष आपला होता असेही त्यांना वाटत नाही. ती मंडळी सध्या भारतात सत्तेवर आहेत. वास्तविक स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात महाभारतापेक्षा अधिक मोलाचे स्थान मिळायला हवे होते. परंतु त्याला निरुपण करणारे पुराणिक मिळाले नाहीत. या उलट म. गांधी यांचा द्वेष करण्याची शिकवण देणारे कीर्तनकार मात्र असंख्य आहेत. अहोरात्र न

थकता ते गांधींबद्दल असत्य कथन करीत असतात. राष्ट्रपित्याची हत्या करण्यात या विचारधारचे लोक धन्यता मानतात. खुनी नथूराम गोडसे यांचे ते उदात्तीकरण करतात. त्यांची मंदिरे त्यांना गावोगाव बांधायची आहेत. गांधींचा राष्ट्रपिता म्हणून आदर करणारे लोक नॉर्मल स्वभावाचे असतात. नथुराम गोडसेला शौर्यचा पुतळा, दैवी गुणांचा आदर्श पुरुष मानणारी प्रवृती ही मनोविकृती आहे.

दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती अमेरिकेने जपानवर अणुबॉम्ब टाकून केली. माणसाच्या मेंदूने तयार केलेले हे संहारक अस्त्र किती भयंकर आहे हे अणु स्फोटानंतर जगाला कळले. अण्वस्त्रांच्या वापरामुळे युद्ध अर्थहीन बनले. आगामी काळात त्यात कुणी पराभूत आणि कुणी विजयी होणे शक्यच नाही. शिवाय अण्वस्त्र युद्ध झाले तर ते दोन देशांपुरते मर्यादित राहणार नाही. तिसरे महायुद्ध घडलेच तर पृथ्वीवर मानव जात आणि सारी सजीव सृष्टी यांचा अंत होणार हे नक्की याची जाणीव जगाला झाली. त्यामुळे 'आता युद्ध नको' हा वैश्विक मूलमंत्र बनला. विसाव्या शतकातल्या दोनच घटना अत्यंत महान मानल्या जातात. एक म्हणजे माणसाने तयार केलेला अणुबॉम्ब आणि दुसरी घटना म्हणजे त्या मानवसंहाराला टाळण्यासाठी गांधी नावाचे उत्तर! युद्ध टाळले तरी अन्याय, जुलूम, विषमता यांच्या विरोधातील संघर्ष कसा टाळता येणार? त्यासाठी सत्याग्रहाचे नवे हत्यार गांधींनी जगा समोर ठेवले.

गांधींच्या चरित्र, चारित्र्य, विचारधारा यावर जगभर संशोधन अन ग्रंथलेखन चालू आहे. खूप अज्ञात पैलू व संदर्भ आता ज्ञात होत आहेत. जगाला गांधी अधिकाधिक मान्य होतोय. म्हणून तर दहा वर्षापूर्वी त्यांच्या जन्मदिन (२ ऑक्टोबर) ''जागतिक अहिंसा दिन'' म्हणून पालन करण्याचा युनो या संस्थेने ठराव संमत केला. २ ऑक्टोबर रोजी दरवर्षी प्रत्येक देशात अहिंसा दिनाचे पालन केले जाते. त्या निमित्ताने गांधी विचारांचे निरुपण केले जाते. एक सामान्य भारतीय माणूस वैश्विक झाला, याबद्दल भारतीयांना गर्व वाटला पाहिजे. पण भारतीयांच्या मनात खोलवर रुजलेला हा माणूस उखडून टाकण्याचा दुर्दैवी प्रयत्न चालू आहे. त्यासाठी एक विशिष्ट

विचारधारा असत्य सांगण्यासाठी कंबर कसून प्रयत्नशील आहे. ३० जानेवारी १९४८ रोजी पुण्यातील नथुराम गोडसे या माथेफिरू तरुणाने ७९ वर्षे वयाच्या एका नि:शस्त्र, पोलीस संरक्षण नाकारणाऱ्या वृद्ध गांधींची क्रूर हत्या केली. त्या नथुरामाच्या तेजस्वी बुद्धीचे आणि अतुलनीय शौर्याचे पोवाडे आजवर हिंदुत्ववादी मंडळी तारस्वरात गात आहेत.

नथुराम गोडसेला केवळ माथेफिरू म्हणून प्रश्नाचे स्वरूप स्पष्ट होत नाही. सामुदायिक माथेफिरुपणाचे नथुराम हे सामान्य व्यक्तीरूप आहे. सर्वसाधारण हिंदुत्ववादी व्यक्तीचे विचारविश्व नथूरामाच्या विचारविश्वापेक्षा वेगळे नसते. किशोर वयात स्वातंत्र्य लढ्यामुळे जुना भारतीय समाज ढवळून निघाला. तेव्हापासून आधुनिक भारत नावाच्या राष्ट्राच्या बांधणीला सुरवात झाली. तेव्हा जुन्या व नव्या  मूल्यांचा संघर्ष होणे अटळ होते. स्वातंत्र्य संग्रामाच्या काळातच आधुनिक भारताच्या संविधानाची पायाभरणी चालू होती. या परिस्थितीत उदयोन्मुख भारताचे चित्र रंगविणाऱ्या विचारधाराचा उदय झाला.

प्रमुख विचारधारा गांधीवादी होती. सर्वसमावेशकता हा या विचारधारेचा गाभा होता. अस्पृश्यते सारख्या क्रूर प्रथांचे उच्चाटन, सर्व धर्मांचा समान आदर, प्रजेचे नागरिकांमध्ये रुपांतर, लोकशाही प्रणाली, स्त्री-पुरुष समानता ही या विचारधारेची ठळक वैशिष्ट्ये! नवा भारत निर्माण करण्यासाठी सत्याग्रही पद्धतीने संघर्ष करण्याचे व्रत या विचारधारेने स्वीकारले होते. डावीकडे झुकलेला मध्यममार्ग ही तिची विशेषता होती.

दुसरी विचारधारा कम्युनिझमची होती. तिला आंतरराष्ट्रीय संदर्भ होता. श्रमिक वर्गाची एकजूट करणे हा या विचार धारेचा गाभा. त्याबाबत गांधीवादी विचारधारेशी त्यांचा काही मतभेद नव्हता. त्यांचा गांधींच्या अहिंसा या मूल्यांच्या आग्रहाशी मतभेद होता. कम्युनिस्टांना श्रमिक वर्गाची हुकूमशाही हवी होती. विषमता, अस्पृश्यता, शोषण, जातीयता यांच्या विरोधात मात्र कम्युनिस्ट व गांधीवादी यांच्यामध्ये मतैक्य होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एक विचारधारा होती. त्यांचा

गांधीवादी विचारधारेशी मूलभूत मतभेद नव्हता. फक्त त्यांना सवर्णाच्या दयाबुद्धीवर पूर्णत: अवलंबून राहणे पसंत नव्हते. ते गांधींना देशाचे नेते मानण्याऐवजी फक्त सवर्ण वर्गाचे नेते मानत सवर्णापेक्षा ब्रिटिशांच्या उदारमतवादावर व न्यायबुद्धीवर त्यांचा अधिक भरोसा होता.

वर नमूद केलेल्या दोन विचारधारा भिन्न दिसत्या तरी त्यांच्यामध्ये आंतरिक समानता आहे. धर्माचा आधार घेऊन राष्ट्र उभे करणाऱ्या हिंदुत्ववादी व इस्लामिक राष्ट्रवादी विचारधारा मात्र गांधीवादाशी पूर्णत: शत्रुत्वाचे नाते सांगणाऱ्या होत्या.

महात्मा गांधींची यंदा १५०वी जयंती. कॉम्रेड आनंद मेणसे यांनी लिहिलेले हे पुस्तक स्वातंत्र्यलढ्यातील सर्व विचारधारा आणि गांधींचे व्यक्तिमत्त्व यांचा नेमका परिचय करून देते. आज गांधींना समजून घेणे फार आवश्यक आहे. त्याची ऐतिहासिक गरज वाढली आहे. हिंदुत्ववादी विचारधारेच्या मंडळींनी देशाची सत्ता हस्तगत केली आहे. त्यांना साध्य-साधन यांचा मेळ अथवा हिंसा-अहिंसा यांचा विवेक मान्य नाही. त्यांनी राज्यघटनेची मोडतोड करून काश्मिरी जनतेवर लष्करी आक्रमण केले आहे. संसदेतील बहुमत म्हणजे लष्करी सामर्थ्याच्या बळावर लोकशाही नष्ट करण्याचा परवाना असे मोदी-शहा मानतात. त्यांनी काश्मिर राज्याचे केंद्रशासित प्रदेशात रूपांतर केले आहे. तेथील विधानसभा रद्दबातल केली आहे. या घटनेमुळे भारताचे मिनी हिंदू राष्ट्र बनले आहे. मुस्लीम द्वेष उंचीवर नेऊन त्यांनी बहुसंख्याकवादास वाट मोकळी करून दिली आहे. अंतिमत: आपण हिटलर निर्माण करणार आहोत. सर्वनाशाच्या दिशेने वेगाने वाटचाल चालू झाली आहे.

देशाचा बचाव करण्यासाठी गांधीवादी, आंबेडकरवादी आणि कम्युनिस्ट यांना एकजुटीने हिंदुत्ववादाला पराभूत करावे लागेल. त्यासाठी देशाला मुस्लीम द्वेषातून मुक्त करावे लागेल. त्याचा प्रारंभ गांधीद्वेषातून स्वत:ला मुक्त करण्यापासून होतो. या ऐतिहासिक गरजेमुळे या पुस्तकाचे मोल वाढले आहे. हे पुस्तक भारतीय राजकारणातील संघर्षाचे सम्यक दर्शन घडविते. द्वेषमुक्त मनाने हे पुस्तक वाचले तर आज आपले नेमके कर्तव्य काय आहे याचे ज्ञान होते. प्रत्येकाने अन्

विशेष करून युवकांनी हे पुस्तक वाचले पाहिजे.

कॉम्रेड आनंद मेणसे माझे मित्र आहेत. गांधींच्या आश्रमात राहून कम्युनिस्ट बनलेले कॉम्रेड कृष्णा मेणसे हे त्यांचे वडील. गांधीवाद आणि साम्यवाद या परस्परपूरक विचारधारा आहेत. आणि त्यांच्यामध्ये आंतरिक पातळीवर मैत्र आहे हे आग्रहाने सांगणारे पुस्तक लिहिल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार! दोन पिढ्यांत ज्यांचा पिंड गांधी व मार्क्स यांच्या छत्रछायेत तयार झाला असा हा लेखक! त्याच्याशिवाय असा ग्रंथ अन्य कोणाच्या लेखणीतून साकारणार? धन्यवाद!

**– कुमार सप्तर्षी**

## प्रकरण १

# बॅरिस्टर गांधी दक्षिण आफ्रिकेत

गांधीजी एप्रिल १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत गेले. दक्षिण आफ्रिकेतील दादा अब्दुल्ला यांना गुजराती आणि इंग्रजी भाषा जाणणारा एक वकील हवा होता. दादा अब्दुल्ला हे मुळचे भारतीय, गुजराती. त्यांचा दक्षिण आफ्रिकेत मोठा व्यापार होता. त्यांचे नातेवाईक असलेले व्यापारी सय्यदभाई यांच्या विरोधात त्यांचा खटला सुरु होता. गांधीजींना त्या काळात नोकरीची गरज होती. इंग्लंडमध्ये जाऊन त्यांनी बॅरिस्टर ही पदवी १८९१ साली संपादन केली होती. त्यानंतर मुंबईत येऊन वकिलीत जम बसविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मुंबई राहून वकिली करायची आणि आपल्या कुटुंबाला सहाय्य करायचे असा त्यांचा विचार होता. पण न्यायालयातील वातावरण तसेच कामाची पद्धत त्यांना मानवली नाही. याच काळात दादा अब्दुल्लांना दक्षिण आफ्रिकेतील त्यांच्या खटल्याचे कामकाज पाहण्यासाठी गुजराती आणि इंग्रजी भाषा जाणणारा वकील हवा होता म्हणून त्यांनी वृत्तपत्रात जाहिरात दिली. ती जाहिरात वाचून गांधीजींनी दादा अब्दुल्लांशी संपर्क साधला. त्यांच्या निमंत्रणावरुनच ते दक्षिण आफ्रिकेत दाखल झाले.

दक्षिण आफ्रिकेत भारतातून अनेक लोक गेले होते. त्यामध्ये तामिळ, गुजराती, मराठी, हिंदी, बंगाली असे विविध प्रांतातील लोक होते. असे म्हणता येईल की, एक छोटा भारतच तेथे वसला होता. हे लोक तेथे का

गेले हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. सन १८६० ते सन १८९० या काळात भारतात ठिकठिकाणी भीषण दुष्काळ पडला. लाखो लोक दुष्काळात मरण पावले. त्यावेळच्या संस्थानिकांनी प्रजेची काळजी घेतली नाही. ब्रिटीश नुकतेच स्थिरावले होते. त्यांनीही आपल्यावरील जबाबदारी पार पाडली नाही. त्यामुळे एका बाजूने अस्मानी संकट आणि दुसऱ्या बाजूने सुलतानी संकट यामध्ये जनता भरडली गेली. नेमके याच काळात दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश मळेवाल्यांना असे वाटले की, आपण उसाची लागवड करावी. ऊस पिकवावा आणि त्यापासून साखर आणि इतर रसायने निर्माण करावीत. या सर्व कामासाठी त्यांना उसाच्या शेतीचे ज्ञान असलेले कुशल शेतकरी, शेतमजूर हवे होते. असे कुशल शेतकरी आणि शेतमजूर दक्षिण आफ्रिकेत उपलब्ध नव्हते. जेव्हा त्यांना कळले की, भारतात असे शेतकरी आणि शेतमजूर उपलब्ध आहेत तेव्हा त्यांनी सरकारबरोबर पत्रव्यवहार केला. भारतातील शेतकरी, शेतमजूर दक्षिण आफ्रिकेत घेऊन जाण्याची परवानगी त्यांनी मिळविली. भारतातील ब्रिटिशांनी दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिशांशी हितसंबंध जपण्यासाठी अशी परवानगी दिली. दक्षिण आफ्रिकेतील मळेवाल्यांनी भारतात येऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. तुम्ही आमच्याकडे या, तेथे ऊस पिकवा आम्ही तुम्हाला चांगली वागणूक देऊ, पैसे देऊ, तेथे मालमत्ता करण्याची परवानगी देऊ असे आश्वासन दिले. भारतात तर भीषण दुष्काळ पडला होता. अशा काळात जर रोजगार मिळणार असेल तर आपण दक्षिण आफ्रिकेला का जाऊनये असा विचार करुन भारतीय शेतकरी दक्षिण आफ्रिकेत जायला तयार झाला. शेतकरी निघाले, त्यांच्या पाठोपाठ व्यापारी निघाले इतर व्यावसायिक निघाले. अशी माणसे दक्षिण आफ्रिकेत आली व जेव्हा तेथे स्थिरावली तेव्हा त्यांचे प्रश्न निर्माण झाले. जेव्हा कायदेशीर बाबी पुढे आल्या तेव्हा त्यांना वकिलांची गरज भासू लागली. भारतीय व्यापारी आपले हिशोब, पत्रव्यवहार भारतीय भाषेत ठेवत. दक्षिण आफ्रिकेतील व्यवहाराची भाषा इंग्रजी होती. त्यामुळे व्यापाऱ्यांना एक वकील स्थानिक तर एक वकील भारतीय भाषा जाणणारा ठेवावा लागायचा. दादा अब्दुल्लांना

गुजराती आणि इंग्रजी जाणणारा वकील हवा होता. जो त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वकीलाला मदत करु शकेल. दादा अब्दुल्ला यांना बॅरिस्टर मोहनदास करमचंद गांधी यांच्या रुपात असा वकील मिळाला. अशाप्रकारे गांधीजी वकीली करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत आले. तेथे ते तब्बल २२ वर्षे राहिले. सन १८९६ व सन १९०२ साली ते हिंदुस्थानात येऊन गेले.

भारतातील शेतकरी व इतर जे कोणी कामासाठी दक्षिण आफ्रिकेत जात तेव्हा त्यांना सरकारशी करार-ॲग्रीमेंट करावा लागे. अशाप्रकारे करारावर तेथे राहणाऱ्यांना 'ॲग्रीमेंटे' असे म्हणण्यात येऊ लागले. पुढे ॲग्रीमेंटे या शब्दाचा अपभ्रंष झाला तो 'गिरमिटे'असा. ब्रिटीश मात्र भारतातून आलेल्या सर्वांचाच म्हणजे शेतकऱ्यांपासून ते व्यापारी आणि वकिलांपर्यंत सर्वांचाच उल्लेख 'कुली' असा करीत. बॅरिस्टर गांधी जेव्हा प्रथम कोर्टात गेले तेव्हा त्यांच्या कानावर 'कुली बॅरिस्टर' असा शब्द आला. जो ऐकून ते थरारून गेले. करारपत्रानुसार हे गिरमिटे तेथे पाच वर्षे राहू शकत. भारतीय शेतकऱ्यांनी मेहनत करुन ऊस मळे पिकविले. अपार कष्ट करुन चार पैसे मिळविले. काहींनी तर घरे विकत घेतली. गाई, गुरे पाळली. जमले तर तेथेच रहावे, असा विचारही त्यांच्या मनात येऊ लागला. असे सारे सुरु असताना राज्यकर्त्यांच्या मनात मात्र वेगळाच विचार येऊ लागला. भारतीय शेतकरी, व्यापारी जेंव्हा दक्षिण आफ्रिकेत स्थिरावले तेंव्हा गोऱ्या वर्णद्वेषी राजवटीची नियत बदलली.

दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश राजवटीने भारतीय जनतेला दुय्यम स्थान देऊन त्यांचे शोषण करण्याची नीती अवलंबली. शोषण सहन करीत राहायचे असेल तर त्यांनी येथे रहावे अन्यथ: मायदेशी निघून जावे, अशी ती रणनीती होती. भारतीय शेतकरी, व्यापारी जर जाचाला कंटाळून निघून जातील तर त्यांची संपत्ती ब्रिटीशांना हडप करता येणार होती. यासाठी त्यांनी काही जाचक कायदे केले जे वर्णद्वेषावर आधारीत होते.

## वर्णद्वेषाचे स्वरुप

१) नाताळ प्रांतातील शासनाने सन १८९४ साली एक कायदा करुन हिंदी मजुरावर दरवर्षी २५ पौंड कर लादला. त्या काळात ही रक्कम फार मोठी होती. त्यावेळचे भारतातील व्हाईसराय लॉर्ड एलगिन यांनी भारतीय लोकांची बाजू घेत नाराजी व्यक्त केली. त्यामुळे हा कर ३ पौंडावर आणण्यात आला. एखाद्या मजुराच्या कुटुंबात जर चार माणसे असतील तर त्याला १२ पौंड कररुपात द्यावे लागत. मजुरासाठी ही रक्कम फार मोठी होती. गांधीजी नाताळमध्ये आल्यानंतर दुसऱ्या वर्षीच ही करप्रणाली लागू झाली. त्यांना हा एक धक्काच होता.

२) ट्रान्सवॉल या प्रांतातील हिंदुस्थानी लोकांसाठी जो कायदा करण्यात आला. त्यानुसार प्रत्येक भारतीय माणसाला ३ पौंडाचा कर द्यावा लागे.

अ) ट्रान्सवॉलमधील भारतीय लोकांना निवडणुकीत मताचा अधिकार नव्हता. सन १८९४ पूर्वी या लोकांना मताचा अधिकार होता तो काढून घेण्यात आला.

ब) फुटपाथवरुन चालण्याची त्यांना परवानगी नव्हती. केवळ गोरे लोकच फुटपाथवरुन चालू शकत.

क) भारतीय लोक रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करु शकत नसत.

## बॅरिस्टर गांधींना आलेला अनुभव

कोर्टाच्या आवारात त्यांच्या कानावर 'कुली बॅरिस्टर' असे शब्द येत. तसेच त्यांना एक जो प्रत्यक्ष अनुभव आला त्यामुळे गांधी हादरुन केले. पिटरमॉरित्सबर्ग स्टेशनवर पहिल्या वर्गाचे तिकीट काढून ते प्रवासासाठी रेल्वेच्या डब्यात बसले. दोन गोरी माणसे त्यांच्या जवळ आली हा डबा केवळ गोऱ्यां लोकांसाठीच राखीव आहे असे म्हणत त्यांनी गांधींना तेथून उठण्यास सांगितले. गांधीजींनी त्या दोघांना आपल्या जवळील पहिल्या

वर्गाचे तिकीट दाखविले व येथे बसण्याचा मला अधिकार आहे असे म्हटले. त्या गोऱ्या लोकांनी त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांचे सर्व प्रवासी साहित्य रेल्वेतून बाहेर फलाटावर फेकून दिले व त्यांनाही बाहेर ढकलून दिले. आपण कृष्णवर्णीय व भारतीय आहोत म्हणून आपणाला अशी वागणूक दिली जाते याची जाणीव त्यांना झाली आणि त्याचक्षणी त्यांनी निर्णयही घेतला की, आपण येथील वर्णद्वेषी कायद्यांच्या विरोधात लढायचे व न्याय मिळवायचा.

पाच वर्षांचा करार संपल्यानंतर भारतीय लोकांनी मायदेशी परत जावे असा आग्रह गोरी राजवट करु लागली. भारतीय लोक तर आता नुकतेच स्थिरावत होते. अशा काळात गोरी राजवट त्यांना त्रास देऊ लागली होती.

बॅरिस्टर गांधी हे सर्व पहात होते. हे सारेच अन्यायकारक आहे असे त्यांना वाटू लागले. पण त्यांना प्रथम दक्षिण आफ्रिकेत स्थीर व्हायचे होते. दादा अब्दुल्ला यांचे जे खटले कोर्टात सुरु होते त्यांचा त्यांनी मन लावून अभ्यास केला. अभ्यासाअंती त्यांचे असे मत झाले की, हे खटले कोर्टाबाहेर सामंजस्याने सोडविले जाता येणे सहज शक्य आहे. यासाठी त्यांनी दादा अब्दुल्ला यांचे मन वळविले. त्यांनी विरोधी पक्षालाही विश्वासात घेतले. त्यांचे खटले कोर्टाबाहेर मिटविले. यामुळे दोन्ही पक्ष खुष झाले. एक चांगला वकील भारतातून दक्षिण आफ्रिकेत आला आहे अशी प्रसिद्धी बॅरिस्टर गांधींना मिळाली. त्यांच्याकडे खटले घेऊन जे अशिल येत त्यांना ते आता मार्गदर्शन करु लागले. आपला जनसंपर्क वाढवू लागले. समाज समजून घेऊ लागले.असे करतानाच त्यांनी आपले वाचन वाढविले. बॅरिस्टर गांधी हळूहळू आता वकिलीतून बाहेर पडत सामाजिक कार्याकडे ओढले जाऊ लागले. समाजात मिसळल्यानंतर त्यांना अनेक सामाजिक प्रश्नांची जाणीव झाली आणि अन्यायांविरुद्ध आपण लढले पाहिजे, याची जाणीवही त्यांना झाली.

दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यात त्यांनी प्रचंड वाचन केले. त्यातील काही ग्रंथांचा त्यांच्या मनावर खूप प्रभाव पडला. असे म्हणता येईल की, या ग्रंथांनीच त्यांच्या राजकीय आणि सामाजिक चळवळींना दिशा दिली. यामध्ये

हेन्री डेव्हिड थोरो यांच्या **'रेजिस्टन्स टू सिव्हिल गव्हर्नमेंट'** या पुस्तकातून त्यांनी असहकार हे तत्त्व घेतले व त्या आधारे असहकार चळवळ उभी केली. लिवो टॉलस्टाय यांच्या **'दि किंगडम ऑफ गॉड इज विदीन यू'** या पुस्तकातून शाकाहार, संन्यासी जीवन, अ-राजकता, प्रतिसरकार ही तत्त्वे घेतली. सत्य हे तत्त्व त्यांनी विल्यम सॉल्टर यांच्या **'एथिकल रिलिजन'**या पुस्तकातून घेतले आहे. जॉन रस्किन यांच्या **'अन टू धीस लास्ट'** या ग्रंथातून सर्वोदय, सहकार, समता ही तत्त्वे घेतली. भगवत्गीतेचा त्यांच्यावर खोल प्रभाव होता. त्यांची योग साधना या ग्रंथावर आधारीत आहे.

## नाताळ इंडियन काँग्रेसची स्थापना

दक्षिण आफ्रिकेत भारतीय जनतेवर होत असलेल्या अन्यायाला विरोध करण्याचे ठरवून बॅरिस्टर गांधी यांनी २२ एप्रिल १८९४ रोजी नाताळ इंडियन काँग्रेस या संघटनेची स्थापना केली. एखाद्या व्यवस्थेला विरोध करायचा असेल तर तो एकट्याने करुन चालणार नाही. तर संघटितपणे तो केला जाऊ शकतो. या भावनेने त्यांनी ही संघटना स्थापन केली. त्या काळात भारतात इंडियन नॅशनल काँग्रेस ही संघटना कार्यरत होती. तिच्याच धर्तीवर दक्षिण आफ्रिकेत एक संघटना असावी या उद्देशाने त्यांनी ही संघटना स्थापन करुन वर्णद्वेषी व्यवस्थेला विरोध करण्याचे काम सुरु केले.

## दक्षिण आफ्रिकेतील काळा कायदा

दक्षिण आफ्रिकेतील काळा कायदा असे ज्याचे वर्णन बॅरिस्टर गांधी यांनी केले आहे. तो कायदा नेमका कसा होता? आठ वर्षांवरील प्रत्येक भारतीय माणसाने रजिस्ट्रार कार्यालयात जाऊन आपली नोंदणी करावी आणि परवाना घ्यावा असे त्या कायद्याचे स्वरुप होते. नावे नोंदविताना नावे नोंदविणाऱ्याची जात नमूद केली जाई. त्याच्या हाताच्या सर्व बोटांचे ठसे उमटवून घेतले जात. शरीरावरील खुणांची नोंद केली जाई. साधारणपणे गुन्हेगार व्यक्तीची नोंद

पोलीस ठाण्यात ज्याप्रकारे केली जाते त्याप्रमाणे हे सर्व करण्यात येई. हे सारेच अपमानास्पद होते. पोलीस विचारतील तेंव्हा भारतीय माणसाला परवाना दाखविणे बंधनकारक होते. जे परवाना दाखवू शकत नसत त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात येणार होती. असा हा कायदा होता. तो २२ ऑगस्ट १९०६ रोजी लागू करण्यात आला.

## विवाह विषयक कायदा

विवाह विषयक कायदा १४ मार्च १९१३ साली लागू करण्यात आला. हा कायदा तर अत्यंत भयावह असा होता. दक्षिण आफ्रिकेतील ज्यांचे विवाह ख्रिस्ती रिवाजाप्रमाणे झाले आहेत तेच आम्ही कायदेशीर मानू. इतर सर्व बेकायदेशीर असतील असे त्या कायद्याचे स्वरुप होते. यामुळे बिगर ख्रिस्ती भारतीय जनतेचे विवाह बेकायदेशीर ठरविण्यात आले. ज्यांचे विवाह बेकायदेशीर ठरतील त्यांची संतती अनौरस ठरेल व अशा अनौरस संततीस आपल्या आईवडिलांच्या मालमत्तेत हक्क मागता येणार नाही. अशाप्रकारे विवाह विषयक कायदा करुन भारतीय लोकांची मालमत्ता हडप करण्याचा वर्णद्वेषी सरकारचा कुटील डाव होता.

## भारतातून पाठिंबा मिळविण्यात यश

दक्षिण आफ्रिकेत राहूनही त्यांनी भारतातील नेत्यांशी सतत संपर्क ठेवला. सन १८९६ मध्ये भारतात येऊन मुंबईत त्यांनी तत्कालीन नेते व विचारवंत फिरोजशहा मेहता यांची भेट घेतली. दक्षिण आफ्रिकेतील परिस्थिती त्यांच्या कानावर घातली. त्यांच्याच सांगण्यावरुन पत्रकारांना देण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेची परिस्थिती आणि वर्णद्वेषी राजवटीने भारतीय जनतेवर लादलेले कायदे यांची माहिती देणारा मसुदा तयार केला व पत्रकारांना दिला. तसेच मान्यवर काँग्रेस नेत्यांनाही तो मसुदा देण्याची व्यवस्था केली. पुढे पुण्यात येऊन त्यांनी लोकमान्य टिळक, महादेव गोविंद रानडे, गोपाळ

कृष्ण गोखले आणि भांडारकर यांची भेट घेतली आणि दक्षिण आफ्रिकेतील परिस्थिती त्यांनी समजावून सांगितली. पुण्यात भांडारकरांच्या अध्यक्षतेखाली टिळक आणि गोखले यांनी सभा घेऊन गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत सुरु केलेल्या चळवळीला पाठिंबा दिला.

गांधीजींनी असे म्हटले आहे की, फिरोजशहा मेहता त्यांना हिमालयासारखे वाटले. लोकमान्य टिळक अथांग सागरासारखे तर गोपाळकृष्ण गोखले निर्मळ गंगेसारखे.

भारतीय नेत्यांचा पाठिंबा मिळवून गांधीजी पुन्हा दक्षिण आफ्रिकेकडे निघाले. दक्षिण आफ्रिकेत त्यावेळी गांधींच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न गोऱ्या लोकांनी केला होता. बॅरिस्टर गांधी भारतात जाऊन दक्षिण आफ्रिकेची बदनामी करत आहेत आणि म्हणून त्यांना चांगला धडा शिकविला पाहिजे, असे त्यांचे विरोधक म्हणू लागले. गांधीजींची बोट दरबान बंदरात दि. १९ डिसेंबर १८९६ रोजी पोहोचली. बॅरिस्टर गांधी दरबानला आले आहेत हे वृत्त गावात पसरताच दोन हजारावर गोरे लोक बंदराकडे धावून आले. बॅरिस्टर गांधी बोटीतून बाहेर येतातच कसे? त्यांनी परत जायला हवे. अशा आशयाच्या घोषणा ते देत होते. त्यामुळे गांधीजींना बोटीतून बाहेर येणे शक्य नव्हते. ते बोटीवरच तब्बल २३ दिवस अडकून पडले. पुढे जानेवारी १३ रोजी बॅरिस्टर गांधींना बोटीवर ठेवून घेऊन इतर प्रवाशांना खाली उतरविण्यात आले. थोडा प्रयत्न करुन निदर्शक शांत होतात काय? असेही पाहिले गेले आणि गांधीजींना अधिकाऱ्यांसोबत खाली उतरविण्यात आले. त्यावेळी निदर्शकांनी त्यांच्यावर टोमॅटो, अंडी यांचा मारा केला. त्यांना मारण्यासाठी लोक त्यांच्यावर धावून गेले. अशावेळी रुस्तुमजी नावाच्या एका पारशी गृहस्थाने त्यांना आपल्या घरात आश्रय दिला, संरक्षण दिले. पण लोकांनी घरालाच गराडा घालून ते जाळून टाकण्याची घोषणा केली. आता तेथून निसटणे गांधीजींना भाग होते. रुस्तुमजीं यांच्याजवळ पोलिसाचा गणवेश होता. तो गांधीजींनी चढविला आणि अगदी बेमालूमपणे प्रक्षुब्ध जमावातून वाट काढत गांधीजीं तेथून निसटले. ते इतक्या धिरोदातपणे

जमावातून चालत गेले की कोणालाही कल्पना आली नाही. गांधीजींना मारण्याचा हा दुसरा प्रयत्न होता. पहिला प्रयत्न दक्षिण आफ्रिकेतच मीर आलम या पठाणाने गैरसमजुतीतून केला होता.

१९०२ साली गांधीजींनी पुन्हा एकदा भारतात आले ते राष्ट्रीय काँग्रेसच्या कोलकाता येथील राष्ट्रीय अधिवेशनात भाग घेण्यासाठी. दिनशॉ वाच्छा हे अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनात गांधीजींनी त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेने न्यायासाठी सुरु केलेल्या लढ्याची माहिती दिली आणि त्याचा परिणाम म्हणून प्रथमच राष्ट्रीय काँग्रेसने दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेला पाठिंबा देणारा ठराव संमत केला. अशाप्रकारे गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेचे प्रश्न वैश्विक पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला. आपल्या कोलकात्यातील वास्तव्यात त्यांनी स्वामी विवेकानंदांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी स्वामीजी खूप आजारी होते. त्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही.

❑❑❑

## प्रकरण २

# गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत केलेले लढे

### सत्याग्रहाचे तत्त्व

दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेचे संघटन करुन वर्णद्वेषी शासनाच्या विरोधात लढण्याचा निर्णय गांधीजींनी घेतला. यासाठी त्यांनी सत्याग्रहाचे तत्त्व विकसित केले. गांधीजींवर लिओ टॉलस्टाय यांच्या विचारांचा प्रभाव होता. 'पॅसिव्ह रेजिस्टन्स' ही कल्पना त्यांनी टॉलस्टाय यांच्या विचारातून घेतली. गांधीजींनी त्याला 'सविनय प्रतिकार' असे म्हटले आहे. पुढे याचेच रुपांतर सत्याग्रहात झाले. गांधीजींच्या म्हणण्यानुसार सत्याग्रह करताना मनात व्यक्तीद्वेष असता कामा नये. आपला विरोध हा तत्त्वांना असावयास हवा. सत्याग्रह सुरु करण्याआधी समोरील पक्षाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले पाहिजे. त्यानंतर आपली भूमिका त्या पक्षापुढे मांडली पाहिजे. समझोता झाला नाही तरच आंदोलनाचे पाऊल उचलावे. आंदोलन पूर्णपणे अहिंसक असावयास हवे. असा विचार करुन गांधीजींनी आपल्या कामाला सुरुवात केली. दक्षिण आफ्रिकेत वास्तव्य करणाऱ्या भारतीय लोकांना सन्मानाने जगता आले पाहिजे हे पटवून देण्यासाठी एका सहकारी मित्राला घेऊन ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी मान्यवर नेत्यांची भेट घेतली. दक्षिण आफ्रिकेतील परिस्थिती समजून सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्या नेत्यांनी त्यांना अजिबात

प्रतिसाद दिला नाही आणि म्हणून त्यांनी दक्षिण आफ्रिकेत परत आल्यावर 'पॅसिव्ह रेजिस्टन्स असोसिएशन' या नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेच्यावतीने त्यांनी सत्याग्रहाचे अस्त्र उगारले. सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. चळवळ सुरु करताच सरकारने त्यांना अटक करुन खटला भरला.

## गांधीजींचे वेगळेपण

न्यायालयात खटला सुरु होताच गांधीजींनी न्यायमूर्ती महाराजांना एक विनंती केली. ते म्हणाले की, माझ्याबरोबर इतरही अनेकांवर खटला भरण्यात आला आहे. आम्ही आमचे गुन्हे कबूल करतोच. त्यानुसार आपण शिक्षाही द्यावी. येथे माझी आपणाला विनंती आहे की माझ्या सांगण्यावरुन माझ्या मित्रांनी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला आहे. त्यामुळे शिक्षा देताना त्यांच्यापेक्षा थोडी अधिक शिक्षा मला मिळावी. त्यांचे हे म्हणणे ऐकून न्यायमूर्तींना आश्चर्य वाटले. तुरुंगात जाणारा प्रत्येकजण आपली शिक्षा कमी करण्याची विनंती करतो. येथे तर गांधीजी आपली शिक्षा वाढवा असे म्हणत होते. न्यायमूर्ती निकाल देताना असे म्हणाले की अशी काही कायद्यात तरतूद नाही. त्यामुळे सर्वांना सारखीच शिक्षा द्यावी लागेल.

न्यायमूर्तींच्या निकालानुसार सर्वांना दोन महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली. तो दिवस होता २७ ऑक्टोबर १९०९.

## फिनिक्स आश्रमची स्थापना

दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी राजवटीविरोधात आंदोलन उभे करण्यासाठी गांधीजींनी फिनिक्स आश्रमाची स्थापना सन १९०४ साली केली. फिनिक्स रेल्वे स्टेशनजवळ ही जागा असल्याने त्यास 'फिनिक्स' हे नाव देण्यात आले. हा आश्रम जोहान्सबर्ग शहरापासून ३०० मैल दूर आहे. येथे कार्यकर्ते वास्तव्यास असत. आश्रमात गांधीजी त्यांना आपली सैद्धांतिक भूमिका

समजावून सांगत. एका टप्प्यावर त्यांना असे जाणवले की जे आपण आश्रमातील कार्यकर्त्यांना समजून सांगतो ते केवळ त्यांच्यापुरतेच मर्यादित न राहता दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेपर्यंत जाण्याची नितांत गरज आहे. यासाठी त्यांच्याकडे त्यावेळी एकमेव मार्ग उपलब्ध होता. तो म्हणजे वृत्तपत्र सुरु करण्याचा. 'इंडियन ओपिनियन' हे साप्ताहिक त्यांनी १९०४ साली चालविण्यास घेतले. हे साप्ताहिक पूर्वी सुरु होते. गांधीजी या साप्ताहिकास आपल्यापरीने आर्थिक मदत करीत असत. आता त्यांनी ते आपणाकडे घेतले. इंग्रजी, हिंदी, गुजराती आणि तामिळ या चार भाषांमधून ते प्रकाशित होई. कारण या भाषा जाणणाऱ्यांची संख्या अधिक होती. इंडियन ओपिनियनमधून गांधीजी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेचे प्रश्न मांडू लागले. याबरोबरच सत्याग्रहाची कल्पना, त्याचे तत्त्व, अहिंसा, शाकाहाराचे महत्त्व या विषयीसुद्धा ते लिहू लागले. त्यांनी असे म्हटले आहे की, इंडियन ओपिनियनवर त्यांचा विशेष जीव होता. या छोट्याशा वृत्तपत्राने दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेमध्ये मोठी जागृती घडवून आणली. फिनिक्स आश्रमाची स्थापना झाल्यानंतर त्यांनी आपली वकिली थांबविण्याचा निर्णय घेतला. त्या काळात त्यांची प्राप्ती दरमहा ५ ते ६ हजार पौंड इतकी असायची. त्यावेळी ती रक्कम खूप मोठी होती. या रकमेवर पाणी सोडून ते पूर्णवेळ चळवळीत उतरले. फिनिक्स आश्रमात काम करणाऱ्या प्रत्येकाला दररोज सायंकाळी तीन पौंड रक्कम दिली जाई. गांधीजी स्व:ताही ३ पौंडच घेत. या तीन पौंडामध्ये आपला चरितार्थ चालवत. श्रम आणि अनुशासन यावर त्यांनी भर देऊन कार्यकर्ते घडविणे तेथे सुरु केले.

## टॉलस्टॉय फार्म

फिनिक्स आश्रम जोहान्सबर्गपासून बराच दूर असल्यामुळे त्यांनी १९१० मध्ये जोहान्सबर्गजवळ ११०० एकर जागेत टॉलस्टाय फार्म सुरु केला. फिनिक्स आश्रमाप्रमाणेच टॉलस्टाय फार्मसुद्धा एक प्रयोगशाळाच होती. या प्रयोगशाळेत गांधीजींनी शेती, आरोग्य, शिक्षण, आहार याविषयीचे अनेक

प्रयोग केले. या साऱ्या प्रयोगातून त्यांना जे आकलन झाले ते त्यांनी आपल्या हिंद स्वराज्य या पुस्तिकेत मांडले आहेत. ही पुस्तिका सन १९०९ साली लिहिली. इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेकडे परत येताना प्रवासात त्यांनी ही पुस्तिका लिहिली आहे. त्यांचे सारे तत्त्वज्ञान तसेच कार्यक्रम या पुस्तिकेत त्यांनी अतिशय सोप्या भाषेत मांडला आहे.

## अनुभवातून आलेले शहाणपण

आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळात गांधीजींना जे अनुभव आले त्यातून ते शिकत गेले. जनरल स्मट याने गांधीजींना बदनाम करुन त्यांचे आंदोलन मोडून काढण्याचा डाव टाकला. त्याने 'ट्रान्सवॉल लिडर' या वृत्तपत्राचे संपादक कार्ट राईट यांना गांधीजींकडे मध्यस्थीसाठी पाठविले. भारतीय लोकांनी आपणहून जर नोंदणी केली तर पुढील काळात आम्ही काळा कायदा मागे घेण्याचा विचार करु. असा प्रस्ताव जनरल स्मट याने कार्ट राईट यांच्यामार्फत ठेवला. गांधीजींनी आपल्या तत्त्वांनुसार कार्ट राईट यांच्यावर विश्वास ठेवला व भारतीय जनतेला रजिस्ट्रार कार्यालयात जाऊन नावे नोंदविण्याचे आवाहन केले. पण जनतेला गांधीजींची भूमिका मान्य झाली नाही. मीर आलम नावाच्या एका पठाणाने संतापून जाऊन गांधीजींच्यावर लाठीने हल्ला केला. पण गांधीजी बचावले. गांधीजींनी मीर आलमच्याविरोधात पोलिसी कारवाई करावी, असे अनेकांनी त्यांना सुचविले पण गांधीजींनी त्यास नकार दिला. माझ्या सहवासात राहिल्यावर मीर आलमला माझी भूमिका पटेल या आपल्या मतावर ते ठाम राहिले. कार्ट राईटला दिलेल्या आश्वासनानुसार त्यांनी परवानाही काढला. पण पुढे विपरीत घडले जनरल स्मटने दिलेले आश्वासन पाळले नाही. त्याने काळा कायदा मागे घेण्यास ठाम नकार दिला. गांधीजींनी भारतीय जनतेला जे आश्वासन दिले होते ते कार्ट राईट याच्या भरवशावर. त्याने आश्वासनाची पूर्तता करण्यास असमर्थता दाखविली. आपण आता पूरते फसविले गेलो आहोत याची जाणीव गांधीजींना झाली आणि त्यांनी पुन्हा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला.

## कस्तुरबा आंदोलनात

वर्णद्वेषी राजवटीने जो विवाहविषयक कायदा करुन भारतीय जनतेला अस्वस्थ केले होते. त्याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा निर्णय गांधीजींनी घेतला. यावेळी त्यांनी महिलांना आंदोलनात उतरविण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपली पत्नी कस्तुरबा हिला विश्वासात घेतले. तुम्ही आंदोलनात उतरलात तर इतर महिलासुद्धा आंदोलनात उतरतील असे म्हणत त्यांनी कस्तुबांना आंदोलनात उतरविले. कस्तुर आंदोलनात येतात म्हटल्याबरोबर इतरही महिला आंदोलनात उतरल्या. त्यावेळी कस्तुरबांना अटक करण्यात आली. त्यांना पिटरमॉरित्सबर्ग येथील तुरुंगात ठेवण्यात आले. त्यांच्यासोबत असलेल्या इतर महिलांनाही त्याच तुरुंगात ठेवले गेले. तुरुंगातील व्यवस्था अतिशय खराब होती. तुरुंगात राजबंद्यांना अगदी गुन्हेगाराप्रमाणे वागविले जाई. तुरुंगातून आल्यावर कस्तुरबा खूप आजारी पडल्या. त्यांची एक सहकारी वलीअम्मा तर मरण पावली. याबाबत गांधीजींनी म्हटले आहे की, वलीअम्मा ही वर्णद्वेषविरोधी चळवळीतील हुतात्मा आहे.

## अंतिम लढ्याला सुरुवात

दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी सरकार नमत नाही, काळे कायदे मागे घेत नाही म्हणून आता लढ्याचे अस्त्र उगारण्याचा निर्णय घेऊन बॅरिस्टर गांधी कामाला लागले. अंतिम अस्त्र उगारण्याआधी त्यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांना दक्षिण आफ्रिकेत येण्याचे निमंत्रण दिले. गोखले यांचा अनुभव मोठा होता. त्यांचा दबदबाही जबरदस्त होता म्हणून ते दक्षिण आफ्रिकेत येऊन मार्गदर्शन करतील तर लढ्याला वेगळीच धार येईल, असे बॅरिस्टर गांधींना वाटले. गांधीजींच्या निमंत्रणाचा स्वीकार करुन गोखले १९१२ साली दक्षिण आफ्रिकेत आले. केपटाऊन, जोहान्सबर्ग, प्रिटोरिया येथे त्यांच्या सभा

झाल्या. या सभांना भारतीय जनतेने प्रचंड प्रतिसाद दिला. गोखले यांच्या येण्यामुळे भारतीय जनतेत उत्साहाबरोबरच आत्मविश्वासही निर्माण झाला. गोखले यांनी दक्षिण आफ्रिकेतील जनरल बोथा आणि जनरल स्मट यांच्याशी वर्णद्वेषी कायद्याबाबत चर्चा केली. हे कायदे अमानवी असल्यामुळे मागे घेतले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. जनरल बोथा आणि जनरल स्मट यांनी कायदे मागे घेण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर गोखले मायदेशी परतले. पुढे मात्र वेगळेच घडले. जनरल स्मट आणि जनरल बोथा यांनी गोखले यांना दिलेला शब्द फिरवला. जनतेचा विश्वासघात केला. जे घडले ते गांधीजींनी गोपाळ कृष्ण गोखले यांना पत्राद्वारे कळविले. गोखले विनाविलंब पुन्हा १९१३ साली दक्षिण आफ्रिकेत दाखल झाले. त्यांनी पुन्हा जनरल स्मट आणि जनरल बोथा यांच्याशी चर्चा केली व त्यांना कर मागे घेण्यास भाग पाडले.

## लाँगमार्च

दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश राजवट आश्वासने देते पण त्यांची पूर्तता करत नाही. अशावेळी काय करायचे याचा विचार बॅरिस्टर गांधी करीत होते. बॅरिस्टर गांधींनी आपले कार्यक्षेत्र विस्तारले होते. त्यांनी खाणीत काम करणाऱ्या कामगारांची संघटना बांधली होती. खाण कामगारांमध्ये भारतीय कामगारांची संख्या बऱ्यापैकी मोठी होती. दक्षिण आफ्रिकेतील नगरपालिकांमध्ये जे सफाई कामगार होते ते भारतीय दलित होते. त्यांचीही संघटना बॅरिस्टर गांधींनी बांधली होती. या सर्वांनाच घेऊन आता आंदोलनाचा बडगा उगारायचा असा निश्चय त्यांनी केला आणि लाँगमार्च काढायचा निर्णय घेतला. चळवळीचे केंद्र असलेल्या जोहान्सबर्गपासून त्यांनी लाँगमार्चला सुरुवात केली. यामध्ये ५ हजार लोक सहभागी झाले होते. या सर्वांची व्यवस्था करणे हे कठीण काम होते. ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी स्वयंसेवक पथके स्थापन केली. स्वयंपाक करणे आणि वाढणे यासाठी यंत्रणा उभी केली. एक पथक तर केवळ साफसफाईचे काम करण्यासाठी होते. दि. ६

नोव्हेंबर १९१३ रोजी हा लाँगमार्च चार्ल्स्टाऊनला पोहोचला. लाँगमार्च अडविण्यासाठी ब्रिटिशांनी मोर्चावर लाठीमार करुन पाहिला. घोडेस्वारांचे पथक मोर्चावर घातले पण मोर्चेकऱ्यांनी अहिंसक पद्धतीने त्याचा प्रतिकार केला. मोर्चाच्या कालावधीत बॅरिस्टर गांधींना चार दिवसात तीनवेळा अटक करण्यात आली. त्यांच्यावर खटला घालून त्यांना सोडण्यातही आले. पुढे त्यांना तीन महिने तुरुंगात ठेवण्यात आले. पण लाँगमार्च थांबला नाही. कार्यकर्त्यांनी तो सुरुच ठेवला. काही मोर्चेकऱ्यांना अटक करुन खाणीवर कामासाठी जबरदस्तीने पाठविले. तेव्हा बॅरिस्टर गांधींनी खाण कामगारांना संपावर जाऊन लाँगमार्चमध्ये सामील होण्याचे आवाहन केले. त्यामुळे खाणी बंद झाल्या. पुढे बॅरिस्टर गांधींनी नगरपालिकांच्या सफाई कामगारांना संपावर जाण्याचा आदेश दिला. त्यामुळे सफाई कर्मचारी संपात उतरले. ते संपात उतरल्यामुळे सर्व शहरांतून अस्वच्छता पसरली आणि आरोग्याची समस्या निर्माण झाली. यामुळे ब्रिटीश राजवटीची चांगलीच कोंडी झाली. संतापलेल्या राज्यकर्त्यांनी मोर्चेकऱ्यांवर दहशत बसविण्यासाठी गोळीबार केला. या गोळीबारात अनेकजण जखमी झाले. काही मरण पावले. या गोळीबाराची बातमी जगभर पसरली आणि ब्रिटीशांच्या जुलमी अत्याचाराचा निषेध झाला. जगभर होत असलेला निषेध आणि हाताबाहेर चाललेली दक्षिण आफ्रिकेतील परिस्थिती यामुळे जेरीस आलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने शेवटी बॅरिस्टर गांधींशी वाटाघाटी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार वाटाघाटी केल्या. बॅरिस्टर गांधींनी केलेल्या सर्व मागण्या ब्रिटीश शासनाने मान्य केल्यावर दि. २१ जानेवारी १९१४ रोजी गांधीजींनी आपले आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात दक्षिण आफ्रिकेतील भारतीय जनतेचा विजय झाला.

तुरुंगात असताना बॅरिस्टर गांधींना पाहण्यासाठी जनरल स्मट येत असे. तुरुंगातील कैद्यांची पाहणी करणे हे त्याचे काम असायचे. तो तुरुंगात आला असता बॅरिस्टर गांधींनी एका कागदावर त्याच्या पायाचे ठसे घेतले आणि त्याच्यासाठी कातड्याचे सँडल बनविले. तुरुंगातील आपल्या वास्तव्यात

बॅरिस्टर गांधी शिवणकला, चर्मकला शिकले. इतरही अनेक कला त्यांनी तुरुंगात असताना आत्मसात केल्या. तुरुंगातून मुक्त झाल्यावर ते जनरल स्मटच्या घरी गेले आणि त्याच्यासाठी तयार केलेले सँडल्स त्याला भेट म्हणून दिले. सँडल पाहून जनरल स्मट गहिवरला. लाँगमार्चच्या काळात त्याने बॅरिस्टर गांधींना अटक करुन खूप त्रास दिला होता आणि त्याची परतफेड अशाप्रकारे बॅरिस्टर गांधी सँडल्सची भेट देऊन करीत होते. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत राहून सत्याग्रहाचे तत्त्व विकसित केले. या तत्त्वांनुसार सत्याग्रहीने कोणाचाही द्वेष करायचा नसतो. या तत्त्वांनुसार गांधीजी जनरल स्मट याच्याशी वागले. या सँडल्समध्ये जनरल स्मटने कधीही पाय घातला नाही. त्याने या सँडल्ससाठी छानसे कपाट करुन घेतले आणि त्या कपाटात त्याने त्या सँडल्स ठेवले. जनरल स्मट असे म्हणतो की, जगातील कोणतीही शक्ती बॅरिस्टर गांधींच्या सत्याग्रही आंदोलनाला हरवू शकणार नाही. जनरल स्मटने गांधीजींनी दिलेले सँडल्स नंतर जोहान्सबर्ग येथे तयार करण्यात आलेल्या महात्मा गांधी संग्रहालयास भेट म्हणून दिले. आजही ते सँडल्स तेथे पहायला मिळतात. दक्षिण आफ्रिकेने महात्मा गांधी संग्रहालयात त्यांची पुस्तके, त्या काळात वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची कात्रणे, छायाचित्रे गांधीजींच्या काही वस्तू जतन करुन ठेवल्या आहेत.

दक्षिण आफ्रिकेतील आंदोलन संपवून केव्हा ना केव्हा आपणाला भारतात जावयाचे आहे असे बॅरिस्टर गांधींना वाटत असे. दक्षिण आफ्रिकेत जसे भारतीय जनतेचे अनेक प्रश्न होते तसेच तेथील कृष्णवर्णीय आफ्रिकन जनतेचेही गंभीर प्रश्न होते. ब्रिटीश राजवट या कृष्णवर्णीय जनतेवर नेहमीच अत्याचार करीत असे. कृष्णवर्णीय जनतेने आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात लढले पाहिजे असा विचार ते दक्षिण आफ्रिकेत असताना व्यक्त करीत असत. त्यांच्याच पुढाकाराने सन १९१२ मध्ये 'आफ्रिकन नॅशनल काँग्रेसची' स्थापना करण्यात आली. अशाप्रकारे तेथील जनतेला लढण्याची प्रेरणा गांधीजींनी दिली. गांधीजींची सर्व वैचारिक जडणघडण ही दक्षिण आफ्रिकेत झाली. दक्षिण आफ्रिकेचे स्वातंत्र्ययोद्धे नेल्सन मंडेला यांनी

गांधीजींच्या विषयी बोलताना असे म्हटले आहे की, भारताने आम्हाला बॅरिस्टर गांधी दिले, आम्ही भारताला महात्मा गांधी दिले.

दक्षिण आफ्रिकेतील आपले काम आता संपले आहे आणि आता आपण भारतात जावयास हवे आणि तेथे सुरु असलेल्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घ्यावयास हवा असे मनोमन वाटल्याने गांधींजींनी भारतात येण्याचा निर्णय घेतला.

❐❐❐

**प्रकरण ३**

# भारतात आगमन

दि. ५ जानेवारी १९१५ रोजी गांधीजींचे भारतात आगमन झाले. मुंबई बंदरात ते येताच भारतीय जनतेने त्यांचे भव्य स्वागत केले. गांधीजी भारतात आले ते एका विजयी योद्ध्याच्या स्वरुपात. हरिद्वारच्या कांगडी गुरुकुलाच्या आचार्यांनी सर्वप्रथम त्यांचा 'महात्मा' असा उल्लेख केला. मुंबईतील स्वागताचा स्वीकार करुन थेट त्यांनी पुणे गाठले. आपले गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांना भेटण्यास ते उत्सूक होते. गोखल्यांनी गांधींचे स्वागत केले. चर्चा केली. भारताच्या राजकारणात जर तुम्हाला सहभागी व्हायचे असेल तर आधी संपूर्ण भारत मनापासून पाहून घ्या, समजून घ्या असा सल्ला त्यांनी गांधीजींना दिला. आपणाला लगेचच एक आश्रम काढावयाचा आहे. असे गांधीजींनी गोखले यांना सांगितले. यावर प्रतिक्रिया देताना गोखले म्हणाले की, आश्रम कोठेही काढा त्यास आम्ही मदत करु. एवढे बोलून त्यांनी आपले सहकारी डॉ. देव यांना बोलावून घेतले आणि तशा सूचनाही दिल्या. गांधीजींनी दि. २१ मे १९१५ रोजी गुजरातमधील कोचरब येथे आश्रमाची स्थापना केली. 'सत्याग्रह आश्रम' असे त्याचे नाव ठेवण्यात आले. या आश्रमात एकूण २५ माणसे होती. १३ जण तामिळी होते तर ५ लहान मुले होती. तीही तामिळी होती. हे सर्वजण दक्षिण आफ्रिकेतून आले होते. आपल्या जुन्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन गांधीजी पुन्हा नव्याने कामाला लागणार होते. गोखले मात्र हा आश्रम पाहण्यासाठी हयात नव्हते. त्यांचे दि. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी निधन झाले.

आपले गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांचा उपदेश मान्य करुन गांधीजींनी संपूर्ण भारत पाहण्याचा आणि समजून घेण्याचा प्रयत्न केला. हा देश प्रथम समजून घ्यावा आणि नंतरच या देशाबद्दलची आपली मते आपण बनवावीत असा विचार त्यांनी केलेला होता. शहरे पाहण्यापेक्षा त्यांनी ग्रामीण भाग पाहण्यावर भर दिला. ग्रामीण भागात गेल्यावर तेथील दलित वस्ती पाहणे तेथील जनतेशी संवाद साधणे याला त्यांनी महत्त्व दिले आणि त्यानंतरच त्यांनी आपली रणनीती ठरविली.

## गांधीजींचे पहिले भाषण
## त्यांचा राजकीय जाहीरनामा

गांधीजींचे पहिले भाषण बनारस येथे ६ फेब्रुवारी १९१६ साली झाले. पंडित मदनमोहन मालवीय यांनी पुढाकार घेऊन बनारस येथे विद्यापीठाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला होता. बनारस हिंदू विद्यापीठ असे या विद्यापीठाचे नामकरण करण्यात आले होते. हे विद्यापीठ ४ फेब्रुवारी १९१६ रोजी स्थापन झाले. ६ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ त्यांनी आयोजित केला होता. या विशेष समारंभास भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड हर्डिंग, ज्येष्ठ नेत्या ॲनी बेझंट, दरभंगा संस्थानचे महाराजा यांना त्यांनी निमंत्रित केले होते. उत्तर भारतातील संस्थानिक, जहागिरदार, वतनदार, व्यापारी यांनीही या पायाभरणी समारंभास उपस्थित रहावे, असा त्यांचा प्रयत्न होता. तो यशस्वीही झाला. त्यांनी गांधीजींनाही या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले होते. दक्षिण आफ्रिकेत राहून आलेला एक बॅरिस्टर अशी ख्याती त्यांची झालेली असल्याने पंडित मालवीय यांनी त्यांना निमंत्रित केले होते. या सभेत त्यांचे छोटेसेच भाषण झाले. जे खूप गाजले. असे म्हणता येते की, तोच त्यांचा राजकीय जाहीरनामा होता. आपल्या छोटेखानी भाषणाने त्यांनी भारतात मोठी खळबळ उडवून दिली.

आपल्या भाषणात गांधीजी म्हणाले की,

१) बनारस हिंदू विद्यापीठाने मातृभाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था करावयास हवी. जेणेकरुन सामान्य कुटुंबातील मुले मातृभाषेतून शिक्षण घेऊ शकतील.

२) विश्वनाथ मंदिरात मी जाऊन आलो. त्या परिसरात प्रचंड घाण आहे. एवढ्या घाणीत देव कसा काय राहू शकतो? स्वतंत्र भारत आपणाला स्वच्छ ठेवायचा आहे.

३) बनारस शहरात फिरताना मला असे जाणवले की, सर्वत्र गुप्त पोलीस फिरत आहेत. लॉर्ड हर्डींग यांना कोणाची भीती वाटते म्हणून एवढे पोलीस त्यांनी ठेवले आहेत. अशा भीतीच्या छायेत वावरण्यापेक्षा मेलेले बरे नव्हे काय?

४) ब्रिटिशांनी हिंदुस्थानातून निघू जावे. आम्हाला स्वतंत्रपणे राहू द्यावे, जाताना कसलाही हिंसाचार होणार नाही याची त्यांनी काळजी घ्यावी.

५) सभामंडपात जे संस्थानिक, जहागिरदार, वतनदार, जमिनदार बसले आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर या सर्वांनी संपत्तीचे विश्वस्त व्हायचे आहे. त्यांच्या अंगावर जे दागिने, भरजरी वस्त्रे आहेत. ती सर्व शेतकऱ्यांच्या घामातून आणि रक्तातून तयार झाली आहेत हे त्यांनी ध्यानात ठेवावे.

गांधीजींचे भाषण सुरु असताना उपस्थितांमध्ये मोठी खळबळ माजली. ॲनी बेझंट यांनी त्यांचे भाषण थांबविण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड हर्डींग तर कमालीचे नाराज झाले. पं. मदनमोहन मालवीय यांनाही काही सूचेनासे झाले. संस्थानिक उठून जाऊ लागले. गांधीजींनी मात्र कोणाचीही पर्वा न करता आपले भाषण सुरु ठेवले. आपले विचार स्पष्टपणे मांडूनच त्यांनी भाषण थांबविले.

त्यांच्या भाषणाचा वृत्तांत वृत्तपत्रात सविस्तरपणे छापून आला. दक्षिण आफ्रिकेतून आलेले हे बॅरिस्टर काहीतरी वेगळा विचार मांडत आहेत असे सर्वांनाच वाटले. गांधीजींनी आपल्या पहिल्या-वहिल्या भाषणातच तीन

आघाड्यावर लढाई सुरु केली. ब्रिटीशांनी हिंदुस्थानातून निघून जावे असे म्हणून त्यांनी ब्रिटिशांविषयीची आपली भूमिका स्पष्ट केली. संस्थानिकांनी आता आपल्याकडील संपत्तीचे विश्वस्त झाले पाहिजेत असे म्हणून संस्थानिकांविषयीची भूमिका मांडली. जी पूर्वी कोणीही मांडलेली नव्हती. त्या काळात हिंदुस्थानात लहान मोठी अशी ५६५ संस्थाने होती. संस्थानिक स्वत:स सार्वभौम समजत. मोठी संस्थाने तर आपले सैन्य बाळगून असत. त्यांचे राष्ट्रध्वजही असायचे. त्यांना असे वाटत असे की, ब्रिटीश हिंदुस्थानातून निघून गेल्यावर पुन्हा आपण स्वतंत्र आणि सार्वभौम राजे होऊ त्यांच्या या समजुतीला गांधीजींनी धक्का दिला. गांधीजींच्यावरती नाराज झालेला तिसरा एक वर्ग होता. तो म्हणजे संस्थानिकांच्या दरबारी असलेल्या अधिकाऱ्यांचा. संस्थानांचा कारभार सांभाळण्यासाठी अधिकारी, कारकून यांची आवश्यकता असे. संस्थानाचे हिशोब ठेवणारी वेगळी यंत्रणा असे. या सर्वांनाच आता चिंता वाटू लागली. उद्या जर स्वतंत्र भारतात संस्थाने विलीन झाली तर मग आमचे भवितव्य काय? असे त्यांना वाटू लागले. संस्थानांच्या दरबारात हा जो वर्ग होता तो प्रामुख्याने ब्राह्मण होता. तो गांधीजींच्या थेट विरोधात गेला. गांधी आमचे सर्वस्व हिरावून घेऊ पाहत आहेत असे त्यांना वाटले. अशाप्रकारे गांधीजींनी आपल्या पहिल्या-वहिल्या भाषणात आपण कोणाच्या बाजूचे आहोत हे जाहीर करतानाच कोणाच्या विरोधात आहोत हेसुद्धा जाहीर करुन टाकले. पुढे असे दिसते की, संस्थानिकांनी गांधीजींना जमेल त्या मार्गाने विरोध केला. जे संस्थानिक मुस्लिम होते त्यांनी मुस्लिम लीगला पाठिंबा दिला आणि जे हिंदू होते त्यांनी हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा संघटनांना मदत केली.

गांधीजींच्या पहिल्या भाषणाने गांधीजींना जसे विरोधक दिले. तसेच त्यांना एक शिष्यही दिला. संस्कृतचा अभ्यास करण्यासाठी मार्च १९१६ मध्ये विनायक नरहर भावे हा विद्यार्थी बनारसला आला होता. त्यावेळी बनारसमध्ये गांधीजींच्या भाषणाची चर्चा सुरु होती. वैचारिक विश्वात हाच विषय होता. ही चर्चा समजून घेऊन, गांधीजींचे भाषण वाचून भावेंनी गांधीजींना पत्र लिहिले. त्यावेळी गांधीजी गुजरातमधील कोचरब येथील सत्याग्रह आश्रमात होते. भावेंचे पत्र वाचून गांधीजींनी भावेना पत्र लिहिले

व भेटावयास या असे म्हटले. गांधीजींचे पत्र मिळताच भावे लगेचच कोचरबला येऊन पोहोचले. त्यांची एकमेकांशी मुलाखत झाली. पहिल्या भेटीतच दोघांना आनंद झाला. गांधीजींनी भावेंना म्हटले, तुम्ही महाराष्ट्राचे. महाराष्ट्र हा ज्ञानोबा, तुकोबा, शिवबा, यांचा म्हणून आजपासून तुम्ही 'विनोबा'. अशाप्रकारे विनायक नरहर भावे यांचे विनोबा भावेमध्ये रुपांतर झाले. पुढे विनोबा या नावानेच ते ओळखले गेले.

## गांधीजींची रणनीती

गांधीजींनी बनारसमध्ये भाषण करुन आपला राजकीय जाहीरनामा प्रसिद्ध केला. आता त्यांना रणनीती तयार करणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी आपले गुरु गोपाळकृष्ण गोखले यांनी केलेली सूचना, दिलेला सल्ला त्यानुसार काम करण्याचे ठरविले. देश पाहणे आणि समजून घेणे त्यांनी सुरु केले. त्यांनी आपले पहिले निरीक्षण नोंदविले की, भारत हा खेड्यांचा देश आहे. पाच लाखांवर खेडी या देशात आहेत आणि त्यामुळे आपणाला जर सुरुवात करायची असेल तर ती खेड्यापासून करायला हवी. त्यासाठी खेड्यांतील जनजीवन समजून घेणे आवश्यक आहे. गांधीजींनी आपल्या डोळ्यासमोर खेडे ठेवून कामाला सुरुवात केली. त्यांना दिसले की, खेड्यांमध्ये पराकोटीचे दारिद्र्य आहे. खेड्यातील दोन-चार श्रीमंत जमिनदार वगळता इतर सर्वजण गरीब आहेत. त्यातही दलितांची अवस्था खूपच वाईट. प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना गावातील सवर्ण समाजावर अवलंबून रहावे लागते हे त्यांनी पाहिले. सवर्ण लोक दलितांना अतिशय वाईट पद्धतीने वागवतात. त्यांना पिण्याचे पाणीसुद्धा दिले जात नाही. त्यांना मंदिरात जाऊन देवदर्शन घेण्याचीही मुभा नाही. दुष्काळी भागात तर खूपच वाईट परिस्थिती, सवर्णांनाच पिण्याचे पाणी मिळत नाही तर मग इतरांचे काय? गांधीजी हे सर्व बघत होते. पदोपदी खिन्नही होत होते. कस्तुरबा आणि महादेवभाई यांनी नोंदविलेला एक प्रसंग ध्यानात घेण्यासारखा आहे.

बिहारमधील एका खेड्यात ते दोघेजण आले होते. वेळ दुपारची होती.

त्यांना तहान लागली होती. एका झोपडीसमोर जावून त्यांनी आवाज दिला. 'आम्हाला पाणी हवे आहे, मिळेल का?' आतून आवाज आला मिळेल. दार किलकिले झाले आणि एक हात बाहेर आला. पाण्याचा लोटा घेऊन. कस्तुरबानी पाणी घेतले. आणखी एक लोटा महादेवभाईंसाठीही घेतला. कस्तुरबा म्हणाल्या की, पाणी देणाऱ्याचे आभार मानायचे आहेत. आपण बाहेर याल का? आतून आवाज आला 'मला बाहेर येता येणार नाही, कारण घरात एकच एक चांगली साडी आहे ती नेसून सासूबाई कामावर गेल्या आहेत. घरातून बाहेर येण्यासाठी आवश्यक तेवढे कपडे मजजवळ नाहीत' त्या मुलीचे शब्द ऐकून कस्तुरबा आणि महादेवभाई थरारुन गेले. खेड्यातील गरीब माणसाची अवस्था त्याकाळात कशी होती हे या एका उदाहरणावरुन समजून यायला हरकत नाही. गांधीजींपुढे प्रश्न असा पडला की, एकाचवेळी किती आघाड्यांवर आपणाला लढायचे आहे. आज ना उद्या ब्रिटीश आपल्या देशी जातील. पण त्यानंतर काय? खेड्यात राहणाऱ्या लक्षावधी देशबांधवांसाठी आपला कार्यक्रम काय? दलितोद्धाराचे काय? असे प्रश्न त्यांना भंडावून सोडत. गांधीजींना आणखी एक प्रश्न महत्त्वाचा वाटला. तो म्हणजे महिलांचा. सर्वच समाजातील अगदी ब्राह्मण समाजातील महिलांनासुद्धा दुय्यम दर्जाचीच वागणूक मिळे. त्यांना कसलेच अधिकार नव्हते. त्यांचे कार्यक्षेत्र घराच्या उंबरठ्याच्या आत होते.

त्या काळात शेती हाच मुख्य उद्योग होता. शेती अतिशय जुन्या पद्धतीने केली जाई. शेतीतून शेतकऱ्याला खूप कमी मिळे. शेतात जे काही पिकायचे त्यातील मोठा हिस्सा जमिनदार आणि सावकराकडेच जाई. शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन नसे ते शेतमजूरच होते.

युरोपचे जसे औद्योगिकीकरण झाले होते तसे भारताचे झाले नव्हते. केवळ मुंबई, कोलकाता, चेन्नई, सुरत, कानपूर अशा काही ठिकाणीच उद्योग सुरु झाले होते. त्यामध्ये कापड गिरण्यांचा समावेश होता. या गिरण्या प्रामुख्याने ब्रिटिशांच्या व स्थानिक मारवाड्यांच्या मालकीच्या होत्या. याच शहरांतून कामगारवर्ग तयार झाला होता.

सन १८५८ साली ईस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा कारभार इंग्लंडच्या राणीकडे गेला. कंपनी सरकार जाऊन राणी सरकार आले. या सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या निर्णयानुसार सरकारने शस्त्र परवाना विषयक कायदा केला. कायद्याची अंमलबजावणी करुन सरकारने लोकांकडे असलेली शस्त्रे काढून घेतली. देश निशस्त्र केला. शस्त्रे होती ती केवळ संस्थानिकांच्याकडे. कारण त्यांच्याकडे त्यांचे सैन्य असायचे. सैन्य ठेवण्याची परवानगी सरकारने त्यांना दिली होती. संस्थानिकांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी सरकारने आपला एक 'पॉलिटीकल एजंट' नेमला होता. तो संस्थानिकाच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवून असे. जर कोणी राणी सरकारच्या विरोधी हालचाल केली तर लगेच आपल्या अधिकाऱ्यांना तो कळवत असे. ब्रिटिशांनी असे पाहिले की, संस्थानिक ऐशआरामात जगतील. त्यांनी शिकार करावी. नाच गाण्याचा शौक करावा. अशा सवयी त्यांना लावल्या. संस्थानिक जनतेवर अत्याचार करीत. जबरदस्तीने कर वसूल करीत. त्यामुळे जनतेच्या मनात त्यांच्याविषयी आदर नव्हता. ते जनतेपासून अलग पडले होते. त्यांना जनतेचा पाठिंबा नव्हता. अशाप्रकारे ब्रिटिशांनी भारतातील संस्थानिकांना व जनतेला निशस्त्र करुन टाकले आणि उलट बाजूने ते मात्र शस्त्रसज्ज होत गेले. त्यांनी आधुनिक बंदुका आणल्या, तोफा आणल्या, लष्कराला शिस्तबद्ध केले. देशातील परिस्थिती अशी होती.

राजकीय वातावरण कसे होते? काँग्रेसचे नेतृत्त्व लोकमान्य टिळकांकडे होते. टिळकांची राजकीय मते जहाल होती. ब्रिटिशांनी तातडीने देशातून निघून जावे अशी त्यांची भूमिका होती. देशातील मुसलमान समाजाने स्वातंत्र्य चळवळीत सहभागी व्हावे म्हणून त्यांनी बॅरिस्टर महमदअली जीना यांच्याशी एक करार केला होता. हा करार सन १९१६ साली लखनौ येथे करण्यात आला म्हणून त्याला 'लखनौ करार' असे म्हटले जाते. या करारानुसार मुसलमान समाजाला कौन्सिलमध्ये ३० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मुसलमान समाजासाठी वेगळे मतदारसंघ करण्यात आले. यामध्ये उमेदवार मुसलमान आणि मतदारही मुसलमानच. अशी ती

योजना होती. यामुळे एक झाले. मुसलमान समाज चळवळीत आला. लोकमान्य टिळकांना तेच हवे होते. मात्र लोकमान्य टिळकांची सामाजिक प्रश्नांविषयींची भूमिका ही खूप प्रतिगामी होती. सामाजिक सुधारणांना त्यांचा विरोध होता. त्यामुळे महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीतले लोक त्यांच्यावर कमालीचे नाराज होते. महाराष्ट्रातील बहुजन समाज नेतृत्त्वाच्या शोधात होता. सन १९२० साली लोकमान्य टिळकांचे निधन झाले. राष्ट्रीय चळवळीत एक पोकळी निर्माण झाली. ती भरुन काढण्यासाठी गांधीजी पुढे आले. बहुजन समाजाने त्यांचे स्वागत केले. गांधीजींच्या रुपात बहुजन समाजाला नेता मिळाला. याच काळात टिळकांचे अनेक अनुयायी मात्र न. चि. केळकर यांच्या नेतृत्त्वाखाली हिंदू महासभेत गेले.

ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी अनेक लहान मोठे गट आपापल्यापरीने सशस्त्र आंदोलनाचा मार्गही अनुसरत होते. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे गदर चळवळीचा कॅनडामध्ये वास्तव्यास असलेल्या हिंदुस्थानी वंशाच्या शिखांनी शस्त्रे जमवून ब्रिटीश राजवटीच्याविरोधात बंड करण्याचा प्रयत्न केला. यास 'गदर चळवळ' म्हणण्यात येते. दुर्दैवाने गदर क्रांतीकारक कोलकाता बंदरात पकडले गेले. त्यांना ब्रिटिशांनी अंदमान बेटावर काळ्या पाण्यावर पाठविले. स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील हे एक सोनेरी पान आहे. रशियन राज्य क्रांतीपासून प्रेरणा घेऊन भारतातही कामगार चळवळ, कम्युनिस्ट चळवळ उभी करण्याचा प्रयत्न देशात सुरु होता. देशातील राजकीय परिस्थती अशी होती. अशा काळात गांधीजींना आपला मार्ग शोधायचा होता. स्वातंत्र्य चळवळ उभी करायची होती. यासाठीच गांधींजी देशभर फिरत होते. देश समजून घेत होते. एक वळणावर त्यांनी असा निर्णय घेतला की, या देशात जर काम करायचे असेल तर या लोकांसारखेच आपणाला रहावे लागेल आणि म्हणून त्यांनी आपले गुजराती धाटणीचे कपडे बाजूस सारले आणि नेसावयास एक पंचा आणि अंगावर पांघरावयास एक पंचा एवढेच कपडे वापरण्याचे ठरविले.

❐❐❐

## प्रकरण ४

# गांधीजींच्या शेतकरी चळवळी

ब्रिटिशांनी देश निशस्त्र केला होता. स्वत: मात्र ते शस्त्रसज्ज होते. अशा काळात ब्रिटिशांच्या विरोधात लढण्यासाठी गांधीजींनी सत्याग्रहाचे शस्त्र उगारण्याचा निर्णय घेतला. हे शस्त्र त्यांनी दक्षिण आफ्रिकेत विकसित केले होते. सत्याग्रहाला त्यांनी अहिंसेची जोड दिली होती. दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीशही शस्त्रसज्ज होते. जनता निशस्त्र होती. पण तरीही अंतिम लढ्यात जनतेचाच विजय झाला होता. दक्षिण आफ्रिकेप्रमाणेच हिंदुस्थानातही त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

गांधीजींनी लक्ष केंद्रीत केले ते शेतकऱ्यांवर. शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यांनी कामाला सुरुवात केली. बिहारमधील शेतकऱ्यांवर सरकार निळीची लागवड करण्याची सक्ती करीत असे. इंग्लंडमधील कापड गिरण्यांत तयार होणारा कपडा स्वच्छ करण्यासाठी त्यांना निळीची गरज होती. इंग्लंडमध्ये निळ पिकत नाही म्हणून त्यांनी ती हिंदुस्थानातून हवी होती. म्हणून ब्रिटिश बिहारच्या शेतकऱ्यांवर निळीचे पीक घेण्यासाठी सक्ती करीत होते. प्रत्येक शेतकऱ्यांने आपल्या जमिनीचा तिसरा भाग हा निळीसाठी राखीव ठेवला पाहिजे. या पद्धतीस 'तीन कठीया' असे म्हटले जाई. बिटिशांचे म्हणणे होते जे शेतकरी पिकांसाठी नदीचे, नाल्याचे पाणी वापरत त्यांच्याकडून सरकारने पाणीपट्टी घ्यावी. बिहारमध्ये वेठबिगारची पद्धत

मोठ्या प्रमाणावर होती. शेतकऱ्यांना पोलीस मारहाणही करीत. आपले हे दु:ख बिहारच्या शेतकऱ्यांनी गांधीजींच्या कानावर घातले. गांधीजींनी त्यांना दु:ख निवारण करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार सन १९१७ मध्ये गांधीजी आपल्या अनुयायांसह बिहारमध्ये दाखल झाले. त्यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे समजून घेतले. शेतकऱ्यांचे म्हणणे असे होते की, निळीचे पीक घेतल्यावर जमिनीचा कस कमी होतो. जमीन नापीक होते. म्हणून शेतकरी निळीचे पीक घेण्यास तयार नसत व त्यांनी ते पीक घ्यावे यासाठी ब्रिटीश त्यांच्यावर जोर जबरदस्ती करीत. गांधीजींनी या प्रश्नाचा अभ्यास करुन शेतकऱ्यांच्या बाजूने आणि ब्रिटिशांच्या विरोधात सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. बिहारमधील चंपारण्य येथे हा सत्याग्रह करण्यात आला. बिहारमधील शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी देशभरातून शेतकरी चंपारण्याला आले होते. हा लढा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली यशस्वी झाला. गांधीजींच्या मागणीनुसार १३ जून १९१७ रोजी या सर्व प्रश्नांचा विचार करण्यासाठी समिती नेमण्यास सरकारने मान्यता दिली. या समितीने शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून विषय समजून घेतला. शेतकऱ्यांचे दु:ख सरकारच्या कानावर घातले. पुढे १८ ऑक्टोबर १९१७ रोजी सरकारने समितीच्या मागण्या मान्य केल्याचे जाहीर केले.

१) निळीचे पीक घेण्याची सक्ती रद्द व्हावी. (तीन कठीया पद्धत)

२) शेतकरी आणि सरकार यांच्यामधील करार राजीखुशीने व्हावा. जबरदस्तीने नव्हे. कराराचा कालावधी तीन वर्षे असावा.

३) खंड वाढ २० ते २५ टक्क्यांनी कमी करण्यात यावी.

४) वेठबिगार पद्धत रद्द व्हावी.

५) शेतकऱ्यांनी करारात ठरलेली रक्कमच सरकारला द्यावी. ज्यादा रकमेची अपेक्षा व जबरदस्ती सरकारने करु नये.

हिंदुस्थानात आल्यावरचा पहिला लढा गांधीजींनी चंपारण्यात यशस्वी करून दाखविला. त्यामुळे त्यांच्या नावाचा सर्वत्र बोलबाला झाला.

अशाप्रकारे गांधीजी शेतकऱ्यांचे पुढारी म्हणून पुढे आले.

# खेडा सत्याग्रह

गुजरातमध्ये खेडा हा जिल्हा आहे. ज्यामध्ये सहाशे खेडी त्याकाळात होती. सन १९१८ सालात या परिसरात दुष्काळ पडला. पाण्यासाठी वणवण करावी लागली. गाई-गुरांना चारा मिळणे कठीण झाले. लोकांना कंदमुळे खाऊन जगण्याची वेळ आली. पहिले महायुद्ध संपत आले होते. चार वर्षे चाललेल्या या युद्धामुळे ब्रिटनची अर्थव्यवस्था पार कोसळली होती. ब्रिटनला पैसे हवे होते. जेथे जेथे आपल्या वसाहती आहेत तेथून काही मिळते का? हे ब्रिटनचे सरकार पहात होते. खरे तर जेथे दुष्काळ पडतो तेथून करवसुली केली जाऊनये असे तत्त्व आहे. वसुली करायचीच तर पिकाच्या प्रमाणात तरी करावी. ब्रिटिशांनी हे सारे संकेत बाजूस सारले. दुष्काळी भागातूनसुद्धा पूर्वीच्याच दराने करवसुली करा, असे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले. अधिकाऱ्यांनी करवसुली सुरु केली. हा प्रकार म्हणजे दु:खात डागण्या देण्यासारखा होता. ज्यांच्याकडे खायला अन्नाचा कण नाही ते कर कोठून देणार? अधिकारी गावोगावी जाऊन धमक्या देऊलागले. घरातील वस्तू जप्त करु असे सांगू लागले. जेंव्हा हा जाच असह्य झाला तेंव्हा शेतकऱ्यांनी गांधीजींशी संपर्क साधला. गांधीजी तर गुजरातचेच. त्यांनी शेतकऱ्यांचे नेतृत्त्व स्वीकारण्याची तयारी दाखविली. गुजरातची सेवा करण्याची या निमित्ताने मला संधी मिळत आहे, असे उद्‌गार त्यांनी काढले. गांधीजींनी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्याचे ठरविले. त्यांनी शेतकऱ्यांना आदेश दिला की, कोणत्याही परिस्थितीत कर भरायचा नाही. पोलीस येऊन पीक ताब्यात घेतील. घर ताब्यात घेतील. गाई गुरे घेऊन जातील. पण काहीही झाले तरी मागे हटायचे नाही. हिंसाचार करायचा नाही. कर भरायचा नाही. हे आंदोलन तब्बल सहा महिने चालले. आपल्या पद्धतीप्रमाणे गांधीजींनी दिल्लीपर्यंत निवेदने पाठविली. सत्य परिस्थिती समजून सांगण्याचा प्रयत्न केला. आपण आंदोलनावर ठाम आहोत, हे सांगण्यासही ते कचरले नाहीत. शेतकरी मागे हटण्यास अजिबात तयार नाहीत याची जाणीव होताच सरकारनेच शेवटी नमते घेतले व करवसुली थांबविली. चंपारण्यमधील आंदोलनानंतरचे हे खेडा येथील आंदोलन देशभर गाजले.

# बार्डोलीची साराबंदी

बार्डोली गुजरातमध्ये आहे. बार्डोली परिसरातील शेतकऱ्यांनी सन १९२८ साली गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली आणि वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्त्वाखाली सारबंदी आंदोलन केले. ब्रिटीश सरकारने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शेतसाऱ्यामध्ये एकदम २५ टक्के वाढ केली. त्यामुळे शेतकरी संतापले. त्यांनी कर भरण्यास नकार दिला. शेतकऱ्यांनी कर भरण्यास नकार दिल्यावर सरकारने करवसुलीसाठी पठाण नेमले. खासगी सावकार कर्ज वसूल करण्यासाठी पठाणांची मदत घेत. हे पठाण अगदी निर्दयीपणे कर्जवसुली करत. याबाबत ते कुप्रसिद्ध होते. सरकारने अशा पठाणांकडे सारा वसुली करण्याचे काम सोपविले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला. पठाण गावागावात जाऊन जोर जबरदस्ती करु लागले तेंव्हा शेतकऱ्यांनी गांधीजींची भेट घेतली आणि आपल्या तक्रारी त्यांच्यापुढे मांडल्या. गांधीजींनी येथेही आपले सत्याग्रहाचे अस्त्र परजले. काहीही होऊदेत आम्ही वाढीव सारा देणार नाही, अशी भूमिका घेऊन शेतकरी लढ्यास सज्ज झाले. या आंदोलनात वल्लभभाई पटेल यांचे नेतृत्त्व विकसित झाले. त्यांनी आपली वकिली थांबविली आणि ते पूर्णवेळ चळवळीत आले. आंदोलन शांततामय मार्गाने सुरु राहिले. सरकारला शेवटी आंदोलनाची नोंद घ्यावीच लागली आणि त्यामुळे सरकारने या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी चौकशी समिती नेमली. या समितीने अभ्यास करुन आपला अहवाल सादर केला. त्यानुसार २५ टक्के सारा वाढ जी करण्यात आली होती ती कमी करुन ६ टक्क्यांवर आणण्यात आली. तसेच आंदोलनादरम्यान ज्यांना अटक करुन तुरुंगात ठेवले होते त्यांची बिनशर्त मुक्तता करण्यात आली.

सन १९१६ ते १९१८ या दोन वर्षांच्या कालखंडात गांधीजींनी बिहारमधील चंपारण्य आणि गुजरातमधील खेडा येथील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. त्यानंतर सन १९२८ साली बार्डोली येथे सारबंदी सत्याग्रह केला. या तीन आंदोलनामुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

❏❏❏

## प्रकरण ५

# गांधीजींची कामगार चळवळ

गांधीजींनी कामगारांना न्याय मिळावा म्हणून दक्षिण आफ्रिकेत आंदोलन केले होते. हिंदुस्थानात आल्यावर मात्र त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले होते. गुजरातमधील अहमदाबाद शहरात काही कापड गिरण्या होत्या. साधारणपणे ५० हजार कामगार होते. सन १९१८ साली या कामगारांना आंदोलन करणे भाग पडले. पहिल्या महायुद्धात झालेला खर्च भरुन काढण्यासाठी ब्रिटिशांनी कामगारांचे पगार ३५ टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय घेतला. ३५ टक्के कपात ही खूपच मोठी होती. आधीच पगार कमी त्यात कपात यामुळे कामगारवर्गात असंतोष पसरणे स्वाभाविक होते. यात भर म्हणून मालकांनी बोनस रद्द केल्याची घोषणा केली. कामगारवर्गात पसरलेला असंतोष ध्यानात घेऊन त्यांनी महागाई भत्ता वाढवून देऊअसे आश्वासन कामगारांना दिले. पण वेळ निघून गेली होती. कामगारांनी संप करण्याचा निर्णय घेऊन टाकला. कामगार गांधीजींच्याकडे गेले. त्यांनी आपल्या व्यथा त्यांच्यापुढे मांडल्या. चार अटीवर गांधीजींनी संपाचे नेतृत्त्व करण्याचे मान्य केले.

१) कोणत्याही परिस्थितीत शांतता भंग करायचा नाही.

२) ज्यांना कामावर जायचे असेल त्यांनी जावे.

३) मजुरांनी भिक्षान्न खाता कामा नये.

४) संप लांबला तरी दृढ रहावे. इतर काही कामे करुन जगावे.

कामगारांनी या अटी मान्य केल्या. पण जसजसा संप लांबत गेला तसे कामगार बिथरले. त्यांचा धीर सुटला. संपाच्या १८ व्या दिवशी गांधीजींना परिस्थितीची जाणीव झाली. त्यांनी कामगारांची सभा बोलावली आणि संपाला पाठिंबा देण्यासाठी आपण प्राणांतिक उपोषण करणार असे जाहीर करुन त्यांनी उपोषणाला सुरुवातही केली. गांधीजींनी उपोषण सुरू केल्यानंतर बिथरलेले, विखुरलेले कामगार पुन्हा एकत्र आले. त्यांनी संप लढा सुरुच ठेवण्याचा निर्णय घेतला. गांधीजींच्या उपोषणामुळे सरकारवर मोठे दडपण आले. त्यांनी कामगारांबरोबर वाटाघाटी करण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार वाटाघाटी झाल्या. मालकवर्गाने कामगारांना ३५ टक्के पगार वाढ देण्याचे जाहीर केले. त्यानंतर उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी गांधीजींनी संप मागे घेतला आणि उपोषणही. अशाप्रकारे २१ दिवस चाललेला हा संप मिटला. आता गांधीजी कामगार पुढारी म्हणूनही ओळखले जाऊ लागले. टेक्स्टाईल लेबर असोसिएशन ही कामगार संघटना गांधीजींनी स्थापन केली.

❑❑❑

## प्रकरण ६

# चळवळीत लोकसहभाग वाढविण्याचे प्रयत्न

गांधीजींनी हे पाहिले की स्वातंत्र्य चळवळीत फक्त पुरुषच भाग घेतात. त्यातही उच्चवर्णीय मोठ्या संख्येने असतात. महिला आणि दलित चळवळीपासून अलिप्त असतात. या सर्वांना बरोबर घेतल्याखेरीज चळवळ व्यापक होणे शक्य नव्हते आणि चळवळ व्यापक झाल्याशिवाय ब्रिटिशांवर प्रभाव पडणे शक्य नव्हते. यासाठी आता वेगळ्या प्रयत्नांची गरज असल्याचे गांधीजींना जाणवले.

लोकसहभाग वाढवायचा असेल तर जनतेला आपण सोपे कार्यक्रम दिले पाहिजे असा निर्णय त्यांनी विचारांती घेतला. जनतेला सुरुवातीस कार्यक्रम देताना कार्यक्रम सोपा असावा व त्यावर शक्ती मात्र मोठी लावावी. त्यामुळे कार्यक्रम आपोआपच यशस्वी होतो. आपण हाती घेतलेला कार्यक्रम यशस्वी झाला हे पाहून कार्यक्रमात भाग घेणाऱ्याचे मनोबल वाढते. हे तंत्र गांधीजींनी वापरले. सामान्य माणूस सहसा तुरुंगात जावू शकत नाही. त्याला भीती वाटते. ती भीती घालविण्याची गरज होती. गांधीजींनी विचारपूर्वक जो कार्यक्रम दिला तो सर्वांना पेलणारा होता. सकाळी लवकर उठावे. हातामध्ये तिरंगा ध्वज घेऊन आपल्या गल्लीतून प्रभातफेरी काढावी. आपली गल्ली,

आपला परिसर स्वच्छ ठेवावा असा सोपा कार्यक्रम त्यांनी जनतेला दिला. हा कार्यक्रम आटोपून माणसे आपापल्या नियोजित कामाला जाऊ शकत. त्यामुळे आर्थिक नुकसान होत नसे. ब्रिटिशांचा रोष ओढवून घेण्याचा तर प्रश्नच नव्हता. म्हणून तर प्रभातफेरी आणि सफाई हे दोन्ही कार्यक्रम अल्पावधीतच लोकप्रिय झाले. त्यामुळे चळवळीतील लोकसहभाग वाढला.

## दारूबंदी

गांधीजींनी जेव्हा महिलांशी संवाद साधायला सुरुवात केली तेव्हा त्यांना जाणवले की महिलांचा शत्रू क्रमांक एक हा ब्रिटीश नसून दारू आहे. घरातील पुरुष सकाळी उठून रोजगारासाठी जातो. राबराब राबतो आणि घरी परतताना मात्र कमावलेले सर्व पैसे दारूत घालून घरी येतो. घरातील कर्ता पुरुषच जर घरामध्ये काही देणार नसेल तर घरच्या बाईने घर चालवायचे तरी कसे? उत्पन्नाअभावी घरातील सर्वांचीच त्यामुळे उपासमार होई. बाईचे हे दु:ख गांधीजींनी ओळखले आणि तिला कार्यक्रम दिला. साधारणपणे संध्याकाळी लोक दारू पितात. त्यांनी महिलांना सांगितले की, तुम्ही दारू दुकानासमोर सतरंजी घालून बसा, भजन म्हणा. गांधीजींचा हा कार्यक्रम खूपच प्रभावी ठरला. दारू पिण्यासाठी दुकानात येण्यास लोक लाजू लागले. कारण भजन म्हणणाऱ्या महिलांना ओलांडून पुढे जावे लागे. त्यामुळे दारू दुकानात येणाऱ्यांची संख्या कमी झाली. कार्यक्रमाच्या पुढच्या टप्प्यात त्यांनी दारूची निर्मिती करणाऱ्या ज्या भट्या होत्या तेथे पुरुष कार्यकर्त्यांना निदर्शने करण्यास सांगितले. दारूचे दुष्परिणाम या विषयावर कार्यकर्ते प्रबोधन करु लागले. त्यामुळे बराच फरक पडला. घरातला पुरुष आता घरी येताना चार पैसे घेऊन येऊ लागला. त्यामुळे घरातील माणसांना दोन घास जेवायला मिळाले. या एका कार्यक्रमामुळे समाजातील महिला गांधीजींच्या चळवळीत आल्या. या माणसामुळे आमच्या घरी अन्न शिजते असे तिचे मत तयार झाले. प्रभातफेरीच्या निमित्ताने घराचा उंबरठा ओलांडून बाहेर आलेली स्त्री आता आंदोलनात भाग घेण्याइतपत सक्षम झाली.

## दलित बांधवांचा सहभाग वाढविला

समाजातील दलित बांधव चळवळीत आले पाहिजेत. याकडे गांधीजी गांभीर्याने पहात. यासाठी गांधीजींनी आपल्या आश्रमात दलित बांधवांना प्रवेश दिला. एक दाम्पत्य आश्रमात ठेवून घेतले. गांधीजींनी दलितांना आश्रमात प्रवेश दिला आहे ही बातमी सर्वत्र पसरली. त्यामुळे गांधीजींचे काही हितचिंतक नाराज झाले. कारण ते सनातनी विचारांचे होते. दलितांना आश्रमात प्रवेश दिल्यास आम्ही आश्रमास अर्थसहाय्य देणार नाही अशी त्यांनी भूमिका घेतली. तसे गांधीजींना कळविले. गांधीजींनी अगदी स्पष्ट शब्दात त्यांना कळविले की, तुम्ही जरी आर्थिक मदत थांबविली तरी चालेल. पण मी दलित बांधवांना आश्रमात प्रवेश देणार. गांधीजी आपल्या विचारावर ठाम होते. शेवटी विरोधकांनाच नमते घ्यावे लागले.

दलित समाजाचे जीवन अगदी जवळून पाहता यावे, समजून घेता यावे यासाठी गांधीजी ज्या शहरात जात त्या शहरातील दलित वस्तीमध्ये वास्तव्य करीत. स्वामी विवेकानंदांनीसुद्धा हाच मार्ग अनुसरला होता. गांधीजींना भेटण्यासाठी देशी-विदेशी पत्रकारांना, लेखकांना, नेत्यांना आता दलित वस्तीमध्ये जावे लागे. या सर्वांनाच दलित जीवनाची जाणीव व्हावी हीच गांधीजींची इच्छा होती. अशाप्रकारे ती पूर्ण झाली. दलित समाज आणि गांधीजी यांच्यात संवाद सुरु झाला. राष्ट्रीय चळवळीतील कार्यकर्त्यांनी एक तरी दलित मुलगी आपल्या घरी ठेवून घ्यावी आणि तिला आपल्या मुलांसोबत वाढवावे अशा आशयाचे विचार गांधीजी मांडू लागले. त्यामुळे दलित समाज गांधीजींच्या जवळ येऊ लागला.

## डोके झाकण्याचा अधिकार

हिंदुस्थानी समाजात दलित बांधवांना डोके झाकण्याचा अधिकार नव्हता. त्यांनी उघड्या डोक्याने रहावे असा दंडकच होता. दलितांनी नवे कपडे घालू नयेत, सोन्याचे दागिने वापरु नयेत असेही नियम होते. कोणी कोणत्या

प्रकारची टोपी वापरावी याचेही नियम होते. ब्राह्मण समाजातील पुरुषाने पगडी किंवा जरीची टोपी वापरावी. क्षत्रिय पुरुषाने फेटा बांधावा, वैश्य पुरुषाला टोपी वापरण्याची परवानगी होती. परंतु डोके झाकण्याचा अधिकार नव्हता तो फक्त दलितांना. गांधीजींच्या ध्यानात ही गोष्ट आली. दक्षिण आफ्रिकेत जेव्हा ते तुरुंगात होते तेव्हा त्यांना एक टोपी जेलच्या नियमानुसार देण्यात आली होती. त्या टोपीत त्यांनी थोडा बदल केला आणि हिंदुस्थानी हवामानाला योग्य होईल अशी एक खादीच्या कापडाची पांढऱ्या रंगाची टोपी तयार केली. पुढे हीच टोपी 'गांधी टोपी' म्हणून ओळखली गेली. ती चळवळीचे प्रतीक बनली. राष्ट्रीय चळवळीत येणाऱ्यांनी ही टोपी वापरावी असे त्यांनी आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून अनेकांनी ती टोपी वापरण्यास सुरुवात केली. जे नेते पूर्वी फेटा, पगडी अथवा जरीची टोपी वापरत ते आता गांधी टोपी वापरु लागले. जे दलित बांधव राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाले तेसुद्धा आता सहजपणे गांधी टोपी वापरु लागले आणि विशेष म्हणजे कोणीही सवर्णांने त्यास आक्षेप घेतला नाही. असे म्हणता येईल की, दलित बांधवांना डोके झाकण्याचे स्वातंत्र मिळाले. ही गोष्ट आज खूप सोपी वाटते. पण त्यावेळी ती खूप कठीण गोष्ट होती. दलित बांधवांना ती अशाप्रकारे गांधीजींच्या चळवळीतून मिळाली. याचा परिणाम म्हणून दलित बांधवांचा राष्ट्रीय चळवळीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत झाली. दलित बांधवांच्या ज्या अनेक समस्या होत्या. त्यातील एक समस्या अशी होती की, त्यांना मंदिरात जाऊन मूर्तीचे दर्शन घेता येत नसे. आपल्या मराठी संतांनाही हा कायदा मोडता आला नाही. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम हे विठोबाच्या मंदिरात जाऊन दर्शन घेऊ शकत. चोखोबा, सावता माळी, गोरा कुंभार यांना मात्र मंदिरात जाण्याची परवानगी नव्हती. गांधीजींना वाटे यांना मंदिरात जाता आले पाहिजे. वर्धा येथे जमनालाल बजाज यांनी स्वखर्चाने लक्ष्मी नारायणाचे मंदिर बांधले. ते त्यांच्या मालकीचे होते. या मंदिरात जाऊन ते नित्यनेमाने पूजा करीत. त्यांचे कुटुंबियही तेथे जात. गांधीजींच्या प्रभावामुळे आणि विनोबाजींच्या

आग्रहामुळे जमनालाल बजाज यांनी आपले मंदिर दलितांसाठी खुले केले. हे भारतातील पहिले दलितांसाठी खुले करण्यात आलेले मंदिर. ही घटना आहे सन १९२८ सालची.

## माणसे जोडण्याची किमया

गांधीजी जाणीवपूर्वक असा प्रयत्न करीत की, वेगवेगळ्या समाजातील आणि वेगवेगळ्या प्रांतातील माणसे चळवळीत आली पाहिजे. वेगवेगळा व्यवसाय करणारी माणसेसुद्धा चळवळीत यावीत. गांधीजींनी प्रयत्नपूर्वक देशाच्या कानाकोपऱ्यातून माणसे जोडली. वायव्य सरहद्द प्रांतातून त्यांनी खान गफार खान यांना सोबत घेतले. उत्तर भारतातून मोतीलाल नेहरु, पंडित नेहरु, गोविंद वल्लभपंत इत्यादी. बिहारमधून मौलाना अबुलकलम आझाद, बंगालमधून सुभाषचंद्र बोस, चित्तरंजन दास, गुजरातमधून वल्लभभाई पटेल, महाराष्ट्रातून विनोबा भावे, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ , साने गुरुजी, मामासाहेब देवगिरीकर, पटवर्धन, इत्यादी इत्यादी. कर्नाटकातून गंगाधरराव देशपांडे व निजलिंगप्पा. तामिळनाडूतून चक्रवर्ती राज गोपालचारी ही यादी अशीच वाढविता येईल. ज्या गावात गांधीजी जात त्या गावात एक तरी कार्यकर्ता ते मिळवित. त्यांनी असे म्हटले आहे की, मला सर्वाधिक कार्यकर्ते महाराष्ट्रातून मिळाले. महाराष्ट्र हे कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे असे वर्णन त्यांनी केले आहे. गांधीजींच्याकडे माणसे कशी आकर्षित होत याचे एक उदाहरण ध्यानात घेण्यासारखे आहे. गांधीजी कटकला गेले होते. कटक शहरात चित्तरंजनदास नावाचे प्रसिद्ध वकील होते. असे म्हणतात की, ते खूप श्रीमंत होते. दरमहा किमान पन्नास हजार रुपये त्यांचे त्यावेळी उत्पन्न होते. सहा घोड्यांच्या बग्गीतून ते कोर्टाला जात. गांधीजी थेट त्यांच्या घरी गेले आणि म्हणाले, तुम्हाला विनंती करायला मी आलो आहे. तुम्ही राष्ट्रीय चळवळीत यावे अशी माझी इच्छा आहे. तुम्ही आल्यास या भागात चळवळ वाढेल असे मला वाटते. गांधीजींचा दास यांच्यावर असा काही प्रभाव पडला की त्यांनी तात्काळ त्यांचे म्हणणे मान्य केले आणि जाहीर केले की मी माझी

वकिली थांबवितो. माझ्या घरात राष्ट्रीय चळवळीचे कार्यालय होऊ दे. आचार्य विनोबा भावे यांच्यानंतर गांधीजींच्या संपर्कात आले आणि अखेरपर्यंत राहिले ते म्हणजे महादेवभाई देसाई. महादेवभाईंचे वडील हरिभाई हे शिक्षक होते. आपल्या मुलांने वकील व्हावे व चांगली वकिली करावी. घर चालविण्यास हातभार लावावा अशी त्यांची माफक इच्छा होती. पण तसे झाले नाही. महादेवभाई गांधीजींना भेटायला आश्रमात गेले. तेथील सर्व वातावरण व गांधीजींचे व्यक्तिमत्त्व पाहून ते भारावून गेले. आपणही येथेच रहावे असा विचार त्यांच्या मनात आला. त्याच काळात १९१७ साली गुजरातमधील गोध्रा येथे काँग्रेसची राजकीय परिषद झाली. या परिषदेस लोकमान्य टिळक, महमदअली जीना, गांधीजी हजर होते. या परिषदेस हजर राहण्यासाठी महादेवभाईही गेले. परिषदेत गांधीजींना भेटले. आश्रमात राहण्याचा मनात आलेला विचार त्यांनी गांधीजींपुढे बोलून दाखविला. गांधीजी म्हणाले 'या उद्यापासून रहायला' महादेवभाई आपल्या पत्नी दुर्गाबेन यांच्यासह आश्रमात रहायला गेले. त्या दिवशीपासून ते त्यांचा अंत होईपर्यंत ते त्यांचे सचिव म्हणून कार्यरत होते. रोजनिशी लिहिण्याचे काम त्यांच्याकडे असे. गांधीजी सांगत आणि महादेवभाई लिहित. गांधीजींनी असे म्हटले आहे की, महादेवभाईंचे इंग्रजीवर प्रभुत्त्व होते. १९४२ च्या लढ्यात ते गांधीजींच्याबरोबर आगाखान पॅलेसमध्ये तुरुंगात होते. तेथेच त्यांचे निधन झाले. तिसरे आणखी एक उदाहरण नोंदविता येण्यासारखे आहे. भाई माधवराव बागल हे मूळचे चित्रकार. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथे त्यांनी तब्बल सात वर्षे राहून चित्रकलेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले होते. कोल्हापुरात रहावे. मनसोक्त निसर्गचित्रे काढावीत. असे त्यांचे आयुष्य सुरु होते. घराची श्रीमंती होती. सन १९२७ साली एका सभेसाठी गांधीजी कोल्हापूरला आले असता माधवरावांना गांधीजींच्याबरोबर संवाद साधण्याची संधी मिळाली. गांधीजींनी त्यांना विचारले की, आपण काय करता? त्यांनी उत्साहाने सांगितले, 'मी निसर्गचित्रे काढतो' त्यावर गांधीजी म्हणाले की, तुमच्या चित्रकलेचा माणसाला काही उपयोग झाला तर बरे होईल. माणसासाठी काही करण्याची आज गरज

आहे. गांधीजींच्या या वाक्यामुळे माधवरावांच्या जीवनात बदल झाला. त्यांनी त्या दिवसापासून विचार करण्यास सुरुवात केली. चित्रकलेचा छंद थोडा कमी केला. वाचन सुरु केले आणि चळवळीत भाग घ्यायला सुरुवात केली. पुढे ते स्वातंत्र्यसेनानी म्हणून पुढे आले.

गांधीजींच्या सहवासात जे कोणी आले त्यांचे जीवन असे बदलून गेले आणि अशी माणसे त्यांच्याबरोबर निष्ठेने राहिली अशी आणखीही अनेक उदाहरणे देता येतील. जनतेत मिसळणे अधिक सुलभ व्हावे म्हणून गांधीजींनी गुजराती धाटणीचे कपडे घालणे थांबवून त्यांनी खादीचा एक पंचा व एक उपरणे एवढीच वस्त्रे वापरण्यास सुरुवात केली.

## विधायक कामातून व्यापक जनसंपर्क

राजकीय आंदोलन हे दररोज होत नसते. दोन आंदोलनामध्ये जो अवधी मिळतो त्या अवधीत कार्यकर्त्यांना काम देणे आवश्यक असते. याची जाणीव होताच त्यांनी विधायक काम करायला सुरुवात केली. यामध्ये रात्रशाळा चालविणे, दारुबंदीचा प्रसार, अस्पृश्यता निवारणाचा प्रचार, शेतीमधील प्रयोग यांचा समावेश होता. सहकार चळवळीकडेही त्यांनी गांभीर्याने पाहिले. समाजाच्या प्रगतीसाठी सहकार चळवळ आवश्यक आहे आणि ती वाढली पाहिजे या मताचे ते होते. त्यांचे अनुयायी वैकुंठभाई मेहता यांनी पुढे सहकार चळवळीसाठी आपले आयुष्य दिले. इंग्रजांनी सुरु केलेल्या शिक्षण पद्धतीवर गांधीजी नाराज होते. म्हणून त्यांनी नवी शिक्षण पद्धती तयार केली. राष्ट्रीय शाळाही सुरु केल्या. राष्ट्रीय शाळांतून शिक्षण देणारे शिक्षकही तयार केले. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती झाली पाहिजे यासाठी त्यांनी ग्रामोद्योगाची कल्पना पुढे आणली. खेड्यांतील लोकांना त्यांच्या खेड्यात काम मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. देशाच्या विकासाची सुरुवात शहरातून न करता ती खेड्यांपासून झाली पाहिजे या मताचे ते होते. त्यानुसार त्यांनी रचनात्मक कार्य केले. यातून अनेक कार्यकर्ते तयार झाले. जे पुढे राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाले. म्हणून त्यांच्या चळवळी यशस्वी होत गेल्या.

## प्रकरण ७

# रौलट ॲक्टविरोधी चळवळ

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील महत्त्वाचा टप्पा म्हणून जालियनवाला बाग हत्याकांडाकडे पाहिले जाते. १९१९ साली ब्रिटीशांनी भारताला 'रौलट ॲक्ट' लागू केला. रौलट या नावाच्या अधिकाऱ्यांने तो तयार केला म्हणून त्याच्या नावाने तो ओळखला जातो. या कायद्यानुसार ब्रिटीशांना भारतातील कोणाही व्यक्तीस चौकशीविना अटक करता येणे शक्य होते. हा कायदा एकदा लागू झाला की मग ब्रिटीश राजवटीविरोधात जे कोणी आवाज उठविण्याचा प्रयत्न करतील त्यांना अटक होणार होती. या कायद्यास विरोध करणारी भूमिका काँग्रेसने घेतली. दि. ६ एप्रिल १९१९ रोजी भारतभर निषेध दिन पाळण्यात आला. सारा भारत त्या दिवशी बंद राहिला. त्या काळात पंजाब प्रांतात राष्ट्रीय चळवळ जोमात होती. डॉक्टर सैफुद्दिन किचलू आणि डॉ. सत्यपाल या दोन तरुण नेत्यांना ब्रिटीशांनी रौलट ॲक्टनुसार अटक केली. त्यामुळे सर्व समाजात संतापाची लाट उसळली. हे दोघेही अमृतसरचे. यातील एक हिंदू तर दुसरा मुसलमान. अमृतसरमध्ये शीखांची संख्या अधिक पण त्यांनी या दोघांचे नेतृत्त्व मान्य केलेले. यावरुन त्यावेळी तेथे असलेल्या धाार्मिक व जातीय सलोख्याची कल्पना येते. या दोघांच्या अटकेच्या निषेधार्थ दि. १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरमधील जालियनवाला बाग या बागेत निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. १३ एप्रिल हा तसा सणाचा

दिवस. पंजाबात त्या दिवशी वैशाखी हा सण साजरा करण्याची प्रथा आहे. दिवस सणाचा त्यात सभा यामुळे बागेत मोठा जनसमुदाय उपस्थित होता. या बागेत जाण्यासाठी एकच एक गेट आहे. इतर सर्व बाजूंनी दगडी भिंती आहेत. बागेतील झाडांना पाणी घालण्यासाठी विहिरी आहेत. अशी ही बाग. त्यावेळी पंजाबचा पोलीस प्रमुख जनरल डायर जनतेमध्ये दहशत बसविण्याच्या उद्देशाने पोलीस फौज घेऊन जालियनवाला बाग येथे आला. बागेच्या एकमेव प्रवेशद्वारावर त्याने हत्यारी पोलिसांना उभे केले आणि सभेत जमलेल्या सर्वांवर गोळीबार सुरु केला. अचानक सुरु झालेल्या या गोळीबाराने लोक सैरभैर झाले. बाहेर पडण्याचा प्रयत्न करु लागले. पण बाहेर पडणार कसे? हा प्रश्न होता. काहींनी विहिरीत उड्या मारल्या. त्यात त्यांनी आपले प्राण गमावले. काहींनी भिंतीवर चढून पलिकडे जाण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. ते पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडले. अशाप्रकारे हजारावर माणसे मरण पावली. तीन ते चार हजार लोक जखमी झाले. लहान मुले चेंगरुन मरण पावली. जखमी झालेले लोक बागेतच विव्हळत पडले होते. पण जनरल डायरने जखमी व्यक्तीवर उपचार करण्यासाठी डॉक्टर पाठविले नाहीत. आंदोलनकर्त्यांवर जरब बसविण्यासाठी त्याने हे सर्व मार्ग अनुसरले हे नंतर स्पष्ट झाले. यामुळे ब्रिटिश साम्राज्याची काळी बाजू उजेडात आली. ब्रिटीश असा दावा करीत की, आम्ही अप्रगत समाजाला प्रगतीकडे नेण्याचा प्रयत्न करत आहोत. आम्ही त्या देशात रेल्वे नेली. तार, टपाल खाते सुरु केले इत्यादी. ब्रिटिशांचा हा दावा जालियनवाला बाग हत्याकांडामुळे खोटा ठरला. गांधीजींनी तात्काळ या घटनेचा निषेध केला. त्यांनी दक्षिण आफ्रिकेत केलेल्या सेवा कार्याबद्दल ब्रिटीशांनी त्यांना 'कैसर ए हिंद'हा जो किताब दिला होता तो परत केला. रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांना मिळालेला पुरस्कार परत केला. यामुळे ब्रिटिश साम्राज्याची नाचक्की झाली. घडलेल्या घटनेवर सारवासारव करण्यासाठी ब्रिटिशांनी एक समिती नेमली. काँग्रेसने ती नामंजूर केली. कारण त्या समितीत एकही भारतीय माणूस नव्हता. जालियनवाला बाग प्रकरणाची स्वतंत्रपणे चौकशी व्हावी

व सत्य बाहेर यावे यासाठी गांधीजींनी स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला व हे काम पंडित मोतीलाल नेहरु यांच्याकडे सोपविले. या समितीने आपला अहवाल जाहीर केला.त्यात ब्रिटिशांना दोषी ठरविले.

❑❑❑

**प्रकरण ८**

# असहकार चळवळ

दि. १ ऑगस्ट १९२० साली लोकमान्य टिळकांचे निधन झाले. त्यानंतर राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्त्व गांधीजींच्याकडे आले. गांधीजींनी पुढील एक वर्षात आपण स्वराज्य मिळवू अशी घोषणा केली. त्यासाठी त्यांनी असहकार चळवळीचे अस्त्र उगारले. ही चळवळदेखील पूर्वीच्या सर्व चळवळीप्रमाणे अहिंसक मार्गाने होणार होती. गांधीजींनी असे पाहिले की मूठभर ब्रिटिश अधिकारी हा देश चालवतात. त्यावेळच्या पद्धतीनुसार एक कलेक्टर, एक जिल्हा पोलीस प्रमुख आणि एक जिल्हा न्यायाधीश हे तिघेजण एका जिल्ह्याचा कारभार पाहतात. यांच्या हाताखाली काम करणारे जे अधिकारी, कर्मचारी, पोलीस असतात ते भारतीय असतात. मग जर का भारतीय कर्मचाऱ्यांनी काम बंद केले. सरकारशी असहकार केला तर आपोआपच ब्रिटिशांची कोंडी होईल आणि त्यांना मायदेशी निघून जावे लागेल. म्हणून त्यांनी असहकार चळवळीस सुरुवात केली ती सन १९२१ साली.

गांधीजींनी याबाबत जी भूमिका मांडली ती खालीलप्रमाणे आहे.

१) सरकारी शाळा, महाविद्यालये यावर विद्यार्थ्यांनी बहिष्कार घालावा. कार्यकर्त्यांनी सुरु केलेल्या राष्ट्रीय शाळेत, महाविद्यालयात प्रवेश घ्यावा.

२) तक्रारी घेऊन न्यायालयात अथवा पोलीस ठाण्यात अजिबात जाऊ नये. तक्रारींचे निवारण करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आपल्या विभागवार समित्या स्थापन कराव्यात व तेथे न्याय निवाडा करावा.

३) सरकारने बहाल केलेल्या पदव्या परत कराव्यात. तसेच सरकारने स्थापन केलेल्या कोणत्याही संस्थेमध्ये सरकारनियुक्त सभासद म्हणून पद स्वीकारु नये.

४) सरकारच्यावतीने जे समारंभ आयोजित केले जातात तेथे जाऊ नये.

५) लष्करात, पोलिसात भरती होऊ नये. सरकारच्यावतीने लढाई करण्यासाठी जाऊ नये.

६) सरकारच्यावतीने ज्या निवडणुका घेतल्या जातात त्यामध्ये भाग घेऊ नये. जे भाग घेतील त्यांच्यावर काँग्रेसने कारवाई करावी.

७) परदेशी मालावर बहिष्कार घालावा आणि त्याला पर्याय म्हणून स्वदेशी वस्तूंची निर्मिती करण्यात यावी. असा हा कार्यक्रम गांधीजींनी जनतेला दिला.

या कार्यक्रमाने जनता उत्साहीत झाली. जनतेमध्ये चैतन्य निर्माण झाले. अनेकांनी नोकऱ्या सोडल्या. शाळा सोडल्या. विदेशी वस्तू वापरणे बंद केले. देशी बनावटीच्या वस्तू वापरायला सुरुवात केली. ही सुरुवात तर चांगलीच होती. पण हे काम हळूहळू पुढे जाणार होते. चळवळ सुरु झाली की गांधीजी आपली मूळ तत्त्वे लोकांपुढे ठेवत असत. त्यामध्ये अहिंसा, सत्याग्रह, अस्पृशता निवारण असे कार्यक्रम असत. चळवळीत महिलांचा सहभाग कसा वाढेल याकडे त्यांचा कटाक्ष असे. ही चळवळ ग्रामीण भागात वाढेल यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आणि त्यांच्या प्रयत्नांना यशही लाभले.

उत्तर प्रदेशच्या गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा या गावात घडलेल्या एका घटनेमुळे मात्र गांधीजींना आपली असहकार चळवळ थांबविणे भाग पडले. उत्तरप्रदेश, बिहार या भागात अशी एक प्रथा आहे की, सभेला येताना लोक हातात एक काठी घेऊन येतात. त्याप्रमाणे चौरीचौरा गावात झालेल्या सभेला लोक काठ्या घेऊन आले. लोक काठ्या घेऊन येत आहेत अशी बातमी पोलीस ठाण्यात येऊन पोहोचली. खरे तर यामुळे बिचकून जाण्याचे काहीच कारण नव्हते. पोलिसांचा मात्र याबाबत गैरसमज झाला आणि त्यांनी काठ्या घेऊन सभेकडे निघालेल्या लोकांवर थेट गोळीबार केला. एका

टप्प्यावर त्यांच्याकडील गोळ्या संपल्या. ते घाबरले. माघारी परतले व पोलीस ठाण्याच्या दिशेने धावू लागले. पोलीस पळत आहेत हे पाहून लोकांना चेव आला. त्यांनी पोलिसांचा पाठलाग केला. पोलिसांना ठाण्यात कोंडले आणि संतापाच्या भरात त्यांनी पोलीस ठाण्याला आग लावून दिली. या आगीत एका जमादारसह २१ पोलीस मृत्युमुखी पडले. ही घटना फेब्रुवारी १९२२ मध्ये घडली. चौरीचौरामध्ये हे जे काही घडले ते दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून गांधीजींना वाचायला मिळाले. ते वाचून ते खूप अस्वस्थ झाले. हिंसा होता कामा नये हा त्यांचा कटाक्ष. पण येथे तर जमावाने २२ माणसांना जाळून मारले. असे हिंसेतून मिळणारे स्वातंत्र्य काय उपयोगाचे? अशा प्रश्न उपस्थित करत त्यांनी आपले आंदोलन मागे घेतल्याचे जाहीर केले. त्यामुळे असहकार आंदोलन एकतर्फी स्थगित झाले. गांधीजींच्या या भूमिकेवर त्यावेळी उलटसुलट खूप चर्चा झाली. पण गांधीजी आपल्या भूमिकेवर शेवटपर्यंत ठाम राहिले. असहकार चळवळ आणि चौरीचौरा हिंसाचार यास गांधीजींना जबाबदार ठरवून त्यांना अटक करुन ६ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. पण २ वर्षांनंतर १९२४ साली त्यांची मुक्तता करण्यात आली.

❑❑❑

## प्रकरण ९

# बेळगावातील काँग्रेसचे अधिवेशन

१९२३ सालचे काँग्रेसचे अधिवेशन आंध्रप्रदेशातील काकीनाडा येथे भरले होते. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी महमदअली हे होते. या अधिवेशनात भाग घेण्यासाठी बेळगावातील ज्येष्ठ नेते गंगाधरराव देशपांडे उपस्थित होते. अधिवेशनाच्या अखेरच्या सत्रात त्यांनी पुढील अधिवेशन बेळगाव शहरात घेण्यात यावे, अशी सूचना मांडली. ही सूचना काँग्रेस कमिटीने मान्य केली व सन १९२४ सालचे काँग्रेसचे अधिवेशन बेळगावात भरविण्याचा निर्णय काँग्रेस कमिटीने घेतला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अधिवेशनाचे अध्यक्षपद गांधीजींनी स्वीकारावे अशी विनंती काँग्रेस कमिटीने त्यांना केली आणि गांधीजींनी ती मान्य केली.

बेळगावात झालेल्या अधिवेशनास जमनालाल बजाज, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरु, पंडित मोतीलाल नेहरु, राजगोपालचारी, वल्लभभाई पटेल, डॉ. किचलू, पंडित मदनमोहन मालविय, लाला लजपतराय हे मान्यवर उपस्थित होते. स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्ते सरदार किशन सिंग हे आपले चिरंजीव भगतसिंग याच्यासह लाहोरहून बेळगावला अधिवेशनात भाग घेण्यासाठी आले होते. आपल्या चिरंजीवाने राष्ट्रीय नेत्यांना जवळून पहावे अशी सरदार किशनसिंग यांची इच्छा होती. हाच छोटा भगतसिंग पुढे देशातील तरुणांचा नेता म्हणून पुढे आला व शहीद झाला.

बेळगावात झालेले हे अधिवेशन यशस्वी तर झालेच शिवाय ते राजकारणाला वेगळे वळण देणारे ठरले.

१९१५ साली गांधीजी आफ्रिकेतून भारतात आले. १९१६ साली त्यांनी बनारसमधील सभेत केलेले भाषण म्हणजे त्यांचा राजकीय जाहीरनामा होता. १९१७ साली त्यांनी बिहारमधील चंपारण्य येथे नीळ उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन उभे करुन जिंकले. १९१८ साली गुजरातमधील खेडा येथे शेतकऱ्यांचे आंदोलन उभे करुन ते यशस्वी केले. त्याचवर्षी अहमदाबादमधील गिरणी कामगारांचा लढा यशस्वी केला. १९१९ मध्ये रौलट ॲक्टच्या विरोधात देशव्यापी आंदोलन पुकारले. जालियानवाला बाग येथे झालेल्या गोळीबाराच्या विरोधात त्यांनी सरकारचा निषेध करत आपला 'कैसर ए हिंद' हा किताब परत केला. १९२१ मध्ये असहकार चळवळ सुरु केली ती २२ साली स्थगित केली. अशाप्रकारे ते १९१६ ते १९२२ या कालखंडात सतत आंदोलनात दिसतात. आंदोलनात इतके सातत्य टिकविणे खूप कठीण असते जे गांधीजींना शक्य झाले. त्यामुळे काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांच्याकडे चालून आले.

## गांधीजी काँग्रेसचा चेहरा बदलतात

आतापर्यंत गांधीजी आपले राजकीय आणि सामाजिक कार्यक्रम आपल्यापरीने अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत. आता त्यांना हे सर्व कार्यक्रम काँग्रेसच्या सभामंचावर अधिकृतपणे नेणे शक्य झाले. सूत्रे हातात येताच त्यांनी काँग्रेसचा चेहरा मोहराच बदलून टाकला. त्यांनी पहिली गोष्ट केली ती म्हणजे राजकीय पक्षांनी केवळ राजकीय भूमिका न घेता सामाजिक भूमिकासुद्धा घेतली पाहिजे असा आग्रह धरला. काँग्रेसची स्थापना झाल्यानंतरच्या काळात सुरुवातीस काँग्रेसचे अधिवेशन झाल्यानंतर त्याच मंडपात सामाजिक परिषदेचे अधिवेशन भरविण्याची प्रथा होती. टिळकांना ती मान्य झाली नाही आणि म्हणून त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांकरवी ती प्रथा बंद होईल असे पाहिले. त्यानंतर तब्बल तीन दशकांनी गांधीजींनी सामाजिक

सुधारणेचे सर्व विषय थेट काँग्रेसच्या विषयपत्रिकेवरच आणले. उदा. गांधीजींनी असा आग्रह धरला की, अस्पृश्यता निवारण हा विषय राजकीय चळवळीचासुद्धा विषय झाला पाहिजे. स्वतंत्र हिंदुस्थानात अस्पृश्यता पाळली जात कामा नये. या विषयावर गांधीजी ठाम होते. त्यांनी असे आवाहनही केले होते की काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एक तरी दलित मुलगी आपल्या घरी आपल्या मुलांसोबत ठेवून घ्यावी, वाढवावी, तिचे शिक्षण करावे. गांधीजी ज्या गावात जात त्या गावातील हरिजन वस्तीत ते वास्तव्य करीत. दलित समाजा मध्ये सुद्धा उच्चनीचता असते. भंगी समाज हा खूप खालचा मानला जाई. म्हणून गांधीजी भंगी कॉलनीत वास्तव करीत. तेथेच पत्रकारांना बोलवत. विदेशी विचारवंतानीही त्यांना भेटायला तिकडेच यावे अशी त्यांची इच्छा असे. यावरुन गांधीजी या विषयावर कसे ठाम होते याची कल्पना येते.

स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा सहभाग वाढला पाहिजे असा विचार त्यांनी मांडला आहे. समाजाचा ५० टक्के भाग जर महिला असतील तर त्या स्वातंत्र्य चळवळीत उतरल्याशिवाय स्वातंत्र्य चळवळ गतीमान कशी होईल? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी महिलांना राजकारणात येण्याचे आवाहन केले. या दोन गोष्टी राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्याच पण सनातन्यांना दुखावणाऱ्या होत्या.

## लोकशाहीचा पुरस्कार

स्वतंत्र भारतात प्रत्येक प्रौढ स्त्री -पुरुषास मताचा अधिकार असावयास हवा. स्थापन होणारे सरकार सर्वांनी मिळून स्थापन करावे. निर्णय प्रक्रियेत सर्वांना समान संधी मिळावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. ही त्यांची भूमिका खूप महत्त्वाची होती. कारण त्या काळात महिला आणि दलित यांना मताचा अधिकार नव्हता. कारण त्यावेळच्या कायद्याप्रमाणे मालमत्ताधारक व करदाते यांनाच मताचा अधिकार असे. महिला आणि दलित यांच्या नावे कसलीच संपत्ती नसायची आणि म्हणून त्यांना मताचा अधिकार असणे संभव

नव्हते. गांधीजींनी या वर्गाला मताचा अधिकार मिळेल असे आश्वासन दिले. त्यामुळे पुढील काळात हा वर्ग उत्साहाने चळवळीत सामील झाला.

गांधीजींनी मांडलेले मुद्दे पुढीलप्रमाणे

● भाषावार प्रांतरचना असावी प्रांताना अंतर्गत कारभाराचे पूर्ण स्वातंत्र्य असावे अशी भूमिका त्यांनी मांडली.

● दारूबंदी असावी तसेच मादक पदार्थांच्या सेवनावर बंदी असावी.

● लष्करी खर्च अंतर्गत संरक्षणाला आवश्यक तेवढाच असावा.

● न्यायदान सुलभ आणि स्वस्त असावे. शेवटचे न्यायालय दिल्लीत असावे.

● सरकारी नोकरांचे पगार देशाच्या परिस्थितीस अनुरुप असे असावेत.

● पाश्चिमात्यांना मिळत असलेल्या व्यापारातील मक्तेदारीची चौकशी आयोगामार्फत व्हावी.

● अनियंत्रित अधिकार देणारे सर्व कायदे रद्द करण्यात यावेत.

● संस्थानावर मध्यवर्ती शासनाचे दडपण नसावे. संस्थानातील जनतेला हिंदुस्थानात सामील व्हायचे असेल तर तशी मुभा असावी.

● गुणवत्तेवर नोकऱ्या देण्यात याव्यात. सनदी व लष्करी नोकऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा हिंदुस्थानात घेतल्या जाव्यात.

● सर्व धर्मांना स्वातंत्र्य असावे व त्यांनी परस्परांविषयी सहिष्णुता धारण करावी.

● काही काळापर्यंत सरकार दरबारची भाषा ही त्या त्या प्रांतामध्ये असलेली स्थानिक भाषा असावी. मध्यवर्ती सरकार, विधीमंडळ, प्रिव्ही कौन्सिल यांची भाषा हिंदुस्थानी असावी. लिपी देवनागरी असावी. आंतरराष्ट्रीय राजकारणाची भाषा इंग्रजी असावी.

असा हा एक कार्यक्रम गांधीजींनी तयार केला आणि जनतेपुढे ठेवला. यातून एक दिसते की, गांधीजींनी जी भूमिका घेतली ती व्यापक होती. केवळ बिटिशांनी हिंदुस्थानातून निघून जावे एवढ्यापुरतीच ती सिमीत नव्हती. अस्पृश्यता निवारण, महिलांना न्याय आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य यावर त्यांचा भर राहिला.

त्यावेळच्या हिंदुस्थानचे औद्योगिकीकरण झालेले नव्हते. वेगवेगळे व्यवसाय करणारे कारागिर देशात होते. ते त्यांच्या त्यांच्या जातीत बंदिस्त होते. यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. त्यांना मताचा अधिकार तर मिळायला हवाच पण त्यांचे वेगळे मतदारसंघ असावेत म्हणजे त्यांचे प्रश्न चर्चेला येतील, अशी गांधीजींची भूमिका होती.

काँग्रेसचे अध्यक्षपद मिळाल्यामुळे गांधीजींच्या राष्ट्रव्यापी नेतृत्त्वावर शिक्कामोर्तब झाले. आपोआपच त्यांचा राजकीय आणि सामाजिक कार्यक्रमही जनतेने स्वीकारला. पण समाजातील एक घटक मात्र गांधीजींच्या या भूमिकेचा बारकाईने अभ्यास करीत होता. गांधीजींचा हा कार्यक्रम जर यशस्वी झाला तर देशात जी लोकशाही व्यवस्था निर्माण होईल त्यामुळे आपले वर्चस्व आपोआपच कमी होईल आणि आपले अस्तित्व असे उरणारच नाही, अशी भीती वाटणारा एक वर्ग उदयाला आला. यामध्ये प्रामुख्याने संस्थानांच्या प्रशासनात काम करणारा अधिकारी वर्ग होता. तसेच जमीनदार, जहागीरदार, वतनदार यांचा वर्ग होता. ब्रिटीशांच्या प्रशासकीय सेवेत काम करीत असलेला एक वर्ग होता. हा वर्ग प्रामुख्याने ब्राह्मण होता. संस्थानिक कोणी का असेना प्रशासनाची सूत्रे या वर्गाने आपल्या हातात ठेवली होती. ब्रिटिशांच्या प्रशासनावरही यांचेच वर्चस्व होते. हे सर्व वर्ग १९१६ सालापासून गांधीजींच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवून होते. १९२४ साली मात्र ते बिथरले. गांधीजींच्या राजकारणाला जर यश लाभले तर देशात बहुजनांची लोकशाही येणार आणि मग आजवरच्या आपल्या वर्चस्वाचे काय? असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला. आता आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आपण काहीतरी हालचाल करायलाच हवी असे त्यांना वाटू लागले. या अस्वस्थतेतूनच १९२५ साली विजयादशमीच्या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना नागपूर येथे डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी केली. संघाची स्थापना त्यांना तातडीने करावीशी वाटली याचे आणखी एक कारण म्हणजे देशात कम्युनिस्ट चळवळ रुजण्यास सुरुवात झाली होती. १९२० साली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस या राष्ट्रव्यापी

कामगार संघटनेची स्थापना झाली. या संघटनेत कार्यरत असलेले डांगे, मिरजकर इत्यादी नेते १९१७ साली रशियात झालेल्या क्रांतीने प्रभावीत झालेले होते. भारतातही आपण अशीच क्रांती करावयास हवी असे त्यांना वाटत होते. असेच वाटणारे आणखीही काही गट देशात तयार होत होते. याचीही जाणीव डॉ. हेडगेवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना झालेली असावी. यामुळेच त्यांनी संघाची स्थापना केली.

❑❑❑

# प्रकरण १०

# गांधीजी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

दक्षिण आफ्रिकेतून गांधीजी हिंदुस्थानात आलेच नसते तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना होण्याचा प्रश्नच नव्हता. हिंदुस्थानच्या राजकारणावर जोवर टिळकांचा प्रभाव होता तोवर अशी संघटना असावी असा विचार डॉ. हेडगेवार किंवा आणखी कोणी यांच्या मनात आला नाही. पण जेंव्हा गांधीजींनी बहुजन हिताचे राजकारण सुरु केले. तेंव्हा मात्र ही मंडळी बिथरली. हे ध्यानात घ्यावयास हवे.

## गांधीजींना थेट विरोध

डॉ. हेडगेवारांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गांधीजींना थेट विरोध करण्याची भूमिका स्वीकारली. गांधीजींनी चळवळीचे एक प्रतिक म्हणून गांधी टोपी विकसित केली. खादीच्या कापडाची, पांढऱ्या रंगाची ही टोपी वापरणे म्हणजे गांधीजींच्या चळवळीत भाग घेणे तसेच चळवळीला पाठिंबा देणे असे मानले गेले. पूर्वी फेटा बांधणारे, पगडी घालणारे, जरीची टोपी वापरणारे नेते, कार्यकर्ते आता गांधी टोपी वापरु लागले. याचे उत्तम उदाहरण म्हणून बेळगाव येथील गंगाधरराव देशपांडे यांचे देता येईल. ते मूळचे टिळकांचे सहकारी. ते फेटा बांधत. ते जेंव्हा गांधीजींच्या चळवळीत आले तेंव्हा त्यांनी गांधी टोपी वापरण्यास सुरुवात केली. अशी आणखीही उदाहरणे

देता येतील. डॉ. हेडगेवारांनी आपल्या चळवळीचे प्रतीक म्हणून जी टोपी तयार केली ती काळ्या रंगाची. तुमची टोपी पांढरी तर आमची टोपी काळी. आमचा तुम्हाला थेट विरोध. असे सांगणारी ती टोपी होती. आजही संघ स्वयंसेवक ती टोपी वापरतात. अतिशय कल्पकतेने डॉ. हेडगेवारांनी हे काम केल्याचे दिसते.

तिरंगा झेंडा, गांधी टोपी याबरोबरच गांधीजींनी चळवळीला एक घोषवाक्यही दिले. ते होते 'वंदे मातरम्'. ही घोषणा देत लाखोच्या संख्येने लोक तुरुंगात जाऊ लागले. या घोषणेची ब्रिटिशांनी धास्तीच घेतली. जे कोणी ही घोषणा देतील त्यास अटक करुन तुरुंगात पाठविले जाई. मारहाणही केली जाई. वंदे मातरम् म्हणत पाठीवर लाठ्या झेललेले अनेक स्वातंत्र्य सैनिक आजही देशात हयात आहेत. अशी चळवळ सुरु असताना संघाने मात्र स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणे विचारपूर्वक टाळले. संघ स्वयंसेवकांनी शिक्षण घ्यावे आणि त्याच्या जोरावर शासकीय नोकऱ्या मिळवाव्यात अशी संघाची भूमिका होती. गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य चळवळ जेवढी लांबणीवर जाईल तेवढी ती बरी म्हणजे आपणाला प्रशासकीय जागांवर ताबा मिळविता येईल असे डॉ. हेडगेवारांना वाटले. त्यानुसार त्यांनी आपली रणनीतीही आखली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्य बहुजन समाजाच्या हातात असेल पण प्रशासन मात्र आम्ही आमच्या हातात ठेवू, असा विचार त्यांनी केलेला होता. त्यामुळे संघ स्वयंसेवक स्वातंत्र्य चळवळीपासून दूर तर होतेच. शिवाय शक्य होईल त्या मार्गाने ते स्वातंत्र्य चळवळीस विरोधही करीत होते. ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात दीर्घकाळ काम केले त्या डॉ. स. ह. देशपांडे यांनी तत्कालीन सरसंघचालक मा. स. गोळवलकर यांची भेट घेऊन आपणही स्वातंत्र्य चळवळीत सहभागी व्हावे, असे सुचविले होते. पण गोळवलकर यांनी त्यांची सूचना मान्य केली नाही. संघाचे उद्दिष्ट पूर्णपणे वेगळे आहे. ते समजून घ्या इतकेच सांगून त्यांनी पुढील चर्चाच टाळली. डॉ. स. ह. देशपांडे यांनी आपल्या 'संघ स्थापनेतील अल्पज्ञात इतिहास' या पुस्तकात ही गोष्ट नोंदविली आहे. अशाप्रकारे संघ स्वातंत्र्य चळवळीपासून दूर राहिला.

# संघाचा वंदे मातरमला नकार

वंदे मातरम ही चळवळीची घोषणा झाली. ही घोषणा इतकी लोकप्रिय झाली की लोक एकमेकाला भेटल्यावर नमस्कार म्हणण्याऐवजी आता वंदे मातरम म्हणू लागले. सत्याग्रही वंदे मातरम म्हणत तुरुंगात जात. तुरुंगातही वंदे मातरमच्या घोषणा देत. वंदे मातरम म्हटल्याबद्दल त्यांना मारहाण सोसावी लागे. अशा काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मात्र वंदे मातरम म्हणणे टाळले. संघाची अशी भूमिका होती की, वंदे मातरम म्हटल्याबद्दल जर तुरुंगवास होतो तर ते न म्हटलेले बरे. पण जेंव्हा काही संघ स्वयंसेवक वंदे मातरम्बद्दल विचारु लागले. वंदे मातरम् म्हणण्याचा आग्रह करु लागले. तेंव्हा संघ नेतृत्त्वाने असे ठरविले की, वंदे मातरम्चाच आशय असलेले एक गीत संघासाठी तयार करुन घ्यावे. गीत तयार करण्याची जबाबदारी नागपूर येथील संस्कृतचे प्राध्यापक एन. एन. भिडे यांच्यावर सोपविली गेली. त्यांनी 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमी' हे गीत तयार केले. १९३९ साली नागपूर येथे भरलेल्या संघ स्वयंसेवकांच्या शिबिरात यादवराव जोशी यांनी ते प्रथम गायिले. त्यानंतर संघ शाखेवर हे गीत गाण्याची प्रथा सुरु झाली. अशाप्रकारे संघाने वंदे मातरम्ला पर्याय शोधला. स्वातंत्र्यपूर्व काळात वंदे मातरम म्हणण्यास नकार देणारा संघ आता मात्र संपूर्ण वंदे मातरमची सक्ती व्हावी असे म्हणतो. यावरुन काय ते समजून घ्यावे.

संघाने वंदे मातरम म्हणणे टाळले असले तरी एकवेळ समजून घेता आले असते. पण संघ तेवढ्यावर थांबला नाही. संघाने वंदे मातरमची यथेच्छ टिंगल केल्याचे दिसते.

एखाद्याने वंदे मातरम असे म्हटले की, त्याची टिंगल करण्यासाठी 'शेंडी कातरम' असे म्हटले जाई. या म्हणण्यालादेखील एक अर्थ होता. ते समजून घेतले पाहिजे. शेंडी हे हिंदुत्वाचे प्रतीक मानले जाते. गांधीजींच्या नादी लागाल, त्यांच्या चळवळीत भाग घ्याल तर हिंदुत्व गमावून बसाल असे संघाला सुचवायचे होते.

वंदे मातरम्ची टिंगल 'खिसा कातरम' अशीही केली गेली. खिसा कातरम

याचा अर्थ असा की, गांधीजींच्या नादाला लागून तुम्ही तुरुंगात जाल. तुरुंगात गेल्यामुळे तुमचे शिक्षण थांबेल. व्यवसाय बुडतील. आर्थिक नुकसान होईल.

राष्ट्रीय चळवळीत नवनवी जोशपूर्ण गाणी तयार होत होती. त्यातील एक 'वेद मंत्राहून आम्हा, वंद्य वंदे मातरम्' वेदांपेक्षाही आम्हाला वंदे मातरम हे वंदनीय आहे. अशा आशयाचे हे गीत त्या काळात ग. दि. माडगूळकरांनी रचले आहे. यावरुन वंदे मातरमची लोकप्रियता समजून येते.

गांधीजींच्या विषयी गैरसमज पसरविण्याचे काम संघ स्वयंसेवक लोकपातळीवर प्रभावीपणे करीत राहिला. त्याबद्दलचे एक उदाहरण ध्यानात घेण्यासारखे आहे. स्वयंसेवकांच्या बैठकीतील हा व्यवहार आहे.

शिक्षक– सांगा हिंदुस्थानात आधी कोण आले. मुसलमान की ख्रिश्चन

स्वयंसेवक – थोडासा विचार करुन म्हणतो. हिंदुस्थानात मुसलमान आधी आले.

शिक्षक – गांधीजी हिंदुस्थानातून कोणाला बाहेर जा म्हणतात.

स्वयंसेवक – ब्रिटिशांना म्हणजेच ख्रिश्चनांना,

शिक्षक – आधी बाहेर कोण गेले पाहिजे.

स्वयंसेवक – मुसलमान आधी आले म्हणून त्यांनी आधी बाहेर जावयास हवे.

शिक्षक – गांधीजी चूक की बरोबर.

स्वयंसेवक – गांधीजी चूक. कारण ते ब्रिटिशांना बाहेर जा म्हणतात.

अशाप्रकारे गांधीजींच्या चळवळीबाबत दिशाभूल करण्याचे काम संघ शाखेवर चालत असे. याबाबतचे लिखित पुरावे मिळत नाहीत. पण ज्यांनी दीर्घकाळ संघात राहून कार्य केले त्यांच्याकडून ही माहिती मिळू शकते.

गांधीजींचा भर हा हिंदू–मुसलमान ऐक्यावर असायचा. तर संघाचा भर हा मुसलमान समाजा संबधी द्वेष पसरविण्यावर असायचा. गांधीजींची चळवळ बदनाम कशी होईल, तरुणवर्ग तिच्यापासून परावृत्त कसा होईल यासाठी संघाने अनेक युक्त्या शोधून काढल्या. पण समाजाने गांधीजींचीच पाठराखण केल्याचे दिसते. गांधीजींचा विचार पटल्यामुळे जनता गांधीजींच्या बाजूने उभी राहिली.

स्वातंत्र्य चळवळीस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे विरोध करीत राहायचे. जेणेकरुन पारतंत्र्याचा कालावधी लांबावा. त्यामुळे ब्रिटीशांनी दिलेल्या शैक्षणिक सुविधांचा लाभ घेत शासकीय नोकऱ्या बळकावता येतील. म्हणजे ग्रामपातळीपासून ते दिल्लीपर्यंतचे प्रशासकीय व्यवहार आपल्या हातात राहतील. याद्वारे संपूर्ण राज्यव्यवस्थेवर आपला वचक ठेवता येईल आणि त्यामुळे शेकडो वर्षांचे आपले वर्चस्व अबाधित राखता येईल. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संघ काम करीत होता. जातीय दंग्यांना पोषक असे वातावरण तयार करीत होता. त्यामुळे जातीय दंगे होत आणि स्वातंत्र्य चळवळीचा वेग कमी होई. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेउन ती गतीमान करण्याइतकी क्षमता संघाने त्या काळात होती. संघावर जेंव्हा १९४८ साली बंदी घातली गेली त्यावेळी बंदीचा निषेध करत आणि बंदी मागे घ्या, अशी मागणी करत देशभरात ४८ हजार संघ स्वयंसेवकांनी सत्याग्रह करुन अटक करुन घेतली. पण स्वातंत्र्य चळवळीत मात्र संघाने भाग घेतला नाही. त्यामुळे कोणाला अटक होण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. डॉ. हेडगेवारांनी वैयक्तिकरित्या सत्यागृह करुन तुरुंगवास सोसला. पण त्यांनी आपल्या संघटनेला स्वातंत्र्य लढ्यात उतरविले नाही.

गांधीजींच्या चळवळींना जसा संघाने विरोध केला. तसाच तो आणखी कोणी कोणी केला हे ध्यानात घ्यावयास हवे.

## संस्थानिकांचा विरोध

देशात त्यावेळी ५६५ लहान मोठी संस्थाने होती. यामधील काही संस्थानिक हिंदू होते तर काही मुसलमान. संस्थानिक कोणत्याही धर्माचे असोत त्यांचा राज्यकारभार सांभाळणारे ब्राह्मणच होते. गांधीजींनी १९१६ साली जी भूमिका घेतली त्याप्रमाणे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व संस्थानांचे देशात विलिनीकरण आणि संस्थानिकांकडील संपत्तीचा देश बांधणीसाठी उपयोग

होणार होता. गांधीजी आमची संपत्ती काढून घेणार अशी भावना संस्थानिकांच्या मनात यामुळे निर्माण झाली होती. काही संस्थानिकांनी आपली संपत्ती विदेशात पाठविण्यास सुरुवातही केली. संस्थानिकांनी त्यांना नेहमीच विरोध केला. जे संस्थानिक जनविरोधी भूमिका घेत जनतेला त्रास द्यायचे. त्यांच्या विरोधात गांधीजींनी अनेकवेळा आंदोलने केली आहेत. गांधीजींना विरोध करण्यासाठी हिंदू संस्थानिकांनी आपल्या संस्थांनात हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पाठिंबा दिला. तसेच मुसलमान संस्थानिकांनी आपल्या संस्थानात मुस्लिम लीग आणि तशाच विचाराच्या इतर संघटनांना पठिंबा देऊन स्वातंत्र्य चळवळीत अडसर निर्माण करण्याचे काम केले. म्हणून संघाची वाढ ही संस्थानातून अधिक आणि इतरत्र कमी अशी झालेली दिसते.

## हिंदू महासभेचा गांधीजींना विरोध

गांधीजींच्या सामाजिक भूमिकेत अस्पृश्यता निवारण हा महत्त्वाचा मुद्दा होता. गांधीजी या मुद्याला खूप महत्त्व देत. दलित जीवन समजून घेण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. अस्पृश्यता हा आपल्या समाज जीवनावरील एक कलंक आहे आणि तो पुसला जाणे महत्त्वाचे आहे अशी त्यांची भूमिका होती. त्यांची ही भूमिका संघ आणि हिंदू महासभेला अजिबात मान्य नव्हती. हिंदू महासभेचा सामाजिक सुधारणांना विरोधच होता. हिंदू महासभेचा भर देशाच्या लष्करीकरणावर होता. गांधीजी मात्र समाजाच्या लष्करीकरणाच्या बाजूचे नव्हते. गांधीजींची याबाबतची भूमिका पूर्णपणे वेगळी होती. गांधीजींना हिंदू-मुसलमान यांचे ऐक्य अपेक्षित होते. त्यासाठी ते प्रयत्नशील असायचे. हिंदू-मुस्लिम ऐक्याला हिंदू महासभेचा विरोध होता. आणि म्हणून गांधीजींच्या राजकारणाला हिंदू महासभेने सातत्याने विरोध केल्याचे दिसते.

# मुस्लिम लीगचा विरोध

मुस्लिम लीगने गांधीजींना सतत विरोध केला. मुस्लिम लीगचे नेतृत्त्व मुसलमान समाजातील धनिक वर्गाकडे होते. यामध्ये संस्थानिक, जहागीरदार, जमीनदार यांचा समावेश होता. स्वातंत्रप्राप्तीनंतर गांधीजी आपली संपत्ती मागतील अशी त्यांना भीती वाटत होती. तसेच टिळक, जीना यांनी केलेल्या लखनौ करारानुसार मुसलमानांना ज्या ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या स्वतंत्र भारतात गांधीजी ही सवलत आपणाला देतील काय? अशी शंका त्यांच्या मनात आली. मुस्लिम लीगने गांधीजींना विरोध करण्यामागचे हे एक कारण होते.

अशाप्रकारे एका बाजूने गांधीजी ब्रिटीशांच्याविरोधात देशव्यापी जनआंदोलन उभे करण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचवेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा, मुस्लिम लीग, संस्थानिक हे गांधीजींच्या राष्ट्रीय चळवळीला विरोध करीत होते. विरोध करण्यासाठी अनेक मार्ग शोधत होते.

❑❑❑

## प्रकरण ११

# राष्ट्रीय चळवळीला क्रांतीकारक वळण

गांधीजींनी घेतलेली भूमिका आणि १९२५ साली स्थापन झालेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाने देशात उभ्या केलेल्या श्रमजीवी जनतेच्या चळवळी, यामुळे राष्ट्रीय चळवळीला वेगळे वळण लागण्यात मदत झाली. ब्रिटिशांना भारतातून घालवून दिले पाहिजे पण त्याचबरोबर स्वतंत्र भारत कसा असेल याचेही स्वरुप स्पष्ट झाले पाहिजे, अशी मागणी पुढे येऊ लागली. जसजशी कामगार चळवळ देशात वाढू लागली तसतशी दडपशाहीदेखील वाढू लागली. देशातील परिस्थितीचा विचार करण्यासाठी ब्रिटिशांनी सन १९२८ साली सर जॉन सायमन यांच्या नेतृत्त्वाखाली एक समिती गठीत केली. सायमन कमिशन म्हणून ही समिती ओळखली जाते. या समितीमध्ये एकही भारतीय व्यक्ती नव्हती. या समितीत भारतीय व्यक्तीचा समावेश असावा तरच आम्ही सायमन कमिशनशी बोलू अन्यथा आम्ही सायमन कमिशनवर बहिष्कार घालू, अशी भूमिका गांधीजींनी आणि कम्युनिस्टांनी घेतली. कमिशनमध्ये भारतीय व्यक्तीस घेण्यास ब्रिटिशांनी नकार दिल्यानंतर राष्ट्रीय चळवळीने सायमन कमिशनला विरोध करण्यासाठी राष्ट्रव्यापी आंदोलन उभे केले. सायमन जेंव्हा अमृतसर येथे आले. तेंव्हा त्यांच्या विरोधात जोरदार निदर्शने झाली. निदर्शनांचे नेतृत्त्व करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर लाठीमार झाला. या लाठीमारात ते गंभीर जखमी झाले

व पुढे त्यांचे निधनही झाले. यामुळे देशभरात संतापाची लाट उसळली. देशभर सायमन यांना काळे झेंडे दाखवून निदर्शने करण्यात आली. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या चळवळीत गांधीजींचे संघटन कौशल्य अगदी महत्त्वाचे होते. त्या काळात त्यांचा जाहीर सभा घेण्याचा दर सरासरी दररोज नऊ सभा एवढा होता. त्याकाळात प्रवासाची साधने कमी होती. कधी मोटारीने, कधी बसने तर कधी रेल्वेतून, बैलगाडी, घोडा जे मिळेल ते साधन वापरुन गांधीजींनी देश पिंजून काढला. एका बाजूने ही चळवळ सुरु असतानाच ब्रिटिशांनी कम्युनिस्ट नेत्यांची धरपकड सुरु केली. मुंबईतील कामगारांचे संघटन करुन त्यांनी राणी सरकारच्याविरोधात कट रचला आहे, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. यामध्ये कॉ. डांगे, कॉ. मिरजकर, कॉ. जोगळेकर, कॉ. घाटे, कॉ. निमकर हे प्रमुख नेते होते. या नेत्यांना अटक केल्याबद्दल गांधीजींनी ब्रिटिश सरकारचा निषेध करुन कामगार नेत्यांविषयी सहानुभूती व्यक्त केली होती. अशाप्रकारे त्यांनी आपले क्रांतीकारकत्व स्पष्ट केले. यामुळेही देशातील उजव्या प्रतिगामी शक्तींच्या पोटात दुखणे स्वाभाविक होते.

या पार्श्वभूमीवर डिसेंबर १९२९ साली लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात घेण्यात आलेले निर्णय हे राष्ट्रीय चळवळीची दिशा स्पष्ट करणारे आणि क्रांतीकारक ठरले. या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला. या ठरावाबाबत गांधीजी स्वत: थोडेसे साशंक होते. आपण संपूर्ण स्वातंत्र्य मागावे की वसाहतीचे स्वातंत्र्य मागावे असा एक गोंधळ त्यांच्या मनात होता. पण अधिवेशनाला जे प्रतिनिधी आले होते त्यांचे मत मात्र आता संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी आपण करावी, असे होते. त्यानुसार पंडित जवाहरलाल नेहरु यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडला. तो बहुमताने संमत झाला आणि नंतर या ठरावावर दीर्घकाळ चर्चा झाली. चर्चेअंती अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचे स्वरुप कसे असेल हे महत्त्वाचे होते. याबाबत झालेल्या निर्णयानुसार देशात लोकशाही व्यवस्था असेल, देश

धर्मनिरपेक्ष असेल, देशाची वाटचाल समाजवादी सिद्धांताला अनुसरुन असेल असे स्पष्टीकरण राष्ट्रीय नेत्यांनी चळवळीला दिले. या ठरावानंतर संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण पसरले. आपण चळवळीत सहभागी होण्यास उत्सुक आहोत असे लोक स्वत:हून म्हणू लागले. लोकांचा चळवळीतील सहभाग वाढला. उद्या येणारे राज्य हे आपले असणार आहे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण झाली.

❑❑❑

## प्रकरण १२

# मीठाचा सत्याग्रह

देशात सर्वत्र असे क्रांतीकारक वातावरण निर्माण झालेले असतानाच बिटिशांनी मीठावर कर लावत असल्याचे जाहीर केले. त्यामुळे जे शेतकरी मीठ तयार करीत असत त्यांना आता कर भरावा लागणार होता. त्याचा परिणाम म्हणून मीठ महागणार होते. राष्ट्रीय चळवळीने या कराला विरोध करण्याचा निर्णय घेतला आणि जनजागृतीस सुरुवात केली. येथे एक मुद्दा प्रकर्षाने ध्यानात येतो की, काँग्रेसचे अध्यक्षपद कोणाकडेही असो नेतृत्त्व मात्र गांधीजींच्याकडे असे. १९२४ साली गांधीजी काँग्रेसचे अध्यक्ष झाले आणि त्यानंतर कधीही त्यांनी काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारले नाही. मात्र नेतृत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडेच होती. मीठाच्या सत्याग्रहात त्यांनी महिलांना सामावून घेण्याची रणनीती आखली. मीठ ही अशी एक वस्तू आहे की, जिचा संबंध स्वयंपाकाशी आणि स्वयंपाकघराशी असतो. म्हणूनच गांधीजींनी स्त्रियांना आंदोलनात उतरविण्याचा निर्णय घेतला. त्यांनी महिलांना भावनिक साद घातली. 'उद्यापासून तुझा स्वयंपाक अळणी होणार म्हणून तू विरोध करण्यासाठी बाहेर ये.' गांधीजींची ही मात्रा लागू पडली. देशभरातील महिला संतापल्या. पुरुषांच्या खाद्याला खांदा लावून आम्ही तुरुंगात जावयास तयार आहोत, अशी मानसिक तयारी त्यांनी दाखविली. रस्त्यावरील आंदोलनास महिला तयार झाल्या. राष्ट्रीय चळवळीचे अभ्यासक

असे मानतात की, मीठाचा सत्याग्रह हे देशातील सर्वात मोठे, महिलांचा सहभाग असलेले पहिले जनआंदोलन. संपूर्ण देश या आंदोलनात सहभागी झाला.

## दांडी मार्च

दांडी मार्च हे गांधीजींच्या जीवनातील एक महत्त्वाचे आंदोलन. मीठावर लादलेला कर रद्द करुन घ्यायचा आणि त्याबरोबरच सारा देश सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात उतरावयाचा या जिद्दीने गांधीजींनी या आंदोलनाची आखणी केली. साबरमती आश्रमापासून ते दांडी या गावापर्यंत पदयात्रा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय मी साबरमती आश्रमात परत येणार नाही अशी घोषणा त्यांनी केली आणि ते पदयात्रेला निघाले. ज्या गावातून जायचे आहे त्या गावात वातावरण निर्मिती करणे, सत्याग्रहींची राहण्याची, भोजनाची सोय करणे ही जबाबदारी त्यांनी वल्लभभाई पटेल यांच्यावर सोपविली. कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन वल्लभभाई निघाले. पण त्यांना ब्रिटिशांनी अटक केली. गांधीजींनी पदयात्रेबाबत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. चौरीचौरा येथे झालेल्या हिंसाचारामुळे आंदोलन स्थगित करावे लागले होते. आता तसे होऊनये म्हणून त्यांनी आपल्या बरोबर निवडक ७९ कार्यकर्ते घेतले. ज्यांचा अहिंसा आणि सत्यागृह यांच्यावर पूर्ण विश्वास होता. साबरमतीहून दि. १२ मार्च रोजी गांधीजी सकाळी निघाले. दांडी या गावापर्यंत पोहोचण्यासाठी जवळजवळ ४५ गावे ओलांडून त्यांना जावे लागले. वाटेत नर्मदा नदी लागते. बोटीतून ती सर्वांनी ओलांडली. ज्या गावात पदयात्रा जाई तेथील लोक स्वागतासाठी येत. तेथे गांधीजींना भाषण करावे लागे. त्यांचे शब्द ऐकण्यास लोक उत्सुक असत. असे करत ५ एप्रिल रोजी ते दांडी या गावात पोहोचले. तब्बल २४ दिवस ते चालत होते. दांडीला पोहोचल्यानंतर त्यांनी मुक्काम केला. ६ तारखेला सकाळी त्यांनी समुद्रस्नान केले आणि मीठ उचलले. गांधीजींनी मीठ उचलले व सत्याग्रह केला ही बातमी अल्पकाळातच सर्वत्र पोहोचली. दांडी गावात पिण्याच्या पाण्याची

टंचाई होती. त्यामुळे आपल्या सर्व सहकाऱ्यांसह त्यांनी दांडीजवळच्या कोराडी गावात मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. कोराडीमध्ये राहून त्यांनी आसपासच्या गावातून सभा घेणे सुरु ठेवले. ब्रिटिशांनी गांधीजींच्या या आंदोलनाची फारशी दखल घेतली नाही. म्हणून पुढे त्यांनी असा निर्णय घेतला की, धारासना या गावात जे सरकारच्या मालकीचे मीठागर होते तेथे जाऊन ते मीठ लुटायचे. ठरल्याप्रमाणे गांधीजी ६ मे रोजी धारासना येथे पोहोचले. त्यांनी मीठ लुटले. त्यानंतर ब्रिटिशांनी त्यांना अटक केली व त्यांना येरवड्याच्या तुरुंगात बंदिस्त केले. आता प्रश्न आला नेतृत्त्व करण्याचा. गांधीजींनी अटक होण्यापूर्वी नेतृत्त्वाची सूत्रे आपले सहकारी अब्बास तय्यबजी यांच्याकडे सोपविली. तय्यबजी हे निवृत्त न्यायाधीश होते. त्यांनाही अटक झाली. तय्यबजी यांच्यानंतर नेतृत्त्वाची धुरा सांभाळण्यासाठी सरोजिनी नायडू पुढे सरसावल्या. बिटिशांनी त्यांनाही अटक केली. दक्षिण आफ्रिकेतून हिंदुस्थानात आलेले गांधीजींचे सहकारी इमामसाहेब नेतृत्त्व करण्यासाठी पुढे सरसावताच त्यांनाही अटक झाली. नेत्यांना अटक केल्यानंतर बिटिश पोलिसांनी सत्याग्रहींवर लाठीमार करण्यास सुरुवात केली. लाठीमार इतका भीषण होता की, सत्याग्रहींच्या जखमांवर मलमपट्टी करण्यासाठी तेथे तात्पुरते हॉस्पिटल कार्यकर्त्यांना उभे करावे लागले. ब्रिटिश पोलिसांनी पुढे कहरच केला. त्यांनी जखमी सत्याग्रहींना मीठाच्या पाण्यात फेकून देण्यास सुरुवात केली. त्यामुळे सत्याग्रही खूपच त्रस्त झाले. आत्मारामभाई या सत्याग्रहीला पोलिसांनी २० वेळा मीठाच्या पाण्यात बुचकळून काढले. पण एकाही सत्याग्रहींने ब्रिटिश पोलिसांविरोधात ना लाठी उगारली ना दगड फेकला. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या अहिंसक मार्गाने हा सत्याग्रह झाला.

मीठाचा सत्याग्रह दांडी येथे यशस्वी झाल्याच्या बातम्या देश आणि देशाबाहेर गेल्या. देशातील जनतेने जेथे शक्य असेल तेथे सत्याग्रह केला. किनारपट्टीवरील भागात हजारोच्या संख्येने लोक सत्याग्रही आंदोलनात सामील झाले. विशेष म्हणजे यामध्ये महिलांचा सहभाग फार मोठा होता.

देशाच्या इतिहासात प्रथमच महिला इतक्या मोठ्या संख्येने आंदोलनात उतरल्याचे दिसले. समाज भयमुक्त झाला. लोकांना आता तुरुंगात जाण्याची भीती वाटेनाशी झाली.

गांधीजींना अटक झाल्याची बातमी वायव्य सरहद्द प्रांतात पसरली. खान अब्दुलगफार खान हे त्या प्रांताचे नेते होते. सरहद्द गांधी म्हणूनही ते ओळखले जात. गांधीजींच्या अटकेच्या निषेधार्थ त्यांनी सरहद्द प्रांतात निषेध मिरवणुका काढल्या. या मिरवणुकांवर बिटिश पोलिसांनी थेट समोरुन गोळीबार केला. या गोळीबारामुळे रस्त्यावर मृतदेहांचा चक्क खच पडला. काही जणांनी आपल्या जवळच्या लोकांची ओळख पटवली आणि त्यांना घरी नेऊन त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले. बरेचजण मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी आलेच नाहीत. अशा बेवारस प्रेतांवर पोलिसांनी पेट्रोल ओतले आणि प्रेते जाळून टाकली. आपल्या या कृतीमुळे जनतेच्या भावनांशी आपण खेळत आहोत, याचे भान त्यांना राहिले नाही. पोलिसांच्या या कृतीचा देश विदेशात निषेध झाला. शेवटी ब्रिटिश राज्यकर्त्यांना नमते घ्यावे लागले. मीठावर लावण्यात आलेल्या करात त्यांनी कपात केली. अशाप्रकारे गांधीजींनी हे आंदोलन जिंकले.

## संघ अस्वस्थ

मीठाचा सत्याग्रह पूर्णपणे यशस्वी झाला. मीठाच्या उत्पादनावर लावण्यात आलेला कर ब्रिटिशांनी कमी केला. आपण आंदोलन करु शकतो आणि ते जिंकूही शकतो असा विश्वास आता भारतीय जनतेमध्ये सावकाश निर्माण होत होता. हे आंदोलन पाहून पुन्हा एकदा डॉ. केशव बळीराम हेडगेवार अस्वस्थ झाले. राष्ट्रीय आंदोलनातील जनतेचा सहभाग जर असाच वाढत गेला तर स्वातंत्र्यप्राप्ती होईलच. पण त्याचबरोबर त्यातून जी समाजव्यवस्था निर्माण होईल ती मात्र आमच्या फायद्याची नसेल असे त्यांना मनोमन वाटले. डॉ. हेडगेवार अस्वस्थ होण्याचे आणखी एक कारण घडले ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चळवळी. महाड येथे मार्च

१९२७ मध्ये पाणीप्रश्नावर सत्याग्रह केला. महाड नगरपालिकेने शहरातील चवदार तळ्याचे पाणी दलित बांधवांना वापरावयास मिळावे असा ठराव केला होता. पण त्याची अंमलबजावणी मात्र केली नव्हती. ही अंमलबाजावणी व्हावी व दलित बांधवांना तलावाचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी तलावातील पाण्याला स्पर्श करुन सत्याग्रह केला. यामुळे सनातनी हिंदू खवळले. त्यांनी दलित सत्याग्रहींवर दगडफेक केली व दुसऱ्या दिवशी चवदार तळे गोमूत्र ओतून शुद्ध केले. यावरुन त्या काळातील सनातन्यांची मानसिकता कशी होती याची कल्पना येते. डॉ. बाबासाहेबांनी दलित प्रश्नांचा खोलवर अभ्यास केल्यावर त्यांना याची जाणीव झाली की, या सर्व समस्यांचे मूळ हे मनुस्मृती या ग्रंथामध्ये आहे. या ग्रंथातील तत्त्वज्ञानाचा निषेध करण्यासाठी त्यांनी मनुस्मृतीचे दहन करण्याचे जाहीर केले व २५ डिसेंबर रोजी त्या ग्रंथाचे जाहीरपणे दहन केले. त्यानंतर दलितांच्यावर महाराष्ट्रात खूप अन्याय झाला. पुढे डॉ. बाबासाहेबांनी दलितांना हिंदू मंदिरात प्रवेश मिळावा अशी मागणी केली. या मागणीसाठी त्यांनी ३ मार्च १९३० रोजी नाशिक येथील काळाराम मंदिरापुढे सत्याग्रह केला. एका बाजूने गांधीजींच्या चळवळीच्या माध्यमातून लोकशाहीचा विचार पुढे येत होता तर दुसऱ्या बाजूने दलित चळवळ जोमाने पुढे येत होती. या वातावरणामुळे संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार अस्वस्थ झाले. त्यांनी आपले सहकारी डॉ. मुंजे यांच्याशी संपर्क साधून बोलावून घेतले. देशात निर्माण झालेल्या परिस्थितीची चर्चा केली. चर्चेअंती त्यांनी डॉ. मुंजेंना असे सुचविले की, त्यांनी तातडीने इटलीला जावे. मुसोलिनीला भेटावे. त्यास भारतातील परिस्थिती समजून सांगावी व पुढील कार्यक्रम त्याच्या सल्ल्यानुसार ठरवावा. त्यानुसार सन १९३१ साली डॉ. मुंजे मुसोलिनी यास भेटण्यासाठी इटलीला गेले. बेनिटो मुसोलिनी याचा लोकशाहीला विरोध होता. तो फॅसिझमचा कट्टर पुरस्कर्ता होता. तेथे डॉ. मुंजे यांनी मुसोलिनीने स्थापन केलेल्या अकादमी ऑफ फॅसिझम या संस्थेस भेट दिली. इटलीमध्ये फॅसिझम कसा आणता येईल याचा अभ्यास करण्यासाठी मुसोलिनी याने या अकादमीची स्थापन केली होती.

या संस्थेत राहून डॉ. मुंजे यांनी फॅसिझमचे तत्त्वज्ञान, कार्यपद्धती यांचा सखोल अभ्यास केला. मुसोलिनी याने इटलीला डोळ्यासमोर ठेवून आपली रणनीती तयार केली होती. डॉ. मुंजे यांनी तिचा अभ्यास केला आणि भारतात परत आल्यावर आपणाला तेथे फॅसिझम कसा आणता येईल याची मुसोलिनीबरोबर दीर्घकाळ चर्चा केली. भारतात फॅसिस्ट राजवट स्थापन करायचीच या जिद्दीने ते भारतात परतले. भारतात येताच त्यांनी लगेचच डॉ. हेडगेवार यांची भेट घेउन इटली दौऱ्याचा वृत्तांत सादर केला. नंतर नागपूर शहरात फॅसिझम या विषयावर सभा बोलविण्यात आली. ज्या सभेचे अध्यक्षस्थान डॉ. हेडगेवार यांनी स्वीकारले होते. गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली देशात उभ्या राहत असलेल्या राष्ट्रीय चळवळीला आणि या चळवळीतून उदयाला येणाऱ्या लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षिता या तत्त्वांना विरोध करण्यासाठी डॉ. हेडगेवार आणि डॉ. मुंजे यांनी फॅसिझमचे तत्त्वज्ञान स्वीकारुन, ते आधारभूत मानून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाद्वारे आपली चळवळ देशात उभी करण्यास सुरुवात केली.

❑❑❑

## प्रकरण १३

# गांधीजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

गांधीजी राष्ट्रीय चळवळ देशव्यापी करण्याचा प्रयत्न करीत होते. चळवळीत सर्व समाज घटकांनी सहभागी व्हावे यासाठी ते प्रयत्नशील होते. सर्व दलित बांधव आणि महिला यांना बरोबर घेतल्याखेरीज आपण चळवळ धारदार करु शकणार नाही, असे त्यांना वाटे आणि म्हणूनच त्यांचा प्रयत्नही दलित आणि महिला यांना सामावून घेण्याचा होता. सन १९२० च्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्त्व उदयाला आले. विदेशात राहून उच्च शिक्षण घेतलेले डॉ. बाबासाहेब हे दलित समाजाला न्याय कसा मिळेल याचा विचार करीत होते. भारतातून ब्रिटिश निघून गेले व स्थानिक नेतृत्त्वाकडे सत्तेची सूत्रे आली तर दलितांचे प्रश्न सुटतील असे त्यांना वाटत नव्हते. बालपणापासून त्यांना सवर्ण हिंदूंनी जी वागणूक दिली होती त्यातून ते बरेच शिकले होते. दलित समाजाचे प्रश्न समजून घेउन आता आपण कृतीचे पाऊल उचलले पाहिजे म्हणून त्यांनी सलग तीन आंदोलने केली.

दलितांना पिण्यासाठी पाणी मिळत नसे. पाणवठ्यावर त्यांना अपमान सहन करावा लागे. हे ध्यानात घेऊन त्यांनी दलितांचा पिण्याचा पाण्याचा मुद्दा उपस्थित केला. महाड नगरपालिकेने गावातील चवदार तळ्याचे पाणी दलितांना मिळावे अशा आशयाचा ठराव केला होता पण अंमलबजावणी करण्यात तयारी नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. २० मार्च १९२७

रोजी तेथे परिषद भरवून सत्याग्रह करण्याचे जाहीर केले. महाराष्ट्रातील दलित बांधवांनी महाडला यावे असे आवाहन त्यांनी केले. त्यानुसार हजारोच्या संख्येने दलित बांधव महाडला आले. सत्याग्रहाच्या ठिकाणी एक भव्य मंडप उभारण्यात आला होता. मंडपामध्ये एखाद्या नेत्याचे छायाचित्र असावे अशी मागणी काही कार्यकर्त्यांनी केली. तेंव्हा डॉ. बाबासाहेबांनी छायाचित्र लावायचेच असेल तर गांधीजींचे लावा असे सांगितले. त्यांच्या सांगण्यावरुन गांधीजींचे छायाचित्र तेथे लावण्यात आले. यावरुन हे स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेबांच्या मनात गांधीजींच्या कार्याबद्दल आदर होता, विश्वास होता. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सहकाऱ्यांसह चवदार तळ्याच्या पाण्याला स्पर्श केला आणि एक इतिहास घडविला. यामुळे सनातनी खवळले. त्यांनी सत्याग्रहींवर दगडफेक केली व दुसऱ्या दिवशी चवदार तळ्याचे गोमूत्र ओतून शुद्धीकरणही केले. सनातनांच्या या कृतीमुळे डॉ. बाबासाहेब दु:खी झाले पण दुप्पट जिद्दीने पुन्हा आंदोलनास सज्ज झाले. अभ्यासाअंती त्यांना असे जाणवले की, ही जी जातीवर आधारीत विषमता आहे तिची पाळेमुळे मनुस्मृती या ग्रंथामध्ये आहेत आणि म्हणून विषमतेचे प्रतीक असलेल्या या ग्रंथाचे महाड येथेच दहन करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. त्यासाठी २५ डिसेंबर १९२७ ही दिवस जाहीर केला. त्यानुसार त्यांनी त्यादिवशी महाड येथे मनुस्मृतीचे जाहीरपणे दहन केले. या आंदोलनात त्यांचे सवर्ण सहकारीसुद्धा सामील झाले होते. डॉ. बाबासाहेबांचे सहकारी सहस्त्रबुद्धे यांनी मनुस्मृती दहनाचा ठराव मांडला व त्यानंतर मनुस्मृतीचे प्रतिकात्मक दहन करण्यात आले. त्यांच्या या आंदोलनानंतर महाराष्ट्रातील दलित बांधवांना खूप त्रास सोसावा लागला. सवर्णांकडून त्यांना खूप जाच होऊलागला. पण असा जाच सहन करीत दलित बांधव डॉ. बाबासाहेबांच्या पाठिंशी उभे राहिले. पुढे सलग दोन वर्षे डॉ. बाबासाहेबांनी महाराष्ट्रभर दौरा काढला. आपली भूमिका कार्यकर्त्यांना समजून सांगण्यासाठी अथक परिश्रम घेतले आणि कार्यकर्ते आंदोलनास तयार आहेत याची जाणीव होताच त्यांनी मंदिर प्रवेशाचा मुद्दा पुढे आणला. दलित बांधवांना मंदिरात जाऊन देवदर्शन

घेण्याची परवानगी नसे. मंदिराच्या आवारात त्यांनी कुठेपर्यंत यायचे हेसुद्धा ठरवून दिलेले असे. या प्रथेच्या विरोधात आंदोलन करण्याची भूमिका डॉ. बाबासाहेबांनी घेतली. या आंदोलनासाठी त्यांनी नाशिक शहराची निवड केली. नाशिक शहरातील काळाराम मंदिरात दि. ३ मार्च १९३० रोजी सत्याग्रह करण्याची घोषणा जाहीर केली. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आणि त्यांचे अनुयायी दि. २ मार्च रोजीच सायंकाळी नाशिक येथे एकत्र आले. दि. ३ मार्च रोजी शहरात त्यांनी भव्य मिरवणूक काढून काळाराम मंदिराकडे कूच केली. दलित समाज मंदिरापर्यंत पोहोचूच नये अशी व्यवस्था सवर्णांनी केली होती. मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मंदिराजवळ सर्वांनाच रोखण्यात आले. सत्याग्रहींवर सवर्णांनी दगडफेक केली. अनेकांना जखमी केले. जखमा घेउन संतप्त सत्याग्रही स्वगृही परतू लागताच त्यांच्यावर दगडफेक झाली. पण सत्याग्रहींनी माघार घेतली नाही. हा सत्याग्रह पुढे पाच वर्षे सुरु राहिला. देशभरातून सत्याग्रही येत मंदिरासमार सत्याग्रह करीत आणि परत जात. अशाप्रकारे हा सत्याग्रह पाच वर्षे सुरु राहिला. यानंतर सन १९३५ साली डॉ. बाबासाहेबांनी येवला या गावात एक परिषद घेतली. या परिषदेत बोलताना ते म्हणाले की, कोणत्या धर्मात जन्म घ्यायचा हे माझ्या हातात नव्हते. पण मरताना मात्र मी हिंदू नसेन. त्यांच्या या घोषणेमुळे देशभर दलितांच्या प्रश्नावर विचारमंथन सुरु झाले. स्वातंत्र्याचा विचार करताना दलितांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही असे मत तयार झाले.

## पुणे करार

१२ मार्च १९३० साली मीठाचा सत्याग्रह झाला आणि ३ मार्चला काळाराम मंदिराचा सत्याग्रह झाला. यावरुन वातावरण कसे होते याची कल्पना येते. याच दरम्यान आणखी एक गोष्ट घडली. इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनॉल्ड यांनी हिंदुस्थानसाठी जातीय निवाडा जाहीर केला. हा जातीय निवाडा समजून घेण्यासाठी सन १९१६ साली झालेला लखनौ करार

समजून घेणे आवश्यक आहे. लो. टिळक आणि बॅ. महमदअल्ली जीना यांच्यात हा करार झाला. पुढाकार लो. टिळकांचा होता. या करारानुसार भारतातील मुसलमान समाजाला कौन्सिलमध्ये ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार होत्या. तसेच त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ असणार होते. स्वतंत्र म्हणजे जेथे मुसलमान समाजाची संख्या मोठी आहे तो मतदारसंघ मुसलमान समाजासाठी स्वतंत्र असावा. या मतदारसंघात केवळ मुसलमान उमेदवारच निवडणूक लढवू शकेल. तो कोणत्याही पक्षाचा किंवा अपक्ष असू शकतो. तसेच त्याला मत घालणारा मतदारसुद्धा मुसलमानच असावयास हवा. अशी ती निवडणुकीची पद्धत होती. या पद्धतीला अनुसरूनच आता इतरांनाही असेच मतदारसंघ असावेत, अशी बिटिशांची कल्पना होती. समाज जाती-जातीमध्ये विभागला गेला तर बरे होईल अशी त्यांची यामागे भावना होती. त्याचप्रमाणे दलितांनासुद्धा स्वतंत्र मतदारसंघ असावेत असे त्यांनी जाहीर केले. ही स्वतंत्र मतदारसंघाची कल्पना गांधीजींना रुचली नाही. उद्या अनेक जाती जर अशाप्रकारचे मतदारसंघ मागू लागल्या तर देश जातीपातीत विभागला जाईल अशी त्यांना भीती वाटली. हा निवाडा जेव्हा जाहीर झाला तेंव्हा ते येरवड्याच्या तुरुंगात होते. मीठाच्या सत्याग्रहात अटक करुन ब्रिटिशांनी गांधीजींना येरवडा येथील तुरुंगात ठेवले होते. या निवाड्याला विरोध करण्यासाठी त्यांनी तुरुंगात उपोषण सुरु केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याबाबत आपली रणनीती आखली. सुरुवातीस स्वतंत्र मतदार संघाचा आग्रह धरला. पण प्रकरण ताणले नाही. गांधीजींशी वाटाघाटी करुन त्यांनी स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव मतदारसंघ मिळविले. स्वतंत्र मतदारसंघात त्यांना ७१ मतदारसंघ मिळणार होते पण राखीव मतदारसंघात त्यांना १५१ मतदारसंघ मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे प्रकरण अतिशय मुत्सद्देगिरीने हाताळले व अधिक जागा मिळविल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राखीव जागा स्वीकारल्यामुळे गांधीजींनी आपले आमरण उपोषण २२ व्या दिवशी मागे घेतले.

असे दिसते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजी हे आपल्या

आंदोलनानी एकमेकांवर प्रभाव पाडत एकमेकांना घडवत गेले. भारतातील जातीयता नष्ट व्हायची असेल तर आंतरजातीय विवाह व्हायला हवेत अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. आपल्या 'अनहिलेशन ऑफ कास्ट' या पुस्तकात त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. याच भूमिकेचा पुरस्कार पुढील काळात गांधीजींनीही केला. सवर्ण कार्यकर्त्यांनी दलित मुलीशी लग्न केले तरच मी त्याच्या विवाहाला हजर राहीन, अशी भूमिका घेण्याइतपत गांधीजी गेले. यावरुन हे स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजी यांची सामाजिक भूमिका एकमेकांना पूरक होती. जाती नसलेला समाज निर्माण व्हावयास हवा ही दोघांचीही भूमिका होती.

स्वातंत्र्य जेंव्हा दृष्टीपथात आले त्यावेळी स्वतंत्र भारताची राज्यघटना कशी असावी असा एक प्रश्न चर्चेला आला. एका चर्चेत पंडित नेहरु गांधीजींना म्हणाले की, राज्यघटना तयार करण्यासाठी आपणास तज्ज्ञ सल्लागाराची नितांत गरज आहे. यावर प्रतिक्रिया देताना गांधीजी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकराइतका संविधान समजणारा आपणाकडे दुसरा कोणीही नाही. गांधीजींच्या सुचनेवरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घटना समितीत प्रवेश झाला आणि त्यानंतर मसुदा समितीचे ते प्रमुख झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीमध्ये आले तरच देशातील दलित आणि महिलांना राज्यघटनेतील तरतुदीनुसार न्याय मिळू शकेल. असा गांधीजींना विश्वास होता. म्हणूनच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा आग्रह धरला. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब घटना समितीचे सदस्य होऊ शकले.

❑❑❑

## प्रकरण १४

# १९४० वैयक्तिक सत्याग्रह

सन १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. गांधीजींनी या युद्धाला विरोध करण्याची भूमिका घेतली. हे युद्ध एकूणच मानव जातीसाठी भयंकर ठरणारे असेल आणि म्हणून ते होऊ नये या मताचे ते होते. त्यांनी युद्धविरोधी भूमिका घेताच ब्रिटीशांनी युद्धविरोधी भाषणावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. युद्धविरोधी भाषण करणाऱ्यांना अटक केली जाईल असे जाहीर केले. अशा घोषणा करुन ब्रिटिश सरकार आमच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करीत आहे अशी भूमिका घेउन गांधीजी पुन्हा आंदोलनात उतरले. भाषण स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी त्यांनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. आजवर झालेले सत्याग्रह हे समूहाने केलेले होते. यावेळी एकच एक व्यक्ती सत्याग्रह करणार होती. देशातील पहिला सत्याग्रही म्हणून गांधीजींनी विनोबा भावे यांची निवड केली. त्यांनी दि. १० ऑक्टोबर १९४० रोजी पवनार येथे सत्याग्रह केला. ब्रिटिशानी त्यांनी अटक केली. जेव्हा त्यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले तेव्हा पुन्हा त्यांना तसाच सत्याग्रह केला. पुन्हा त्यांना अटक झाली. त्यांच्या अटकेनंतर देशभरात जवळजवळ २५ हजार कार्यकर्त्यांनी भाषणबंदी तोडली आणि सत्याग्रह केला. यावरुन एक सिद्ध झाले की, जनता आता वैयक्तिक पातळीवरतीसुद्धा आंदोलन करण्यासाठी सिद्ध झाली आहे.

❐❐❐

## प्रकरण १५

# १९४२ चले जाव आंदोलन

भारतात आल्यापासून गांधीजींनी स्वातंत्र्य आंदोलनात सातत्य ठेवण्याचा प्रयत्न केला. देशातील शेतकऱ्यांचे प्रश्न संघटितपणे त्यांनी मांडले. कामगारांच्या चळवळीचे नेतृत्त्व करुन त्यांना न्याय मिळवून दिला. महिला आणि दलित त्याचप्रमाणे इतर अल्पसंख्यांक यांना आंदोलनात सहभागी करुन घेतले. त्यामुळे आंदोलन व्यापक झाले. राजकीय आंदोलनाला सामाजिक प्रश्नांशी जोडले. गांधीजींनी सर्वात महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे सामान्य माणसाच्या मनातील तुरुंगाची भीती काढून टाकली. सत्याग्रह करुन तुरुंगात जाण्यास सामान्य माणूसही तयार झाला. महिला तयार झाल्या. गांधीजींना जेंव्हा वाटले की, आता निर्णायक पाऊल उचलण्यास देश तयार झाला आहे. तेंव्हा त्यांनी तसे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. १९३९ ते १९४५ हा कालखंड महायुद्धाचा. ब्रिटिश या युद्धात गुंतले होते. या युद्धात ब्रिटनची आर्थिक परिस्थिती खूपच खालावली होती. आपले साम्राज्य सांभाळणे त्यांना झेपेनासे झाले होते. सुभाषचंद्र बोस यांनी भारताबाहेर जाऊन सैन्य जमवून बाहेरुन उठाव करण्याचा प्रयत्न सुरु केला होता. अशा परिस्थितीत गांधीजी आपली रणनीती तयार करीत होते. दि. ८ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी मुंबईतील गवालिया टँक मैदानावर काँग्रेसचे अधिवेशन भरविले. या अधिवेशनात त्यांनी ब्रिटिश सरकारला 'चले जाव'असा आदेशच

दिला. ब्रिटिशांनी भारतातून निघून जावे अशा आशयाचा ठराव या अधिवेशनात मांडण्यात आला. त्यावर भाषणे करताना सर्वांनीच असे म्हटले की, ब्रिटिशांनी भारत सोडून निघून जावे. नेत्यांच्या भाषणाचा सूर असा होता की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशाची सूत्रे शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या आणि कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या हाती असतील. गांधीजींनी एक पाऊल पुढे टाकत असे जाहीर केले की, आजपासून सर्वांनी आपण स्वतंत्र झालो असे मानावे. तसे जगावे. ब्रिटीशांचा कोणताही कायदा मानू नये. गांधीजींनी या निर्णायक चळवळीसाठी दोन घोषणा दिल्या. पहिली होती 'चले जाव' व दुसरी होती 'करेंगे या मरेंगे'. दुसऱ्या दिवशी म्हणजे ९ ऑगस्ट रोजी आंदोलनास गोवालिया टँक मैदानावरुन सुरुवात होईल, असे त्यांनी जाहीरही केले. पण ९ तारखेच्या पहाटेस ब्रिटीशांनी अनेक नेत्यांना अटक केली. त्यामुळे ९ तारखेला नेमके काय होणार हा प्रश्न उपस्थित झाला. नियोजित कार्यक्रमाप्रमाणे ९ तारखेस सकाळी गोवालिया टँक मैदानावर तिरंगा ध्वज फडकविण्यात येणार होता. नेते तर तुरुंगात होते. पोलीस बंदोबस्त कडक होता. अशा काळात अरुणा असफअल्ली ही तरुणी अचानकपणे गवालिया टँक मैदानावर अवतरली. पोलिसांना चकवा देऊन तिने तिरंगा ध्वज फडकावून सत्याग्रहास सुरुवात केली. ज्या वेगाने ती प्रगटली त्या वेगाने ती नाहीशी झाली. पुढे तिने भूमिगत चळवळीचे नेतृत्त्व केले. ९ ऑगस्टनंतर देशात जनक्षोभ उसळला. देशात तीन ठिकाणी प्रतिसरकारे स्थापन झाली. आम्ही आता स्वतंत्र झालो आहोत असे त्यांनी जाहीर केले. बंगाल प्रांतातील पश्चिम मिदनापूर, उत्तर प्रदेशातील बालिया आणि महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यामध्ये ही सरकारे स्थापन झाली. यातील पश्चिम मिदनापूर आणि बालियामधील सरकारे अल्पायुषी ठरली. साताराच्या जनतेने मात्र प्रतिसरकार स्वातंत्र्य मिळेपर्यंत चालविले. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ ऑगस्ट १९४७ या कालखंडात सातारा जिल्ह्यात ब्रिटिशांचे सरकार नव्हते. क्रांतीसिंह नाना पाटील, क्रांतीवीर नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतीवीर बापू लाड अशा नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली हे सरकार टिकून राहिले. देशात इतरत्रही

कार्यकर्त्यांनी प्रतिसरकारे स्थापन करुन चालविली आणि ब्रिटीशांना चांगलेच जेरीस आणले. चले जावची चळवळ अगदी दुर्गम खेड्यात पोहोचली. लोकांनी पोस्ट कार्यालये जाळून टाकली. सरकारी कचेऱ्या बंद पाडल्या. न्यायालये बंद पाडली. रेल्वे मार्ग उखडले. ज्या ज्या मार्गाने सरकारला जेरीस आणणे शक्य होते ते सर्व मार्ग लोकांनी अनुसरले व सरकारला चांगलेच जेरीस आणले. जमेल त्या मार्गाने लोक लढू लागले. महत्त्वाचे म्हणजे या लढ्यात महिलांसुद्धा उतरल्या.

फेब्रुवारी १९४६ मध्ये मुंबईतील नाविकांनी बंडाचे निशाण उभारले.नाविकांना पाठिंबा देण्यासाठी मुंबईतील गिरणी कामगारांनी संप पुकारला. नाविक आणि कामगार एकत्र येऊन ब्रिटीशांच्या पोलिसांविरुद्ध लढू लागले. नाविकांच्या बंडाने ब्रिटिश सरकारची चांगलीच कोंडी झाली. आपल्या विरोधात आता आपलेच सैन्य गेले आहे याची जाणीव त्यांना झाली. नाविकांचे बंड हा स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील महत्त्वाचा अध्याय आहे.

असहकार चळवळ सुरु झाल्यावर गांधीजींनी चौरीचौरा प्रकरण पुढे करत चळवळ मागे घेतली होती. ४२ च्या आंदोलनात बराच हिंसाचार झाला. पण गांधीजींनी चळवळ मागे घेण्याचा विचार केला नाही हे ध्यानात घ्यावयास हवे. आता आपणाला स्वातंत्र्य मिळवायचे आहे हाच एकमेव उद्देश त्यांनी डोळ्यासमोर ठेवला होता. अहिंसा हे त्यांच्यासाठी जसे महत्त्वाचे तत्त्व होते तसेच अहिंसात्मक आंदोलन करणे हा त्यांच्या एकूण रणनीतीचा भाग होता. जेंव्हा अंतिम लढ्यासाठी लोक तयार आहेत असे त्यांना वाटले तेंव्हा त्यांनी अहिंसेचा आग्रह धरला नाही.

४२ चे आंदोलन सुरु झाल्यानंतर त्यांच्या वैयक्तिक जीवनात दोन दु:खद घटना घडल्या. गांधीजींना अटक करुन पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये बंदीवासात ठेवण्यात आले. तेथे एक तुरुंगच करण्यात आला. सोबत महादेवभाई होते. तीन दिवसांनी कस्तुरबानाही तेथे अटक करुन आणण्यात आले. त्यांच्याबरोबर प्यारेलाल आणि डॉ. सुशीला नायर होत्या. दि. १५ ऑगस्ट रोजी महादेव भाईंचं तुरुंगातच निधन झालं. सहा महिन्यापूर्वी त्यांना

हृदयविकाराचा झटका आला होता. मात्र त्याकडे दुर्लक्ष करुन महादेवभाई गांधीजींच्याबरोबर चळवळीत कार्यरत होते. कायद्याप्रमाणे तुरुंगातील व्यक्तीचा मृतदेह त्यांच्या नातेवाईकांकडे द्यावयास हवा. पण ब्रिटिशांनी तसे करण्यास साफ नकार दिला. त्यामुळे महादेवभाई यांच्यावर आगाखान पॅलेसमध्येच गांधीजींनी अंत्यसंस्कार केले. ज्याने माझ्यावर अंत्यसंस्कार करायचे त्यावर मला अंत्यसंस्कार करावे लागले, असे गांधीजी दु:खाने म्हणाले.

देशात सुरु असलेल्या हिंसाचारास ब्रिटिशांनी गांधींना जबाबदार धरल्याने गांधीजी दु:खी झाले होते. दि. १० फेब्रुवारी ते २१ मार्च १९४३ या कालावधीत हृदयप्रगटीकरणासाठी उपोषण केले. महादेवभाईंचे जाणे आणि गांधीजींचे उपोषण याचा मानसिक ताण कस्तुरबांवर पडला. त्यांची तब्येत झपाट्याने खालावायला सुरुवात झाली कस्तुरबा ॲलोपॅथी औषधे घेत नसत. आयुर्वेदिक उपचारच घेत. त्यांच्यासाठी गाझियाबादहून वैद्य आणण्याचे ठरविले. पण त्यांना येण्यासाठी उशीर झाला. तोवर कस्तुरबांची प्रकृती खूप खालावली आणि तुरुंगातच दि. २२ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांचे निधन झाले. ब्रिटिशांनी अंत्यविधीचा खर्च देण्याची तयारी दाखविली. पण गांधीजींनी अशी मदत घेण्यास नकार दिला. त्यांनी आपल्या खर्चाने कस्तुरबांवर अंत्यसंस्कार केले. एका बाजूने देशात स्वातंत्र्य आंदोलनाने जोर धरला होता. राजकीय हालचाली गतीमान होत होत्या. अशा काळात तुरुंगात असताना गांधीजींच्यावर दोन मोठे आघात झाले. महादेवभाई आणि कस्तुरबा त्यांना सोडून गेले. पण गांधीजी डगमगले नाहीत. ९ ऑगस्ट १९४२ साली सुरु झालेले आंदोलन मागे घेण्याचा प्रश्नच नव्हता. संपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत ते सुरु राहणार होते, तसे ते सुरु राहिलेही.

❒❒❒

## प्रकरण १६

# नौखालीची भीषण दंगल

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. पण देशाचे ऐक्य राखण्यात मात्र नेतृत्त्वाला अपयश आले. देश विभागला गेला. या विभाजनामुळे सरहद्दीवरील भागात भीषण जातीय दंगली झाल्या. यातील नौखालीची जातीय दंगल सर्वात भीषण मानली जाते.

सन १९४० पासूनच मुस्लीम लीगने पाकिस्तानच्या निर्मितीचा आग्रह धरण्यास सुरुवात केली होती. गांधीजींनी देशाच्या विभाजनास पाठिंबा दिला नाही. देश एक राहिला पाहिजे हेच त्यांचे म्हणणे होते व ते आपल्या मताला शेवटपर्यंत चिकटून राहिले. दि. १६ ऑगस्ट १९४६ रोजी मुस्लीम लीगने 'डायरेक्ट ॲक्शनची' घोषणा केली. यासाठी मुस्लीम लीगचे नेते सुऱ्हावर्दी यांनी मोठी तयारी केली होती. पेट्रोलचा साठा केला होता. हत्यारे जमविली होती. गुंड तयार ठेवले होते. डायरेक्ट ॲक्शनची घोषणा कोलकत्यामध्ये झाली. मुसलमानांनी हिंदूंच्यावर थेट हल्ला केला. दंगलीच्या पहिल्या तीन दिवसांत कोलकात्यामधील हिंदूंची मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्त हानी झाली. 'ग्रेट कलकत्ता किलींग' या नावाने हा हिंसाचार इतिहासात नोंदविला गेला आहे. कोलकाता शहरात हिंदू समाज बहुसंख्येने व मुसलमान समाज अल्पसंख्येने असल्याने चौथ्या दिवसांनंतर हिंदू समाजाने आक्रमक धोरण घेत मुसलमानांना रोखले. मारून काढले. त्यामुळे मुस्लीम लीगच्या

हिंसक कारवायांना आळा बसला. आता मुस्लीम लीगने नौखालीवर लक्ष्य केंद्रीत केले. नौखाली गावात आणि परिसरात हिंदू अल्पसंख्याक होते आणि मुसलमानांची संख्या ९० टक्क्यांहून अधिक होती. त्यामुळे हिंदू समाजावर भयानक अत्याचार झाले. नौखालीमधील बातम्या ऐकून गांधीजी व्यथीत झाले आणि त्यांनी निश्चय केला की, आपण कोणत्याही परिस्थितीत नौखालीत जायचेच. दंगल थांबलीच पाहिजे. ते नौखालीत दाखल झाले. तेथील परिस्थिती बघून त्यांना मोठा हादरा बसला. नौखाली परिसरातील ४५ खेड्यांना त्यांनी भेट दिली. एकूण ११६ मैल प्रवास केला. त्यांनी या परिसरात प्रवास करु नये. म्हणून गुंडांकरवी त्यांना त्रास देण्यात आला. त्यांच्या मार्गात खिळे, काटे, काचा टाकण्यात येत. कधी कधी विष्ठाही टाकली जाई. गांधीजी ते सारे आपल्या हाताने स्वच्छ करीत आणि पुढे जात. दंगलीच्या कहाण्या कानावर येत. त्यामुळे मन दुःखी होई. त्या परिसरातील सर्व दवाखाने बंद होते. त्यामुळे ठिकठिकाणी त्यांनी झोपड्या उभ्या करुन स्वयंसेवकांची पथके उभी केली. डॉ. सुशीला नायर यांच्याकडे ही जबाबदारी सोपविली. डॉ. सुशीलांनी दंगलग्रस्त भागात खूप काम केले. जीव धोक्यात घालून काम केले. त्यामागे प्रेरणा होती ती गांधीजींची. चांदीपूर ते नौखाली हे अंतर गांधीजी अनवाणी चालले. गांधीजींच्या या शांतीयात्रेला यश लाभले. दंगलखोरांनी हत्यारे खाली ठेवली. घरदार सोडून पळून गेलेली माणसे पुन्हा आपल्या घराकडे आली. गांधीजींच्या या असामान्य धैर्याबद्दल बोलताना लॉर्ड माउंटबॅटन असे म्हणाले आहेत की, जे काम ५० हजार सैनिक करु शकले नसते ते गांधीजींनी एकट्याने केले.

परिस्थिती कोणतीही असो गांधीजींचे प्रयोग सुरुच असत. नौखालीच्या दंगलीतही ते प्रयोग सुरु होते. नौखाली पदयात्रेत त्यांच्याबरोबर मनू असायची. ती रोज रोजनिशी लिही. सायंकाळी गांधीजी ती वाचत आणि खाली सही करीत. या डायरीतल्या उल्लेखाप्रमाणे एकदा गांधीजी नारायणपूरला एका विणकराच्या घरात मुक्कामला होते. गांधीजींचा पाय घासण्याचा दगड मनू मागील गावात विसरली होती. गांधीजींनी मनूला

सांगितले कोणालाही सोबत न घेता तू एकटी त्या गावाला जा आणि तो दगड घेऊन ये. मनू त्यावेळी अवघी १६–१७ वर्षांची होती. दंगल अद्याप पूर्णपणे शमली नव्हती. तरीदेखील ती एकटी त्या गावाला गेली. सकाळी साडे नऊला ती निघाली आणि दुपारी दीडच्या सुमारास ती परत आली. ती परत आल्यावर गांधीजी म्हणाले, 'आज तुझ्या निर्भयतेची परीक्षा झाली. गेली २५ वर्षे हा दगड माझ्याबरोबर असतो.' मीराबेन यांनी गांधीजींना हा दगड दिला होता.

नौखालीमध्ये शांतता प्रस्थापित करुनच गांधीजी कोलकात्याकडे आले. तेथे दंगली सुरुच होत्या. कोलकाता शांत करायचे या उद्देशाने तेथे त्यांनी राहण्याचे ठरविले. दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी ते कोलकात्यामध्येच होते. दिल्लीमध्ये होत असलेल्या स्वातंत्र्य सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी ते गेले नाहीत. कोलकात्यामध्ये त्यांनी ७३ तासांचे उपोषण केले. हिंदू-मुसलमान सर्वांना एकत्र करून शांतता प्रस्थापित करण्याचे वचन त्यांनी घेतले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन हिंदू-मुसलमानांनी एकत्र सभा घेतल्या. मिरवणुका काढल्या. कोलकाता शांत झाल्यावर गांधीजी कोलकाता सोडून दिल्लीकडे निघाले.

❑❑❑

## प्रकरण १७

# गांधीजी कम्युनिस्ट संबंध

गांधीजींचे आणि कम्युनिस्टांचे संबंध कसे होते यावर फारशी चर्चा होत नाही. गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून १९१५ साली भारतात परत आले. त्याच काळात भारतात कामगार चळवळ जोर धरु लागली होती. ती राष्ट्रव्यापी होऊ लागली होती. भारतात कामगार चळवळीची स्थापना केली ती नारायण मेघाजी लोखंडे यांनी चळवळीतील ते सत्यशोधक होते. महात्मा फुले यांचे सहकारी होते. सन १८८४ मध्ये त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांची संघटना बांधली. त्यांना न्याय मिळवून दिला. त्यानंतर देशातील इतर शहरातूनही कामगार चळवळी सुरु झाल्या. १९२० साली आयटकची स्थापना झाली. या कामगार चळवळीतूनच पुढे कम्युनिस्ट विचाराचे कार्यकर्ते पुढे आले. त्यांनी देशभरातील कामगारांना एकत्र आणता आणता सन १९२५ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. मार्क्सवादी सिद्धांतावर आधारीत आपणही भारतात क्रांती करायची असे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून हे कार्य करीत असत.

देशात वाढत असलेली कामगार चळवळ वाढू द्यायची नाही या उद्देशाने ब्रिटिशांनी दि. ८ एप्रिल १९२९ रोजी दोन कायदे केले. पहिला होता 'ट्रेड डिस्प्यूट बील' आणि दुसरा होता 'पब्लिक सेफ्टी बील'. या कायद्यांतर्गत ब्रिटिशांनी ३३ कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना अटक केली आणि

त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला घातला. कामगारांची संघटना करुन राणी सरकार उलथून टाकण्याचा कट हे करीत आहेत असा आरोप त्यांच्यावर ठेवला. त्यांची रवानगी मीरतमधील तुरुंगात केली. ज्यांना अटक झाली त्यामध्ये कॉ. डांगे, कॉ. मिरजकर, कॉ. निंबकर, कॉ. जोगळेकर, कॉ. शौकत उस्मानी, सोहनसिंग जोश इत्यादी भारतीय होते. तर बेंजामिन ब्रॅडले आणि फिलिप स्प्रॅट हे दोन ब्रिटीश कार्यकर्तेही अटकेत होते. दि. २७ ऑक्टोबर १९२९ रोजी गांधीजी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी मीरतला गेले. त्यांनी कॉ. डांगे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. कॉ. डांगे यांनी गांधीजींना एक थेट प्रश्न विचारला. तो असा होता की, चौरीचौऱ्यामध्ये हिंसाचार झाला म्हणून आपण असहकार चळवळ स्थगित केली. आता पुन्हा असे आपण करणार काय? गांधीजींनी उत्तरादाखल असे म्हटले की, आता कोणतेही आंदोलन मागे घेण्याचा विचार नाही. गांधीजींनी पुढे तसेच केले आहे. गांधीजींनी तुरुंगातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना धैर्य दिले. सर्वतोपरी मदत करण्याची तयारी दाखविली. त्यानुसार पंडित नेहरु यांनी तुरुंगातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांसाठी निधी संकलन मोहीम आखली. मीरत कटाच्या खटल्यातील आरोपींची न्यायालयात बाजू मांडण्याची तयारी पंडित मोतीलाल नेहरु आणि पंडित जवाहरलाल नेहरु यांनी दाखविली. यावरुन हे स्पष्ट दिसते की गांधीजी आणि कम्युनिस्ट यांच्यातील संबंध हे एकमेकांना मदत करण्याचे होते.

काँग्रेस हा कांही एक पक्ष नव्हता, ती एक व्यापक चळवळ होती. या चळवळीमध्ये विविध विचारांचे लोक होते. कम्युनिस्टही काँग्रेसचाच एक भाग होते. कॉ. श्रीपाद अमृत डांगे हे काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सभासद होते. कॉ. निंबकर हे मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी होते तर कॉ. के. नी. जोगळेकर खजिनदार होते. कॉ. इ. एम. एस. नंबुद्रीपाद हे केरळ काँग्रेसचे नेते होते. याचा अर्थ असा की त्या काळात कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची संख्या जरी लहान असली तरी काँग्रेसमध्ये त्यांना आदराचे स्थान होते व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या ते सांभाळत होते.

पुढे असे झाले. गांधीजींच्या अवतीभोवती असणारे पण कम्युनिस्टविरोधी असलेले जे लोक होते त्यांनी कम्युनिस्टांबद्दल गांधीजींना चुकीच्या गोष्टी सांगून त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. कम्युनिस्टांना परदेशातून मदत मिळत असावी हा त्यातील एक मुद्दा होता. याबद्दलचे शंकानिरसन करून घेण्यासाठी गांधीजींनी कम्युनिस्ट पक्षाच्या कचेरीला पत्र लिहिले. मला तुमच्या पक्षाचे हिशोब पाहण्याची इच्छा आहे असे गांधीजींनी पत्रात लिहिले होते. त्यावेळी कॉ. पी. सी. जोशी हे पक्षाचे जनरल सेक्रेटरी होते. कॉ. बसवपुन्नय्या हे ऑफिस सेक्रेटरी म्हणून काम पाहत असत. त्यांच्या पत्नी कॉ. लीला या हिशोब ठेवण्याचे काम करीत. पक्षाचे मुख्य कार्यालय त्यावेळी मुंबईत होते. कॉ. पी. सी. जोशी यांनी गांधीजींना पत्राद्वारे कळविले की, ते पक्षाच्या कचेरीत येऊन आमचे हिशोब बघू शकतात. त्यानुसार तारीखही ठरली. पण गांधीजी एका महत्त्वाच्या कामात गुंतल्यामुळे त्यांनी आपल्यावतीने वल्लभभाई पटेल तुमच्याकडे येतील असे कळविले. त्यानुसार वल्लभभाई पटेल यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात जाऊन हिशोब पाहिले. हिशोब पाहून वल्लभभाई पटेलांनी समाधान व्यक्त केले व गांधीजींना तसा अहवाल दिला. या घटनेनंतर गांधीजींच्या मनातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांबद्दलचा गैरसमज दूर झाला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष जरी काँग्रेसच्या चळवळीचा एक भाग होता तरी त्याचे असे स्वतंत्र अस्तित्वही होते. राजकारणाचा भाग म्हणून कम्युनिस्ट नेत्यांनी काँग्रेस व गांधीजींवर तसेच काँग्रेस कार्यकर्त्यांनी कम्युनिस्टांवर टीका प्रतिटीका केलेली दिसते. ते स्वाभाविक होते. पण त्याचा अर्थ मात्र असा नव्हे की, गांधीजी आणि कम्युनिस्ट हे एकमेकांचे शत्रू होते. उलट गांधीजी आणि कम्युनिस्ट यांच्या भूमिका एकमेकांला पूरक होत्या अशी अनेक उदाहरणे दाखविता येतील.

गांधीजींनी साम्यवादाबद्दल आपल्या लिखाणात चर्चा केली आहे. समाजवादाचे तत्त्वज्ञान हे उच्चकोटीचे असल्याचे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. गांधीजींना नेहमीच महत्त्वाचा वाटलेला जो मुद्दा होता तो हिंसेचा. हिंसा

न करता समाजवादी समाजव्यवस्था निर्माण व्हावी अशी त्यांची धारणा होती. माझ्या स्वप्नातील भारत या पुस्तकात तर त्यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, मी सच्चा कम्युनिस्टच आहे.

शोषण हा शब्द कम्युनिस्ट तत्त्वज्ञानात वारंवार येतो. तो महत्त्वाचा आहे. गांधीजी म्हणतात की, शोषण हा हिंसेचाच प्रकार आहे. शोषण हे थांबावयास हवेच.

गांधीजींचे तत्त्वज्ञान आणि कम्युनिझमचे तत्त्वज्ञान यामध्ये फरक आहे तो असा, गांधीजींनी मालकवर्गाला आपल्या संपत्तीचे विश्वस्त होण्याचे आवाहन केले. तुम्ही तुमच्या संपत्तीचे मालक नसून विश्वस्त आहात आणि त्याच भूमिकेतून तुम्ही कामगारवर्गांशी व्यवहार करा असे त्यांचे म्हणणे होते. कम्युनिझमचे तत्त्वज्ञान असे मानते की, मालकवर्ग हा कामगाराचे शोषण करुनच संपत्ती निर्माण करतो. म्हणून मालकांचा वर्गच नसावा व त्या संपत्तीवर कामगारवर्गाचीच मालकी असावयास हवी. गांधीजी आणि कम्युनिस्ट यांच्यातील साम्य म्हणजे दोघांनाही शोषणरहित समाजव्यवस्था अभिप्रेत होती.

❑❑❑

## प्रकरण १८

# गांधीजींचे अर्थकारण

गांधीजींच्या डोळ्यापुढे नेहमीच समाजातील शेवटचा माणूस असे. त्यांनी असे म्हटले आहे की, एखादा आर्थिक कार्यक्रम तयार करताना डोळ्यासमोर समाजातील शेवटचा माणूस आणावा. कार्यक्रमाची अंमलबजावणी झाल्यानंतर पुन्हा त्याच माणसाचा चेहरा डोळ्यापुढे आणावा. जर त्या माणसाच्या चेहऱ्यावरील एक जरी दु:खाची छटा कमी झाली असेल व त्याच्या चेहऱ्यावर थोडेसे हास्य फुलले असेल तर तो कार्यक्रम यशस्वी झाला असे म्हणावे व जर त्या शेवटच्या माणसाच्या चेहऱ्यावर काही फरक झाला नसेल तर आर्थिक कार्यक्रम फसला असे समजावे. इतक्या सोप्या भाषेत त्यांनी आपला आर्थिक विचार मांडला आहे.

आपण केलेल्या भारताच्या दौऱ्यात त्यांनी भुकेली, तहानलेली माणसे पाहिली. म्हणून ते नेहमी म्हणत असत की, या देशात जर परमेश्वराला अवतार घ्यायचा असेल तर त्याने तो भाकरीच्या रुपात घेतला पाहिजे. त्यांना असे स्पष्टपणे म्हणावेसे वाटायचे की, या देशाचे खरे प्रश्न हे दारिद्र्य, भूक, वस्त्र हेच आहेत आणि म्हणून त्यांच्या निवारणासाठी त्यांनी आपला कार्यक्रम तयार केला. त्यामध्ये ग्रामस्वराज्य, ग्रामोद्योग यांचा अंतर्भाव होता. सुधारणांची सुरुवात ही खेड्यांपासून व्हावयास हवी. कारण आपला देश हा खेड्यांचा देश आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

गांधीजींनी असे म्हटले आहे की पृथ्वीवरील प्रत्येक माणसास, पशूपक्षास समाधानाने जगण्याइतपत अन्न पृथ्वीवर उपलब्ध आहे. पण जर एखादी व्यक्ती लोभी असेल तर तिच्या गरजा भागविणे कठीण आहे. आपल्या देशाची आजची परिस्थिती पाहता गांधीजी काय म्हणाले याची प्रचिती येते. जे लोभी आहेत त्यांनी आपल्या लोभापोटी जनतेचे, निसर्गाचे शोषण सुरु ठेवले आहे. एका अंदाजाप्रमाणे आपल्या देशातील केवळ २० टक्के लोकांच्या हातात देशातील ८० टक्के संपत्ती एकवटली आहे आणि उरलेल्या २० टक्के संपत्तीमध्ये ८० टक्के वाटेकरी आहेत. ही विषमता जर अशीच वाढत गेली तर एक वेळ अशी येईल की देशातील मूठभर लोकांच्या हातात देशातील सर्व संपत्ती एकवटलेली असेल आणि तेच देशावर आपल्या मनाला येईल त्या पद्धतीने राज्य करतील. हे सारे जे होत आहे ते लोभापोटी. यालाच गांधीजींनी अगदी सुरुवातीपासून विरोध केला.

गांधीजींचा यांत्रिकीकरणाला विरोध होता असा एक प्रचार केला जातो. पण ते अर्धसत्य आहे. गांधीजींचा यांत्रिकीकरणाला विरोध नव्हता. ते म्हणायचे की, माणसाने यंत्राचा गुलाम होऊ नये. माणूस जर यंत्राचा गुलाम झाला तर गोंधळ होतो. आज आपल्या देशाने लोकसंख्येचा विचार न करता यांत्रिकीकरण स्वीकारले. त्याचा परिणाम देशामध्ये बेकारी वाढविण्यात झाला. उद्योगधंद्यांचा विचार करताना जसा उत्पादनाचा विचार करावा लागतो. तसाच तो किती लोकांना या उद्योगातून रोजगार मिळाला याचाही विचार करणे आवश्यक आहे. माणसाच्या हाताला काम मिळाले पाहिजे याला प्राधान्य दिले जावे. या मताचा गांधीजींनी सतत आग्रह धरल्याचे दिसते.

स्वातंत्र्य दृष्टीपथात येताच मुंबईतील उद्योगपतींनी एक विकासाचा आराखडा तयार केला. 'बॉम्बे प्लॅन' म्हणून तो ओळखला जातो. यामध्ये मोठे रस्ते, मोठे कारखाने, मोठी धरणे अशा गोष्टींचा समावेश होता. गांधीजींनी तो प्लॅन बघितला आणि तो बाजूस ठेवून दिला. त्यावर प्रतिक्रिया देताना उद्योगपतींनी विचारले की 'डोंट यू बिलीव्ह इन मास प्रॉडक्शन?' गांधीजी तात्काळ उत्तरले की, आय बिलीव्ह इन प्रॉडक्शन बाय मासेस.

आजही गांधीजींचे म्हणणे बरोबर आहे. आधुनिक यंत्रे वापरुन प्रचंड उत्पादन होत आहे पण या यंत्रांनी माणसाला बेकार केले आहे. 'जॉबलेस ग्रोथ' असे जे काही म्हणतात ते येथे अनुभवास येत आहे. गांधीजींनी आपला हा विचार सूत्र रुपाने आपल्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तिकेत मांडला आहे.

❑❑❑

## प्रकरण १९

# धर्म आणि गांधीजी

गांधीजी धार्मिक होते, मी सनातनी हिंदू आहे असे त्यांनी म्हटले आहे. सनातनी या शब्दामुळे बराच गोंधळ होण्याची शक्यता असते. गांधीजी स्वत:स सनातनी म्हणवतात. म्हणून दलित बांधव त्यांच्याकडे साशंक नजरेने बघतात. पण तशी शंका घेण्याची गरज नाही. सनातन या शब्दाचा अर्थ ते 'नित्य नूतन' असा लावतात. हिंदत्त्वववादी मंडळी गांधीजींना मुस्लिमधार्जिणे म्हणतात. गांधीजींनी कोणत्या बाबतीत मुस्लिमांचा अनुनय केला असे विचारताच ते उदाहरण देऊ शकत नाहीत. मुस्लिम संघटनाही गांधीजींना मुस्लिमविरोधी मानतात. अशाप्रकारे चारीबाजूंनी गांधीजींच्यावर आरोप होत राहिल्यामुळे अभ्यासकाच्या मनात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते.

गांधीजींची दिनचर्या पाहिली की कोणीही हे मान्य करेल की गांधीजी धार्मिक होते. त्यांच्या दिवसाची सुरुवात प्रार्थनेने होई आणि दिवसाचा शेवटही प्रार्थनेनेच होई. सायंकाळच्या प्रार्थनेत ते गीतेमधील एखाद्या श्लोकावर भाष्य करीत. केवळ हिंदू धर्मांतील नव्हे तर इतरही धर्मांत जी मानवजातील पोषक अशी तत्त्वे आहेत ती त्यांनी स्वीकारली आणि शक्य होईल तेवढे ती तत्त्वे आचरणात आणण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. हिंदू धर्मांतील जे जे चांगले होते ते त्यांनी घेतले व जे वाईट होते त्याचा त्यांनी त्याग केला आणि विरोधही केला. अस्पृश्यता हा हिंदू धर्मांवरील कलंक

आहे आणि तो पुसून काढण्यासाठी मी प्रयत्न करीन असे ते म्हणत असत तसे त्याप्रमाणे त्यांचे प्रयत्नही होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन ही मानवी ऐक्याची नांदी असेल असे त्यांनी म्हटले आहे. महात्मा बद्धांकडून त्यांनी सहिष्णुता आणि सद्सद्विवेकबुद्धी घेतली. जैन धर्मांकडून अहिंसेची शिकवण त्यांनी घेतली. अशाप्रकारे इतर धर्मांच्या तत्त्वज्ञानातून त्यांनी अनेक गोष्टी घेतल्या. धर्म ही पूर्णपणे वैयक्तिक बाब आहे. जितक्या व्यक्ती तितके धर्म असतात. प्रत्येक व्यक्तीच्या मनात ईश्वराची कल्पना दुसऱ्याच्या कल्पनेहून भिन्न असू शकते असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. वेदांबद्दल बोलताना त्यांनी म्हटले आहे की वेदांच्या अपौरुषय सामर्थ्यावर माझा विश्वास नाही. वेदांमधील शब्द अपरिवर्तनीय आहेत असे मी मानत नाही. वेदांप्रमाणेच इतरही धर्मग्रंथातून जे तत्त्वज्ञान सांगितले गेले आहे तेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे असे मी मानतो.

एका धर्माच्या लोकांनी दुसऱ्या धर्माच्या लोकांचा द्वेष करणे हे मला अजिबात मान्य नाही असे गांधीजी म्हणतात. धर्मनिरपेक्षतेची कल्पना स्पष्ट करताना ते म्हणतात की स्वतंत्र भारताचे राज्य हे हिंदू राज्य होणार नाही ते भारतीय राज्य होईल ते कोणा एका धर्मा पंथाच्या किंवा जमातीच्या बहुमताचे असणार नाही तर नागरिकांच्या प्रतिनिधींचे असेल.

माणूस धार्मिक असावा पण त्याने धर्माचा उपयोग राजकारणासाठी करता कामा नये अशी गांधीजींची धारणा होती. गांधीजी वृत्तीने धार्मिक होते पण सार्वजनिक जीवनात मात्र त्यांनी कधीही धर्म आणला नाही ते खऱ्याअर्थाने धर्मनिरपेक्ष होते. मंदिरामध्ये दलित बांधवांना प्रवेश मिळावा यासाठी सत्याग्रह करणाऱ्या गांधीजींनी मंदिरांना भेट दिली. परंतु मंदिरात जाऊन पूजाअर्चा केली, कर्मकांड केले असे फारसे आढळत नाही. एकदा महादेवभाई आणि कस्तुरबा जगन्नाथपुरीतील मंदिरात गेले. आपण मंदिरात जाऊन आलो हे महादेवभाईंनी गांधीजींना सांगितले. त्यावेळी गांधीजींनी त्यांच्या मंदिरात जाण्यावर तीव्र नापसंती व्यक्त केली. पुन्हा असे करु नका असे खडसावले. यावरुन गांधीजी कर्मकांडाच्या विरोधात होते हे समजून येते. आज आपण

पाहतो राजकारणातील बरीच माणसे कपाळावर गंध लावतात. त्यांच्या मनगटावर वेगवेगळ्या रंगांचे दोरे असतात. बोटामध्ये वेगवेगळ्या रंगांचे खडे असलेल्या अंगठ्या असतात. हे दोरे, अंगठ्या त्यांनी ज्योतिषाच्या सांगण्यावरुन घातलेल्या असतात. अनेक राजकारण्यांचे त्यांचे असे ज्योतिषी असतात. जे त्यांना वेळोवेळी सल्ले देतात. गांधीजींनी आपल्या आयुष्यात असल्या गोष्टींना थारा दिलेला नाही. गांधीजींनी एक नव्हे तर दोन देशातील राजकीय चळवळींचे नेतृत्त्व केले. वेळोवेळी त्यांच्यावर प्राणघातक हल्ले झाले. पण तरीही त्यांनी कोणत्याही मांत्रिकाचा, ज्योतिषाचा सल्ला घेतला असे झालेले नाही. माणूस धार्मिक असूनही असा कर्मकांडापासून दूर असू शकतो हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.

जी माणसे खरोखर धार्मिक असतात तीच धर्मनिरपेक्षही असतात हे गांधीजींनी दाखवून दिले. जी माणसे वृत्तीने धार्मिक नसतात. त्यांनी धर्माचा उपयोग राजकारणासाठी केला असल्याचे दिसून येते. याबाबतचे उदाहरण म्हणून आपणाला बॅरिस्टर महमदअली जीना यांच्याकडे पाहता येईल. बॅरिस्टर जीना हे अत्यंत आधुनिक गृहस्थ होते. पाश्चिमात्य जीवन पद्धतीचे चाहते होते. ते कधी मशिदीत गेले नाहीत. नमाज कशी अदा करायची असते याकडेही त्यांनी फारसे लक्ष दिले नाही. पण भारताच्या राजकारणात त्यांनी इस्लामचा वापर केला आणि त्यामुळेच देशाचे विभाजन झाले. वृत्तीने धार्मिक पण धर्मनिरपेक्षतेवर विश्वास असलेले दुसरे महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणून मौलाना अबुलकलम आझाद यांच्याकडे पाहता येईल. कुराण आणि इस्लामचे तत्त्वज्ञान याचे ते गाढे अभ्यासक होते. पण राजकारणात धर्माचा वापर करण्यास त्यांचा नेहमीच विरोध राहिला. जी व्यक्ती वृत्तीने धार्मिक असते ती सहसा दुसऱ्या धर्मांचा द्वेष न करता आदरच करते.पण ज्यांना धर्माचा उपयोग आपल्या राजकारणासाठी करावयाचा असतो त्यांचा राजकीय पायाच द्वेषावर आधारीत असतो. अशी मंडळी वृत्तीने अजिबात धार्मिक नसतात. आपल्या सभोवताली डोळसपणे पाहिले तर याची प्रचिती येऊ शकेल.

गांधीजींनी काश्मिर ते कन्याकुमारी आणि गुजरात ते अरुणाचल

त्याचप्रमाणे पेशावरपर्यंतचा भारत पाहिला होता. अभ्यासला होता. समजून घेतला होता. भारतात अनेक धर्मांचे लोक आहेत अनेक पंथ आहेत. शेकडो बोलीभाषा आहेत. वेगेगळ्या चालीरिती आहेत. अशा विविधता असलेल्या देशावर एकच एक धर्माचे तत्त्वज्ञान, पद्धती, चालीरिती कशा काय लादता येतील आणि म्हणून प्रत्येकाने आपले धर्माचरण जरुर करावे पण एकमेकांचा द्वेष करु नये. तर एकमेकांवर प्रेम करावे हे तत्त्वज्ञान त्यांनी भारतीय समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला आणि त्यात त्यांना यशही लाभले. संपूर्ण देशात ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या विरोधारात ते सर्वांना सोबत घेऊन लढा उभा करु शकले. त्यांनी स्वीकारलेल्या धर्मनिरपेक्ष तत्त्वांमुळेच ते शक्य झाले.

❑❑❑

## प्रकरण २०

# गांधीजींची पत्रकारिता

आपले विचार जनतेपर्यंत पोहोचायचे असतील तर त्यासाठी आपल्या हातात आपले वृत्तपत्र असावे असे सर्वच नेत्यांना वाटत आले आहे. लोकमान्य टिळकांनी केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरु केली. नारायण मेघाजी लोखंडे या सत्यशोधक नेत्याने दिनबंधू हे वृत्तपत्र सुरु केले. मौलाना आझाद यांनी उर्दूमधून अल हिलाल हे वृत्तपत्र चालविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र प्रभावी होते. गांधीजींनीही आपले विचार मांडण्यासाठी पत्रकारिता केली.

दक्षिण आफ्रिकेत जेंव्हा त्यांनी चळवळीला प्रारंभ केला तेंव्हा त्यांना वृत्तपत्राची गरज भासली. तेथे त्या काळात सुरु असलेले इंडियन ओपिनियन नावाचे साप्ताहिक होते. त्यास ते मदत करीत. १९०४ साली त्यांनी ते वृत्तपत्र आपणाकडे घेतले. या एकाच वृत्तपत्रात ते चार भाषांतून मजकूर प्रकाशित करीत. यामध्ये गुजराती, हिंदी, तामिळ, इंग्रजी या भाषांचा समावेश होता. मजकूर तोच पण भाषा वेगवेगळ्या असत. या वृत्तपत्रात आपला जीव अडकला आहे अशा शब्दात त्यांनी इंडियन ओपिनियनवरचे आपले प्रेम व्यक्त केले आहे. या वृत्तपत्राने दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्थानी लोकांमध्ये मोठी जागृती केली. फिनिक्स आश्रमातील आश्रमवासी गांधीजींच्याबरोबर या वृत्तपत्राच्या कामात सहभागी होत. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी

राजवटीच्याविरोधात आंदोलन उभे करण्यासाठी गांधीजींना या वृत्तपत्राची मोठी मदत झाली. या वृत्तपत्रातील बहुतांशी मजकूर गांधीजी स्वत: लिहित असत.

भारतात आल्यानंतर पुन्हा गांधीजींना वृत्तपत्राची गरज भासली. त्यावेळी त्यांनी १९१९ साली 'यंग इंडिया' व 'नवजीवन ' ही वृत्तपत्रे सुरु केली. १९३२ साली त्यांनी ही दोन्ही वृत्तपत्रे बंद केली. १९३३ साली त्यांनी हरिजन हे वृत्तपत्र सुरु केले. १९४० साली ब्रिटीशांनी या वृत्तपत्रावर बंदी घातली. स्वातंत्र्य चळवळीस चालना देण्यासाठी त्यांना या वृत्तपत्रांची मदत तर होईच शिवाय सत्य, अहिंसा, सत्याग्रह अशा तात्त्विक मुद्यांवरही ते वृत्तपत्रातून चर्चा करीत. आपले अर्थशास्त्रविषयक विचार, धार्मिक विचार त्यांनी प्रामुख्याने याच वृत्तपत्रांतून मांडले. गांधीजींनी ग्रंथ लेखनाऐवजी वृत्तपत्रांतून लिखाण करण्यावर भर दिला आहे. असे मानले जाते की, त्यांनी जवळजवळ ४० हजार पानांचा मजकूर लिहिला आहे. सतत कधी आंदोलनात तर कधी तुरुंगात असणाऱ्या गांधीजींनी इतके लिखाण कसे काय केले असावे. इतके लिहिण्यासाठी वाचन, चिंतन, मनन करण्यासाठी वेळेचे नियोजन कसे केले असणार हा एक वेगळा विषयच आहे.

❐❐❐

## प्रकरण २१

# ग्रामस्वराज्य व शेती

गांधीजींनी हे पाहिले की, आपला देश हा खेड्यांचा आहे. शहरे अगदीच थोडी. मोठी शहरे तर हाताच्या बोटावर मोजता येण्यासारखी. खरेखुरे स्वराज्य म्हणजे ग्रामस्वराज्य. हे त्यांनी आपल्या अभ्यासाअंती ठरविले. आपल्या खेड्यांविषयी त्यांनी तीन निरीक्षणे नोंदविली आहेत.

१) खेड्यांमध्ये असलेली अस्वच्छता.

२) आहाराची कमतरता, त्यातून होणारे कुपोषण

३) अज्ञान

या तीन गोष्टींची कमतरता दूर करणे म्हणजे स्वराज्य स्थापन करणे. असा त्यांनी स्वराज्याचा अर्थ लावला. दिसायला हे सोपे वाटले तरी ते काम खूप कठीण असल्याची जाणीवही गांधीजींना होती. ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय हा शेती होता. काही शहरातून उद्योग सुरु झाले होते. पण त्यांचे प्रमाण देशाच्या एकूण आकाराच्या तुलनेत खूप कमी होते. त्यामुळे शेतीचा विचार ग्रामस्वराज्यामध्ये करणे क्रमप्राप्त होते.

स्वच्छता ही प्रामुख्याने पाण्यावर अवलंबून असते. पाणीच जर उपलब्ध नसेल तर घरात आणि घराबाहेर स्वच्छता कशी नांदेल आणि स्वच्छता नसेल तर आजारपण येणार म्हणून प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याची सोय असणे आवश्यक आहे यावर त्यांनी भर दिला. त्याकाळात नदी, तलाव, ओढे व

विहिरी हेच पाण्याचे स्रोत होते. गावात लोकसंख्येच्या प्रमाणात विहिरी असाव्यात आणि त्या विहिरीवर गावातील सर्व जातीधर्माच्या लोकांचा अधिकार असावा असे त्यांनी म्हटले आहे. पाणी उपलब्ध झाल्यास दररोज स्नान करणे, कपडे धुणे, घर स्वच्छ ठेवणे या गोष्टी शक्य होणार होत्या.सांडपाण्याचा निचरा होण्याची आवश्यकता त्यांनी सुचित केली आहे.

ग्रामीण भागात कुपोषणाची समस्या मोठी असल्याचे त्यांनी पाहिले. लोकांना पुरेसे आणि सकस अन्न, पाणी मिळावयास हवे. ते कसे मिळेल, कोठून मिळेल यावर भर दिला जावा असे त्यांना वाटते. शेतीतून हे मिळू शकते पण तेवढ्यावर काम भागाणार नाही म्हणून प्रत्येक गावात ग्रामोद्योग असावयास हवा. ग्रामोद्योगातून माणसाच्या हाताला काम मिळेल. त्यातून त्याला उत्पन्न मिळेल. आणि असे झाले तरच त्याच्या सांपत्तीक स्थितीत सुधारणा होईल आणि गावातच रोजगार मिळाल्यामुळे तो गाव सोडून बाहेर जाणार नाही. गावातील लोकांना जे काही लागते ते शक्य तो गावातच तयार व्हावे म्हणजे त्यांना फारसे दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागणार नाही. असा विश्वास त्यांना वाटतो. जोवर आपल्या देशात पाश्चिमात्य कंपन्यांनी आपली उत्पादने आमच्या बाजारपेठेत आणली नव्हती तोवर बरे चालले होते. पण पाश्चिमात्य कंपन्या आमच्या देशात आल्या आणि त्यांनी बाजारपेठ ताब्यात घेतली तेंव्हापासून आमची आर्थिक व्यवस्था बिघडली असे निरीक्षण ते नोंदवितात. शेतीचा विचार त्यांनी खूप गांभीर्याने केला. शेतीला गोधनाशी जोडले. आपल्या देशातील शेतीव्यवस्थेत गोधनाला खूप महत्त्व आहे असे त्यांचे मत होते. शेतकऱ्यांकडील शेती ही हळूहळू कमी कमी होत जाते हे त्यांनी पाहिले. एक वेळ अशी येते की, हातातील शेतीवर तो उपजीविका मिळवू शकत नाही. कारण मालमत्तेची विभागणी होत जाते. यावर त्यांनी चांगला उपाय सुचविला आहे. ते म्हणतात, अशावेळी गावातील शंभर कुटुंबांनी एकत्र यावे आणि शेती करावी. एकत्र गायी-गुरे पाळावी म्हणजे गोधन वाढेल व शेती किफायतशीर होईल. अशाप्रकारे गांधीजी सामुदायिक शेतीचा पुरस्कार करतात. समाजवादी समाजरचनेतसुद्धा

सामुदायिक शेतीचा पुरस्कार करण्यात आला आहे. गांधीवादी विचारवंत जे. सी. कुमारअप्पा यांनी सहकारी शेतीचा उपाय सुचविला होता. सहकारी तत्त्वावर जर आपण मोठे उद्योग उदा. साखर कारखाने चालवू शकतो, बँका चालवू शकतो तर मग शेती कसता का येऊनये? असा विचार त्यांनी मांडला होता. खेड्यांविषयी बोलताना गांधीजी म्हणतात की, शहरे खेड्यांचे शोषण करतात. अशा प्रकारचे शोषण हीसुद्धा एक प्रकारची हिंसाच आहे ती थांबावयास हवी असा आग्रह धरतात.

ग्रामीण भागात असलेले पराकोटीचे अज्ञान पाहून गांधीजी व्यथीत झाले. ग्रामीण भागातील जनतेला चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी त्यांचा आग्रह होता. ग्रामीण भागाला योग्य होईल अशी शिक्षण पद्धती विकसित झाली पाहिजे. यासाठी त्यांनी आपली नइ तालीम शिक्षण पद्धती विकसित केली. ती वर्धा शिक्षण पद्धती म्हणूनही ओळखली जाते. त्यांचा सारा भर हा श्रमावर होता. शिक्षणाने श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. शिक्षण नसल्यामुळे ग्रामीण भागातील जनता निरक्षर आहे आणि त्यामुळेच ती अंधश्रद्धांच्या आहारी गेली आहे. त्यातून मुक्त होण्यासाठी प्रत्येक गावात एक प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्र आणि विद्यार्थ्यांना आणि गावकऱ्यांना उपयुक्त असे सांस्कृतिक केंद्र असावयास हवे. असे जर झाले तर ते गाव परिपूर्ण गाव ठरेल. असा विचार त्यांनी मांडला आहे.

प्रत्येक गावासाठी त्या गावचे हक्काचे असे कुरण असावयास हवे. जेथे गावातील गायी-गुरे चरतील. गावातील पाणी, गायरान याचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक गावाचे असे ग्रामसैनिक असावेत. संपूर्ण गावाने एकत्र येवून पंच समिती नेमावी. या पंच समितीने गावातील वाद मिटविणे, सार्वजनिक कार्यक्रम करणे ही कामे करावीत म्हणजे गावात शांतता नांदेल असे त्यांनी म्हटले आहे.

गांधीजींनी विकासाची सुरुवात खेड्यांपासून व्हावी असा विचार मांडला आणि आज मात्र शहरांच्या विकासावर, शहरे 'स्मार्ट' करण्यावर भर दिला जात आहे.

❑❑❑

## प्रकरण २२

# गांधीजींचा खून कुणी केला? का केला?

महात्मा गांधीजी देशाच्या फाळणीस जबाबदार आहेत. फाळणी झाल्यानंतर भारताने पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावेत असा आग्रह धरुन त्यांनी उपोषण केले. त्यामुळे भारताला ५५ कोटी रुपये देणे भाग पडले. या रागातून नथुराम गोडसे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी गांधीजींचा खून केला असे अत्यंत प्रभावीपणे सांगण्यात येते. अलिकडे तर नथुराम गोडसेचा जाहीरपणे उदो उदो करण्याचे काम सुरु आहे. नथुराम गोडसेचा गौरव करताना गांधीजींची बदनामी करण्याचे कामही सुरु आहे. ३० जानेवारी २०१९ रोजी अलिगड येथील हिंदू महासभेच्या सचिव असलेल्या पूजा पांडे हिने गांधीजींच्या प्रतिमेची विटंबना केली. काय केले तिने? तिने गांधीजींच्या छायाचित्रावर खेळण्यातील पिस्तुलाने गोळ्या झाडल्या. योजना अशी केली होती की, त्या छायाचित्रात लाल रंगाने भरलेला फुगा होता. तो फुगा फोडल्यावर रक्त ओघळल्याचा आभास निर्माण व्हावा. हे सर्व होत असताना गांधीजींच्या धिक्काराच्या आणि नथुराम गोडसेच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या गेल्या. लोकसभेसाठी झालेल्या निवडणूक प्रचारादरम्यान भोपाळ मतदारसंघात प्रज्ञासिंह ठाकुर या भाजपच्या उमेदवाराने पत्रकारांशी बोलताना असे स्पष्टपणे म्हटले की, नथुराम गोडसे हा देशभक्त होता, देशभक्त आहे आणि तो देशभक्तच असेल. महाराष्ट्रात 'मी नथुराम गोडसे बोलतोय' या

नाटकाच्या माध्यमातून नथुरामाचा जयजयकार आणि गांधीजींची टिंगल बराच काळ सुरु राहिली. हे सर्व पाहिल्यावर असे जाणवते की, अगदी हेतुपुरस्सर काही मंडळी गांधीजींची बदनामी करण्याचे काम करीत आहेत. असे करुन ते खरा इतिहास दडवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि म्हणून गांधीजींचा खून कुणी केला आणि का केला हे समजून घेणे आवश्यक वाटते.

गांधीजींच्या खुनाचे एकूण आठ वेळा प्रयत्न झाले. त्यातील दोन ते दक्षिण आफ्रिकेत असताना झाले.

१) खुनाचा पहिला प्रयत्न गैरसमजातून झाला. दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेषाविरोधात गांधीजींनी चळवळ सुरु केली. त्यावेळी त्यांच्याविषयी मीर आलम याच्या मनात गैरसमज निर्माण झाला. या गैरसमजुतीतून त्याने गांधीजींवर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात गांधीजी जखमी झाले. पण त्यांनी कोणतीही कायदेशीर कारवाई मीर आलमच्या विरोधात केली नाही. पुढे गैरसमज दूर झाल्यावर मात्र मीर आलम गांधीजींचा विश्वासू सहकारी झाला.

२) दि. १३ जानेवारी १८९७ रोजी दरबान या दक्षिण आफ्रिकेतील शहरात गांधीजींना मारण्याचा प्रयत्न झाला. भारतात काही काळ राहून ते दक्षिण आफ्रिकेला गेले. ते बोटीने दरबान बंदरात आल्याचे समजताच दोन हजार गोऱ्या लोकांचा जमाव बंदरात येऊन दाखल झाला व बॅ. गांधींना आमच्या हातात द्या असे म्हणू लागला. त्यासाठी बोटीच्या कप्तानाने बोट बंदरात नांगरली आणि इतर प्रवाशांना जाऊ दिले. गांधीजींना मात्र तेथेच थांबायला सांगितले. कप्तान गांधीजींना घेऊन जेव्हा लोकांपुढे आला तेव्हा लोकांनी त्यांच्यावर टोमॅटो, अंडी फेकण्यास सुरुवात केली. काही लोक त्यांच्या अंगावर धावून गेले. त्यावेळी रुस्तुमजी नावाच्या एका मित्राने त्यांना मदत केली. गांधीजीना तो आपल्या घरी घेऊन गेला. त्याच्या सहाय्याने त्यांनी पोलीसाचा वेष परिधान केला व गर्दीतून चालत निघून गेले. अशाप्रकारे वेषांतर करुन ते निसटले. बॅ. गांधी दक्षिण आफ्रिकेत वास्तव्य करुन

असलेल्या भारतीय लोकांना त्यांचे न्याय हक्क मिळावेत म्हणून आंदोलन करीत होते. या रागातून तेथील गोऱ्या लोकांनी हा प्रयत्न केला.

## हिंदुस्थानातील खुनाचे प्रयत्न

पहिला प्रयत्न : गांधीजींच्या खुनाचा पहिला प्रयत्न दि. २५ जून १९३४ साली पुण्यात आला. त्या दिवशी नगरपालिकेच्या सभागृहात त्यांची सभा होती. अस्पृश्यता निवारण हा विषय होता. ते सभागृहाकडे जात असताना त्यांच्या मोटारीवर बॉम्ब फेकण्यात आला. पण हा बॉम्ब त्यांच्या मोटारीवर न पडता पुढील मोटारीवर पडला. त्यामुळे ते बचावले. हा एक नियोजनबद्ध कट होता. गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाबाबत जी भूमिका घेतली होती ती ज्यांना मान्य नव्हती त्यांनी हा कट रचला होता. प्यारेलाल यांनी याबाबत असे म्हटले आहे की, ज्यांनी १९३४ साली गांधीजींच्या खुनाचा कट रचला त्यांनीच १९४८ साली त्यांचा खून केला.

१९३४ साली पाकिस्तानची कल्पनाही विकसित झालेली नव्हती आणि त्यामुळे पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचा प्रश्नच नव्हता.

दुसरा प्रयत्न : गांधीजींच्या खुनाचा दुसरा प्रयत्न जुलै १९४४ मध्ये पाचगणीत झाला. तुरुंगातून सुटल्यावर त्यांचे वास्तव्य कांही दिवसांसाठी पाचगणीत होते. तेथे नथुराम गोडसे आपल्या सहकाऱ्यांसह आला. तेथे त्याने गांधीजींच्या विरोधात मिरवणूक काढली. सायंकाळच्या प्रार्थनेवेळी नथुराम सुरा घेऊन गांधीजींवर धावून गेला. तेथे स्वयंसेवक म्हणून असलेल्या भिलारे गुरुजींनी त्यास मिठी मारुन रोखले. गांधीजींच्या सुचनेवरुनच पोलिसांत तक्रार न देता नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना सोडून देण्यात आले. नथुराम आणि आपटेंने त्यांच्या सहकाऱ्यांसह आपल्याबरोबर चर्चा करावी, आपणासोबत रहावे असा निरोप गांधीजींनी पाठविला. पण त्यांचे चर्चेचे निमंत्रण न स्वीकारता गोडसे आणि त्याचे मित्र पुण्याला निघून गेले.

तिसरा प्रयत्न : सप्टेंबर १९४४ मध्ये खुनाचा तिसरा प्रयत्न नथुरामनेच केला. सेवाग्राम येथे नथुराम गोडसे गांधीजींच्या अंगावर धावून गेला. आपण

काहीही केले तरी गांधीजी आपणाविरोधात पोलिसांत तक्रार करीत नाहीत यामुळे मंडळींना चेव आला होता. गोडसे आणि थत्ते जेंव्हा सेवाग्राममध्ये गांधीजींवर धावून आले तेंव्हा त्यांना स्वयंसेवकांनी रोखले व त्यांच्याजवळ असलेला मोठा जांबिया हस्तगत केला.

चौथा प्रयत्न : हा प्रयत्न २९ जून १९४६ रोजी करण्यात आला. गांधीजी मुंबईहून पुण्याला रेल्वेने रात्रौ निघाले. या रेल्वेगाडीचे नाव गांधी स्पेशल असे ठेवण्यात आले होते. या गाडीला अपघात घडवायचा या उद्देशाने कर्जत-नेरळ दरम्यान मोठ्या दरडी टाकण्यात आल्या होत्या. उद्देश हा होता की, त्या गाडीला अपघात व्हावा आणि अपघातात गांधीजींचा मृत्यू व्हावा. पण रेल्वेचा मोटरमन एल. एम. परेरा याने प्रसंगावधान राखून गाडी दरडीवर आपटणार नाही याची काळजी घेतली. त्यामुळे गांधीजी सुखरुपपणे पुण्यास पोहोचले.

पाचवा प्रयत्न : हा प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात झाला. त्या काळात गांधीजी दिल्लीमधील बिर्ला हाऊस येथे वास्तव्यास होते. गांधीजींना मारण्यासाठी नथुराम गोडसे, गोपाळ गोडसे, नारायण आपटे, करकरे, बडगे,किस्तय्या हे दिल्लीत आले. त्यांनी बिर्ला हाऊसची पाहणी केली. कट रचला. कोणी काय करायचे हे ठरविले व २० जानेवारी १९४८ रोजी सायंकाळी प्रार्थनेच्यावेळी त्यांनी खुनाचा प्रयत्न केला. ठरल्याप्रमाणे बॉम्बस्फोट घडविण्यात आला. नंतर मात्र ते सर्वजण गांगरुन गेले. कोण काय करायचे हे विसरुन गेले. त्यामुळे हा पाचवा कट अयशस्वी झाला. त्याच दिवशी रात्रौ ते पुण्याकडे परत निघाले. हे सगळे घडत होते. गांधीजी मात्र शांत होते. त्यांनी पोलिसांत तक्रार द्यायला नकार दिला होता. गांधीजींनी नकार देणे समजून घेता येते मात्र त्यावेळचे स्वतंत्र भारताचे गृहखाते काय करीत होते. गांधीजींच्या संरक्षणाची जबाबदारी या खात्यावर नव्हती काय? असा प्रश्न मनात डोकावून जातो.

शेवटचा प्रयत्न : नथुराम गोडसे आणि त्याचे सहकारी ३० जानेवारी दिवशी पुन्हा बिर्ला हाऊसमध्ये आले. सायंकाळी सव्वा पाच वाजता गांधीजी

आभा आणि मनूच्या खांद्यावर हात ठेवून प्रार्थनास्थळाकडे येऊ लागले. नेहमी या तिघांपुढे एक शीख स्वयंसेवक असायचा. तो समोरील गर्दीला बाजूला सारत असते. नेमका त्या दिवशी तो नव्हता. गांधीजींनी आभा आणि मनू यांच्या खांद्यावरील हात बाजूला घेतले व हात जोडून अभिवादनाचा स्वीकार करीत ते प्रार्थना मंचाकडे जाऊ लागले तेंव्हा नथुराम थेट गांधीजींच्या समोर येऊन उभा राहिला व म्हणाला, 'नमस्ते बापू'. मनू त्यांना म्हणाली, 'भय्या, बापूंना प्रार्थनेस उशीर होतोय' नथुरामने मनूला बाजूला ढकलले. ती खाली पडली. जमिनीवर पडता पडता तिने नथुरामकडे पाहिले. दुपारी तिने नथुरामला पाहिले होते. बरोबर ५ वाजून १७ मिनिटांनी नथुरामने गोळ्या झाडल्या. 'हे राम' म्हणत गांधीजी खाली कोसळले. गांधीजींचा खून करण्यात नथुराम गोडसे आणि त्याच्या सहकाऱ्यांना यश आले. या घटनेने सारे जग हादरले. आपल्या मृत्यूबद्दल गांधीजी वेळोवेळी बोललेले आहेत." बिछान्यावर पडून मृत्यू पावलो तर हा माणूस 'महात्मा' नव्हता असं समजा. प्रार्थनेस जाताना कोणी छात्तीवर गोळ्या झाडल्या तर मरताना राम नाम मुखातून यावं आणि मारणाऱ्याबद्दल मनात कटूता नसावी." हे आपलं मनोगत गांधीजींनी मनुला वर्षभरापूर्वी ३० जानेवारी १९४७ रोजी सांगितलं होतं. त्यानंतरही अनेकांजवळ आपल्या मृत्यूबाबतचे मनोगत व्यक्त केलं होतं. मृत्यूच्या एक दिवस अगोदरही हेच विचार त्यांनी मनुजवळ बोलून दाखविले होते. गांधीजींनी जसं मनोगत व्यक्त केलं होतं तसाच त्याना मृत्यु आला.

गांधीजींच्या खुनास जबाबदार ठरवून ९ आरोपींवर आरोपपत्र दाखल करण्यात आले.

१) नथुराम विनायक गोडस (३७ वर्षे) शनिवारपेठ पुणे.

२) नारायण दत्तात्रय आपटे (३४ वर्षे) बुधवारपेठ पुणे.

३) विष्णू रामचंद्र करकरे (३७ वर्षे) परदेशीअळी अहमदनगर.

४) दिगंबर रामचंद्र बडगे (३९ वर्षे) नारायणपेठ पुणे.

५) मदनलाल काश्मिरीलाल पहावा (२० वर्षे) निर्वासित छावणी, अहमदनगर.

६) शंकर किस्तय्या (२० वर्षे) नारायणपेठ पुणे.

७) गोपाळ विनायक गोडसे (२७ वर्षे) खडकी पुणे.

८) विनायक दामोदर सावरकर (६५ वर्षे) शिवाजी पार्क मुंबई.

९) दत्तात्रय सदाशिव परचुरे (४० वर्षे) स्टेशन रोड ग्वाल्हेर.

गुजरातमधील पुढील तीन आरोपी बेपत्ता घोषित करण्यात आले.

१०) गंगाधर सखाराम दंडवते

११) गंगांधर जाधव

१२) सूर्यदेव शर्मा

गांधीजींच्या खुनातील मुख्य दोषी ठरलेल्या नथुराम विनायक गोडसे आणि नारायण दत्तात्रय आपटे यांना दि. १३ नोव्हेंबर १९४९ रोजी अंबाला येथील मध्यवर्ती तुरुंगात फाशी देण्यात आली.

१) विष्णू रामचंद्र करकरे -आजन्म कारावास

२) मदनलाल काश्मिरीलाल पहावा - आजन्म कारावास

३) शंकर किस्तय्या -आजन्म कारावास

४) गोपाळ गोडसे -आजन्म कारावास

५) विनायक दामोदर सावरकर - निर्दोष

६) दिगंबर रामचंद्र बडगे-माफीचा साक्षीदार

## गांधीजींचा खून आणि ५५ कोटी

देशाची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान असे दोन देश निर्माण झाले. या दोन नवस्वतंत्र राष्ट्रांनी आपापसात देवाणघेवाण केली. करार केले. त्यावेळी देशाच्या गंगाजळीत एकूण ३७५ कोटी रुपये होते. यातील ३०० कोटी भारताने ठेवून घ्यावे व ७५ कोटी पाकिस्तानास द्यावे, असा करार करण्यात आला. तातडीची गरज म्हणून पाकिस्तानास २० कोटी रुपये द्यावेत, व उरलले ५५ कोटी नंतर द्यावेत असे या करारानुसार ठरले. दोन स्वतंत्र राष्ट्रांनी आपापसात केलेला हा पहिला करार होता. गांधीजींची

देशाच्या विभाजनाला मान्यता नव्हती. जेंव्हा हा करार झाला त्यावेळी गांधीजी तेथे नव्हते. त्या वाटाघाटीमध्ये त्यांनी भाग घेतला नाही. त्यावेळी ते देशात होत असलेल्या जातीय दंगली शमविण्याचा प्रयत्न करीत होते हे ध्यानात घ्यावयास हवे. उभय राष्ट्रांनी केलेल्या करारानुसार भारताने आता पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावयाचे होते. ते द्यावेत म्हणून गांधीजींनी उपोषण केले व त्याचा राग येउन नथुरामने गांधीजींचा खून केला असा प्रचार केला जातो. जो पूर्णपणे चुकीचा आहे. गांधीजींनी दिल्लीमध्ये उपोषण सुरु केले तो दिवस आहे १३ जानेवारी १९४८. दिल्ली शहरात त्यावेळी जातीय दंगल उसळली होती. दिल्ली शहर जळत होते. ही दंगल थांबावी असे आवाहन करुन गांधीजींनी उपोषणास सुरुवात केली होती. दंगल थांबून जोवर जनजीवन पूर्ववत होत नाही तोवर माझे उपोषण सुरुच राहील असा निर्धार गांधीजींनी व्यक्त केल्यामुळे सारे नेते चिंतेत होते. उपोषणाच्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपले चिटणीस व्ही. शंकर यांच्यामार्फत गांधीजींना निरोप पाठविला आणि 'मी काय करु' असे विचारले. त्यावेळी गांधीजी म्हणाले की,'पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्या'. उपोषण काळात त्यांनी व्यक्त केलेले ते मत होते. त्यांचे उपोषण ५५ कोटीसाठी अजिबात नव्हते त्यांचे उपोषण दिल्ली शहरामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी होते. गांधीजींचे 'ते' उपोषण या विषयावर प्यारेलाल नय्यर, डी. जी. तेंडूलकर, मौलाना आझाद, राममनोहर लोहिया यांनी लिहिले आहे. पण यातील एकानेही हे उपोषण पाकिस्तानला भारताने ५५ कोटी रुपये द्यावेत यासाठी होते असे म्हटलेले नाही.

गांधीजींनी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्या, असे म्हटल्याने रागावून जाऊन नथुरामने त्यांचा खून केला हे अजिबात पटण्यासारखे नाही त्यांनी गांधीजींचा खून करण्यामागची कारणे पूर्णपणे वेगळी आहेत. गांधीजींनी घेतलेली संस्थानिकांच्या विरोधातील भूमिका, दलित बांधवांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून केलेली चळवळ, अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, देशाची सत्ता श्रमिकांच्या हातात असावी ही त्यांची भूमिका,

गांधीजींनी स्वीकारलेले धर्मनिरपेक्षतेचे तत्त्वज्ञान न पटल्यामुळेच नथुराम गोडसे आणि त्याचे मित्र यांना गांधीजींचा खून करावासा वाटला हे सत्य आहे. गांधीजींनी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये मिळावेत यासाठी उपोषण केले हा प्रचार कोणत्याही पुराव्यावर टिकणारा नाही.

गांधीजींनी कधीही पोलिसांकडून संरक्षण घेतले नाही. नौखाली येथील जातीय दंगल शांत करण्यासाठी ते तेथे जीव धोक्यात घालून गेले. त्यावेळीसुद्धा त्यांनी संरक्षण नाकारले. ज्यांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ले केले त्यांच्याविरोधात त्यांनी पोलिसांत तक्रारही दिली नाही. हल्लेखोरांना त्यांनी माफ केले. हल्लेखोरांनी आपणाबरोबर चर्चा करावी असे त्यांनी आवाहन केले. त्यांच्या या जीवनतत्त्वज्ञानाकडे पाहून जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि विचारवंत अल्बर्ट आईनस्टाईन असे म्हणाला आहे की, येणारी पिढी यावर विश्वास ठेवणार नाही की अशाप्रकारचा एक माणूस पृथ्वीच्या पाठीवर होऊन गेला.

❑❑❑

## प्रकरण २३

# गांधीवाद आहे तरी काय?

गांधीजींनी आपले तत्त्वज्ञान वेगळे असे लिहिलेले नाही. गांधीजींनी वृत्तपत्रातून जे लिखाण केले त्यातून ते घ्यावे लागते. अभ्यासकांनी ते काम केले आहे. गांधीवादाची म्हणून अशी काही सूत्रे नमूद करता येतात.

१) अन्यायाचा प्रतिकार करणे : गांधीजी म्हणतात की अन्याय करणे हे चूकच. पण निमूटपणे अन्याय सहन करणे हेदेखील बरोबर नाही. अन्यायाचा प्रतिकार करावयास हवा.

२) अहिंसक मार्गाने अन्यायाचा प्रतिकार : अन्यायाचा प्रतिकार करताना हिंसक मार्गाचा अवलंब केला जाऊनये यावर गांधीजी भर देतात. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी वेगवेगळे मार्गही सुचविले आहेत. सत्याग्रह हा त्यातील एक मार्ग.

३) उदात्तध्येय साध्य करण्यासाठी शुद्ध साधने वापरली पाहिजेत : ध्येय साध्य करताना जो मार्ग निवडायचा असतो तो शुद्ध असावयास हवा. भ्रष्ट असू नये. गैरमार्गाने ध्येय साध्य केले जाऊ नये.

४) शारिरीक श्रमाची प्रतिष्ठा : शारिरीक श्रम करणाऱ्या व्यक्तीस समाजात प्रतिष्ठा मिळावयास हवी.

५) व्यक्ती आणि समाज निर्भय असावा : समाजातील प्रत्येक व्यक्तीस निर्भयपणे जगता आले पाहिजे तसेच आपणास व्यक्त होण्याचा अधिकार व्यक्तीला असला पाहिजेत. समाजसुद्धा निर्भय असला पाहिजे.

६) उत्पादन व्यवस्था आणि राज्य व्यवस्था विकेंद्रित असली पाहिजे : उत्पादन व्यवस्था आणि राज्य व्यवस्था मूठभर लोकांच्या हातात केंद्रीत होता कामा नये.

७) समाजात उच्चनिच्च असा भेदभाव असता कामा नये. सर्व जातीधर्मांचे स्त्री–पुरुष समान आहेत असे मानून त्यांना समानतेने वागविले पाहिजे.

८) नीती हे सर्व धर्मांचे सार असून नीतीचे पालन सर्वांनी केले पाहिजे.

९) सत्य हे श्रेष्ठ मूल्य आहे.

१०) निसर्ग आणि मानव यांच्यामध्ये संतुलन असले पाहिजे.

## संदर्भ

१) अज्ञात गांधी : नारायणभाई देसाई : समकालीन प्रकाशन, पुणे.

२) महात्मा गांधी आणि गांधी वचने : प्रसाद कुलकर्णी : समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी.

३) महात्मा गांधी जीवनचरित्र : दा. न. शिखरे : सकाळ प्रकाशन, पुणे.

४) झोत : सामाजिक न्यायावर : संपादक : उत्तम कांबळे.


५) महात्म्याची अखेर : जगन फडणीस : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

❑❑❑

# छायाचित्रे



दक्षिण आफ्रिकेतील एका सभागृहात प्रवेश करताना



दक्षिण आफ्रिकेतील सहकारी मंडळींशी संवाद




लॅन्केशायर (इंग्लंड) येथिल महिला गिरणी कामगारच्यातर्फे गांधीजीचे उत्साहात स्वागत




ऐतिहासिक 'दांडी मार्च'चे नेतृत्व करताना



काँग्रेसच्या सभेप्रसंगी नेहरू आणि सरदार पटेल यांच्याबरोबर


चरख्यावर सूतकताई करताना


प्रचार दौऱ्यावर गांधीजी


शांतीनिकेतनमध्ये रविन्द्रनाथ टागोर यांच्यासमवेत



सरोजिनी नायडू समवेत सभेस जाताना



गोलमेज परिषदेत सहभागी महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर

गांधीजींनी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्या, असे म्हटल्याने रागावून जाऊन नथुरामने त्यांचा खून केला हे अजिबात पटण्यासारखे नाही त्यांनी गांधीजींचा खून करण्यामागची कारणे पूर्णपणे वेगळी आहेत. गांधीजींनी घेतलेली संस्थानिकांच्या विरोधातील भूमिका, दलित बांधवांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून केलेली चळवळ, अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, देशाची सत्ता श्रमिकांच्या हातात असावी ही त्यांची भूमिका, गांधीजींनी स्वीकारलेले धर्मनिरपेक्षतेचे तत्त्वज्ञान न पटल्यामुळेच नथुराम गोडसे आणि त्याचे मित्र यांना गांधीजींचा खून करावासा वाटला हे सत्य आहे. गांधीजींनी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये मिळावेत यासाठी उपोषण केले हा प्रचार कोणत्याही पुराव्यावर टिकणारा नाही.

गांधीजींनी कधीही पोलिसांकडून संरक्षण घेतले नाही. नौखाली येथील जातीय दंगल शांत करण्यासाठी ते तेथे जीव धोक्यात घालून गेले. त्यावेळीसुद्धा त्यांनी संरक्षण नाकारले. ज्यांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ले केले त्यांच्याविरोधात त्यांनी पोलिसांत तक्रारही दिली नाही. हल्लेखोरांना त्यांनी माफ केले. हल्लेखोरांनी आपणाबरोबर चर्चा करावी असे त्यांनी आवाहन केले. त्यांच्या या जीवनतत्त्वज्ञानाकडे पाहून जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि विचारवंत अल्बर्ट आईनस्टाईन असे म्हणाला आहे की, येणारी पिढी यावर विश्वास ठेवणार नाही की अशाप्रकारचा एक माणूस पृथ्वीच्या पाठीवर होऊन गेला.

दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट